13	47145	07/9/2018	20/9/2018
14	5864	07/9/2018	20/9/2018
15	314334	07/9/2018	20/9/2018
16	114349	07/9/2018	20/9/2018
17	154	06/9/2018	24/9/2018
18	155	6/9/2018	24/9/2018
19	156	6/9/2018	24/9/2018
20	157	6/9/2018	24/9/2018
21	158	6/9/2018	24/9/2018
22	159	6/9/2018	24/9/2018
23	160	6/9/2018	24/9/2018
24	161	6/9/2018	20/9/2018
25	162	6/9/2018	20/9/2018
26	163	6/9/2018	20/9/2018
27	164	6/9/2018	20/9/2018
28	165	6/9/2018	20/9/2018
29	166	6/9/2018	20/9/2018
30	167	6/9/2018	20/9/2018
31	168	6/9/2018	20/9/2018
32	169	6/9/2018	20/9/2018
33	23437	6/9/2018	20/9/2018

या संदर्भात अर्थसमास क्र.०४ दि.२३/०८/२०१८ अन्वये खुलासा मागविण्यात आला होता. लेखा विभागाने पत्र जा.क्र.मनपा/लेखा/३२०/२०१८-१९ दि.२७/०८/२०१८ अन्वये खुलासा सादर केला की, करासंबंधीची रोख रक्कम, धनादेश तसेच धनाकर्ष हे पाणीपुरवठा विभागाकडुन बँक प्रतिनिधी मार्फत त्याचा भरणा बँकेत केला जातो. असे असताना देखील बँकेत जमा विलंबाने केली जाते. त्यामुळे महानगरपालिकेला मिळणा-या व्याजाचे नुकसान होते. याबाबत विभागाने अनुपालनात सदरील बाब पत्र क्रमांक/जा.क्र/मनपा/लेखा/३१४/२०१८-१९ दि.२१/०८/२०१८ अन्वये बँकेच्या निर्देशनास आणली आहे. विभागाने केलेले अनुपालन संयुक्तिक नाही. सदर बाबतीत विभागाने वेळीच रक्कम ह्या बँक खात्यात जमा होतील याबाबत दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र. 28 :- पाणी पुरवठा विभागाने बँकेत जमा केलेल्या रक्कमेचा लेखा विभागाने रोखवही मध्ये सदरील रक्कमेची नोंदी न घेतल्यामुळे रक्कमा लेख्यांच्या बाहेर ठेऊन लेखांकन चुकीचे केल्याबाबत..

A) पाणीपुरवठा विभागाकडुन संगणकीय कर प्रणालीव्दारे रोख, धनादेश व ऑनलाईन पध्दतीने संकलन केले जाते. दिवसभर झालेले संकलन एचडीएफसी बँक खाते क्र. ५०२०००००४३५४२१२ मध्ये एचडीएफसी बँकच्या प्रतिनिधी व्दारे जमा केली जाते व त्याप्रमाणे चलन बनवुन लेखा विभागात सादर करण्यात येते.

चलनाव्दारे जमा झालेले रक्कमेची खात्री करुन कॅशबुकात त्याप्रमाणे दररोज नोंदी घ्यावयाचे आहेत. लेखे दि. 01/04/2018 ते दि. 31/03/2019 या कालावधीतील पाणीपुरवठाकर कॅशबुकाचे लेखापरीक्षण करताना पाणीपुरवठाकर विभागातुन बँकत जमा करण्यात आलेले डी डी च्या नोंदी लेखा विभागाने रोखवहीत नोंद न घेतल्यामुळे रक्कमा लेख्याच्या बाहेर ठेऊन लेखांकन चुकीचे झाले असे आढळुन आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र	संकलन दिनांक	ग्राहकाचे नाव	डी.डी क्रमांक	बँक विवरणपत्रा मध्ये जमा दि.	रक्कम
१	२४/०५/२०१८	पुनम सनराईस	००५६३६	१८/०५/२०१८	४२५०/-
२	२४/०५/२०१८	रानावत २	२७१५८२	२४/०५/२०१८	८५००/-
३	२४/०५/२०१८	श्रीष्टी बिल्डींग क्र.३५०	२८१५१२	२३/०५/२०१८	२५५००/-
	एकुण				३८२५०/-

सदर बाब गंभीर आहे तरी याबाबत अर्धसमास क्र.२० दि.२८/०९/२०१८ अन्वये मागविण्यात खुलासा आला होता. लेखा विभागाकडुन पत्र क्र. मनपा/लेखा/३९९/२०१८-१९ दि.०५/१०/२०१८ अन्वये बँक स्टेटमेन्ट मध्ये आढळुन न आलेल्या रक्कमा बाबत पाणी पुरवठा विभागास खुलासा सादर करणे बाबत कळविले होते. तथापि आजमितीस माहिती अप्राप्त आहे.

B) चलनाच्या नोंदी रोकडवही मध्ये आढळुन न आल्या बाबत...

पाणी पुरवठा विभागाची माहे जुलै ते सप्टे 2018 या कालावधीची एकत्रित रक्कमांची चलने व संबंधित रोकडवहीमधील नोंदी यांचे अवलोकन केले असता दि. 01/08/2018 रोजीचे चलन क्र. 407, रक्कम रु.71400/- व दि. 13/08/2018 रोजीचे चलन क्र.459, रक्कम रु.2570/- या दोन्ही चलनांच्या नोंदी लेखा विभागाने रोख वहीमध्ये न घेतल्यामुळे रक्कमा लेख्याच्या बाहेर ठेवुन, लेखांकन चुकीचे झाल्याचे आढळून आलेले आहे.

परिच्छेद क्र. 29 :- पाणी पुरवठा विभागाचे बँक विवरणपत्र व ताळमेळ पत्रक उपलब्ध करुन न दिल्याबाबत.

पाणी पुरवठा कर संगणकीय प्रणाली व्दारे रोख धनादेश व ऑन लाईन पध्दतीने संकलीत केला जातो व दिवसभर प्राप्त झालेले संकलन एच.डी.एफ.सी बँक खाते क्र.50200004354212 मध्ये एच.डी.एफ.सी बँकेच्या प्रतिनिधी व्दारे जमा केले जाते. त्यानुसार विभागा मार्फत त्याचे चलन तयार करुन लेखा विभागास सादर करण्यात येते. लेखा विभाग सदर चलनाच्या आधारे रोकड वहीमध्ये (नमुना 11) मध्ये नोंदी घेते. पाणी पुरवठा विभागाची माहे ऑक्टोबर 2018 ते डिसेंबर 2018 तसेच जानेवारी 2019 ते मार्च 2019 या कालावधीची एकत्रित रक्कमांची चलने (नमुना.13) व संबंधित रोकडवही लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली. तथापि संबंधित बँक खात्याचे उपरोक्त कालावधीचे बँक विवरणपत्र व ताळमेळ पत्रक मागणी करुनही लेखापरीक्षणासाठी सादर करण्यात आले नाही.

रोकडवहीप्रमाणे मार्च अखेरची शिल्लक रु.12,21,20,504 इतकी असुन पाणीखात्यातुन उपलब्ध करुन दिलेल्या 2 महिन्याचे (फेब्रुवारी व मार्च) बँक विवरणपत्रा प्रमाणे मार्च अखेरची शिल्लक रु.11,78,96,531 आहे. त्यामुळे बँकेमध्ये मार्च अखेरची शिल्लक रु. 42,23,973 कमी आहे. ही बाब गंभीर असुन लेखा विभागाने याबाबत त्वरीत दखल घेऊन बँक व कॅश विवरणपत्राचे ताळमेळ घेऊन फरकाबाबतचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा. यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या जमा रक्कमेची खातरजमा करता आली नाही. तसेच लेखा विभागाने सर्व बँक विवरणपत्रे व ताळमेळ दर्शवुन अनुपालन करावे.

परिच्छेद क्र. 30 :- जमाखर्चातील चुकीच्या नोंदीबाबत...

पाणीपट्टी वसुली ब-याच प्रमाणात रोकड व धनादेश स्वरुपात केली जाते. सदरील रोकड व धनादेश HDFC BANK AC No-50200004354212 मध्ये पाणीपुरवठा विभागातुन परस्पर भरणा केला जातो. रोकड व धनादेश रक्कमेनुसार दररोजच्या वसुलीप्रमाणे पाणीपुरवठा विभागात एकत्रित चलने तयार करुन लेखा विभागात पाठविली जातात. त्याप्रमाणे लेखा विभागातील कॅश बुकात चलनाप्रमाणे जमेच्या नोंदी घेतल्या जातात व रोकडवहितील नोंदीप्रमाणे जमा खर्च तयार करण्यात येतो. पाणी खात्यातील धनादेश परतावा नोंदवहीचे लेखा विभागातील रोकडवहीशी पडताळणी केली असता एकुण 492 बँकेत न वटलेले धनादेश रक्कम रु. 1,36,35,269 पाणीखाते विभागात परत आलेले आहेत. तथापि, लेखा विभागात रोकडवहीत सदरील परत आलेल्या धनादेशाची नोंदी घेतल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे परत आलेल्या धनादेशाची रक्कम रोकडवही व त्याव्दारे तयार करण्यात आलेल्या जमा खर्चामध्ये जास्तीची रक्कम आढळुन येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ.क्र	शिर्षक	वार्षिक जमा खर्च 2018-19 (रु.)	परत आलेल्या धनादेशाची रक्कम (रु.)	अपेक्षित जमा रक्कम (रु.)
1	पाणीपट्टी	97,96,57,000	1,36,35,269	96,60,21,731

रोकडवहीत परत आलेल्या धनादेशाच्या नोंदी न घेतल्यामुळे जमाखर्च सन 2018-19 मध्ये रक्कम रु. 1,36,35,269 जास्तीची आढळुन येत आहे. त्यामुळे जमाखर्च चुकीचा झालेला आहे. सदरील बाब गंभीर आहे. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन सादर करण्यात यावे. तसेच परत आलेल्या धनादेशाची रक्कम पाणीपुरवठा विभागाने मागणी रजिस्टरमध्ये थकबाकी दंडासहित दर्शवुन वसुल केली आहे याची खातरजमा करण्यात यावी.

आक्षेपाधीन रक्कम:- रु. 1,36,35,269

परिच्छेद क्र. 31 :- नियम 78 (3) नुसार पाणी पुरवठा विभागाने चलने (नमुना 13) प्रमाणित न केल्याबाबत..

महाराष्ट्र महानगरपालिका लेखा संहिता 1971 मधील प्रकरण 6 मध्ये नगरपालिकेच्या विविध प्रकारचा कर महसूल संकलित करण्याची व लेखा विभागामध्ये /बँके मध्ये जमा करण्याची कार्यपध्दती नमुद केली आहे. त्यामधील नियम क्रं.78(3) नुसार कर महसुल संकलनाच्या नोंदी, कर संकलकाने संकलन वहीमध्ये घेऊन सर्व जमा रक्कमांच्या बेरजा घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार संकलित झालेली रक्कम लेखा विभागामध्ये/बँकेमध्ये जमा करण्यासाठी नमुना क्र.13 मध्ये चलन तयार करणे आवश्यक आहे. याशिवाय नियम 79 मधील तरतूदीनुसार संकलित झालेली रक्कम लेखा विभागात/ बँकेमध्ये जमा करण्यापुर्वी संकलन विभागातील संबंधित वरिष्ठ अधिका-याने संकलन वहीतील प्रत्येक नोंद पावती बरोबर पडताळणी करून त्याबाबतच्या अचूकतेचे प्रमाणपत्र चलनामध्ये (नमुना नं.13) मध्ये देणे अनिवार्य आहे. तथापि लेखा विभागाने लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून दिलेली पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाची एकत्रित रक्कमांची चलने (नमुना नं.13) तपासणी करताना असे आढळून आले आहे कि, नियम 79 नुसार वरील प्रमाणे प्रमाणपत्र पाणी पुरवठा व मलनिःसारण विभागाने दिले नसताना अशा अप्रमाणित चलनांच्या नोंदी लेखा विभागाने रोकडवहीमध्ये घेतलेल्या आहेत. त्यामुळे रोकडवहीतील नोंदीची खातर जमा करता आली नाही.

परिच्छेद क्र 32 :- जनरल फंड जमा खर्चाबाबत.

एच.डी.एफ.सी बँक खाते क्र. 50100174960507, जनरल फंडच्या रोकडवहीमध्ये वैद्यकिय विभाग सार्व. आरोग्य विभाग, जाहिरात विभाग, परवाना विभाग व नगररचना विभाग इ. विभागामध्ये जमा झालेली रोकड व धनादेश एच.डी.एफ.सी बँक खाते क्र. 50100174960507 मध्ये बँकेच्या प्रतिनिधीव्दारे जमा केली जाते. व त्याप्रमाणे विभागात चलने बनवुन (नमुना न.13), लेखा विभागात सादर केली जातात. सदर चलनाच्या आधारे लेखा विभाग रोकड वहीमध्ये (नमुना न.11) नोंदी घेतात.

उपरोक्त नमुद विभागांची चलने व रोकडवहीतील नोंदी यांची पडताळणी करताना लेखापरीक्षणास असे आढळून आले कि, चलन (नमुना न.13) च्या शेवटी संबंधित विभागाने रोकड/धनादेश जमा करण्यापुर्वी खालील प्रमाणपत्र देवुन संबंधितांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. "तपासले व संकलन पुस्तकातील बेरजेची पडताळणी केली यातील नोंदी प्रतिलिपीशी पडताळुन पाहिल्या."

तथापि उपरोक्त विभागाने सदर प्रमाणपत्र न देता व स्वाक्षरी न करताच रोकड/धनादेश जमा केल्याचे दिसुन येते. शिवाय लेखा विभागाने सुध्दा या प्रमाणपत्रा शिवाय रोकडवहीमध्ये चलनांच्या नोंदी घेतल्याचे आढळून आले आहे.सदर त्रुटी दि.18.1.19 रोजीच्या अर्धसमास क्र.09 अन्वये लेखा विभागाच्या निदर्शनास आणुन दिली आहे. तथापि याबाबतचे अनुपालन अद्याप अप्राप्त आहेत.

परिच्छेद क्र 33 :- नियम 51 (3) नुसार रोकडवहीमधील नोंदीचा पासबुकामधील नोंदी बरोबर ताळमेळ न घेतल्याबाबत....

महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता 1971 मधील नियम 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेरीस रोकडवही मध्ये नोंदलेल्या जमा व खर्चाच्या नोंदी बँक पास बुकामधील नोंदी बरोबर बाबनिहाय तुलना करुन शिलकेची जुळणी करणे अनिवार्य आहे. तथापि लेखा विभागाने सर्वसाधारण रोकडवही मधील बाबींचा ताळमेळ न घालताच बंद केल्याचे आढळुन आले आहे. सदर बाब लेखा विभागास दि.5/1/2019 रोजीच्या अर्धसमास क्र.2 अन्वये लेखा विभागास कळविण्यात आले आहे. तथापि याबाबतचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 34 :- लेखे जनरल फंड च्या कॅशबुक मध्ये नोंदविलेल्या रक्कमा बँक स्टेटमेंट मध्ये आढळुन न आल्याबाबत...

जनरल फंडाच्या कॅशबुक मध्ये वैद्यकीय आरोग्य विभाग, सार्व. आरोग्य विभाग, जाहिरात विभाग, परवाना विभाग, नगररचना विभाग इ. विभागाकडुन जमा झालेली रोख रक्कम व धनादेश एचडीएफसी बँक खाते क्र. ५०१००१७४९६०५०७ मध्ये बँकच्या प्रतिनिधी द्वारे जमा केली जाते व त्याप्रमाणे विभागात चलन बनवुन लेखा विभागात सादर करण्यात येते.

विभागाने बँकेत जमा केलेल्या रोख रक्कमेची पावती व बँकेत भरलेल्या धनादेशाची यादी चलनासोबत असल्याची खात्री करूनच लेखा विभागाने चलनाची कॅशबुकात नोंदी घ्यावयाचे आहेत. जनरल फंड कॅशबुकाचे लेखापरीक्षण करताना जमेच्या बाजुने दर्शविण्यात आलेल्या चलनासोबत रोख रक्कमेची पावती व बँकेत भरलेल्या धनादेशाची यादी ची खात्री न करताच कॅशबुकामध्ये नोंदी घेतलेल्या आहेत असे आढळून आलेले आहे. चलनासोबत रोख रकमेची पावती व धनादेशाच्या यादीची बँक विवरण पत्राबरोबर पडताळणी केली असता, काही चलनातील दर्शविण्यात आलेली रोख रक्कम व धनादेशातील रक्कम बँक विवरण पत्रामध्ये आढळून आलेली नाहीत. त्याचा तपशिल खालील तक्त्यात नमुद करण्यात आलेले आहे.

बँक स्टेटमेंट मध्ये आढळुन न आलेल्या धनादेश रक्कमा				
अ.क्र	दिनांक	चलन क्र	धनादेश	विभाग
१.	०५/०४/१८	४४	७६७५२	जाहिरात विभाग
२.	०५/०४/१८	४४	७३६२०	जाहिरात विभाग
३.	०७/०४/१८	७५	६४८०	जाहिरात विभाग
४.	१२/०४/१८	१४४	६०००	प्रभाग क्र.०३
५.	१८/०४/१८	२३४	३००००	प्रभाग क्र.०४
६.	२०/०४/१८	२५९	३६००	जाहिरात विभाग
७.	२३/०४/१८	२८७	५२५०	मिळकत विभाग
८.	२५/०४/१८	३२९	१२०००	प्रभाग क्र.०६
९.	०२/०५/१८	३८१	१९५००	प्रभाग क्र.०३
१०.	०३/०५/१८	४०२	५०००	प्रभाग क्र.३,४
११.	०७/०५/१८	४४५	११७५०	प्रभाग क्र.०३
१२.	१४/०५/१८	५२१	१४०००	प्रभाग क्र.०६
१३.	१९/०५/१८	५९२	२७०००	प्रभाग क्र.०४
१४.	१९/०५/१८	६००	११५३५९	पे & पार्क
१५.	१९/०५/१८	६१०	६८३४१७	पे & पार्क
१६.	१९/०५/१८	६८३	३०००	प्रभाग क्र.०४
	i) एकुण		१०९२७२८	
बँक स्टेटमेंट मध्ये आढळुन न आलेल्या रोख रक्कमा				
अ.क्र	दिनांक	चलन क्र	रोख रक्कम	विभाग
१७.	०८/०६/१८	८१५	४५००	प्रभाग क्र.०४
१८.	०८/०६/१८	८१५	२५०००	प्रभाग क्र.०४

१९.	०८/०६/१८	८१६	२५०००	प्रभाग क्र.०४
२०.	११/०६/१८	८४४	२०००	प्रभाग क्र.०३
२१.	११/०६/१८	८४५	३८	प्रभाग क्र.०३
२२.	११/०६/१८	८४७	२००	प्रभाग क्र.०३
२३.	११/०६/१८	८४७	३०	प्रभाग क्र.०३
२४.	११/०६/१८	८४७	३०	प्रभाग क्र.०३
२५.	११/०६/१८	८४७	१४५५०	प्रभाग क्र.०३
२६.	१४/०६/१८	९०२	१६००	प्रभाग क्र.०३
२७.	१४/०६/१८	९०३	७५००	प्रभाग क्र.०३
२८.	१४/०६/१८	९०३	७०	प्रभाग क्र.०३
२९.	१४/०६/१८	९०३	२०	प्रभाग क्र.०३
३०.	१४/०६/१८	९०४	६०	प्रभाग क्र.०३
३१.	१४/०६/१८	९०४	२०	प्रभाग क्र.०३
३२.	१४/०६/१८	९०४	६००	प्रभाग क्र.०३
३३.	१/९/२०१८	१८४२	१९७९८	
३४.	४/९/२०१८	१८६९	६१५०	
३५.	४/९/२०१८	१८७०	१३०००	
३६.	४/९/२०१८	१८७१	८२५२	
३७.	३/९/२०१८	१८७२	१८२०	
३८.	६/९/२०१८	१९१५	२५११३	
३९.	६/९/२०१८	१९१६	४०००	
४०.	७/९/२०१८	१९१७	१३६२०	
४१.	५/९/२०१८	१९२०	८६९०	
४२.	५/९/२०१८	१९२१	८९४	
४३.	५/९/२०१८	१९२२	१६७४५	
४४.	११/९/२०१८	१९५३	६५४०२	
४५.	११/९/२०१८	१९५७	३०००	
४६.	११/९/२०१८	१९५८	६३००	
४७.	१०/९/२०१८	१९५९	१९०००	
४८.	१०/९/२०१८	१९६०	८०९०	
४९.	१०/९/२०१८	१९६१	२८००	
५०.	१०/९/२०१८	१९६२	२७५४३	
५१.	१२/९/२०१८	१९७०	१५६६६०	
५२.	१२/९/२०१८	१९७१	७०००	
५३.	१२/९/२०१८	१९७२	९५००	
५४.	१२/९/२०१८	१९७३	२३५६६	
५५.	१४/९/२०१८	१९८९	३५३६	
५६.	१४/९/२०१८	१९९९	१२०००	
५७.	२४/९/२०१८	२०४०	५१७०	
५८.	२४/९/२०१८	२०४७	४१०००	

५९.	२५/९/२०१८	२०६५	२८००	
६०.	२५/९/२०१८	२०६६	२३०००	
६१.	२५/९/२०१८	२०६७	१३४८०	
६२.	२८/९/२०१८	२१७०	५६५००	
६३.	२९/९/२०१८	२१८७	५२७०	
६४.	२९/९/२०१८	२१८८	१४५००	
	ii) एकुण		७०५५१७	
	i) + ii) =		१७९८२४५/-	

याबाबत अर्थसमाज क्र.२२ दि.०१/१०/२०१८ अन्वये कॅशबुकातील नोंदीप्रमाणे एकुण रोख व धनादेशाच्या बँक विवरणपत्रासोबत ताळमेळ घेऊन खुलासा सादर करणेबाबत विभागास कळविण्यात आले होते. विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यायी बँक विवरणपत्रासोबत संयुक्तरित्या तपासणी केली असता उपरोक्त दर्शविलेली रोख/धनादेश जमा रक्कम बँकेच्या विवरणपत्रासोबत खातरजमा करता आली नाही. तरी याबाबत उचित कार्यवाही करुन सदरच्या रक्कमा जमा झाले आहेत किंवा नाही हे लेखापरीक्षणास दर्शवावे.

परिच्छेद क्र 35 :- न वटलेल्या धनादेशाबाबत.

एच.डी.एफ.सी बँक खाते क्र. 50100174960507 च्या माहे एप्रिल , मे , ऑगस्ट व सप्टेंबर 2018 या महिन्यांच्या बँक विवरणपत्राचे अवलोकन केले असता खाली नमुद केलेले 16 धनादेश अनादर झाल्याचे आढळुन आले.

अ.क्र	दिनांक	धनादेश क्रमांक	अनादाराचे कारण	रक्कम
१	२९/३/२०१८	९२२१३४	अपुरा निधी	२४००/-
२	८/५/२०१८	९२२१३४	अपुरा निधी	२४००/-
३	४/४/२०१८	३७३८३३	अपुरा निधी	१६८४४८/-
४	४/८/२०१८	३७३८३४	अपुरा निधी	१६८४४८/-
५	४/८/२०१८	७३७७९३	अपुरा निधी	३५३६४०/-
६	४/८/२०१८	७३७८५४	अपुरा निधी	२५२६७२/-
७	४/८/२०१८	३८७२४२	अपुरा निधी	१००००/-
८	१६/४/२०१८	३८७४०	अपुरा निधी	२००००/-
९	१६/४/२०१८	०८४७	अपुरा निधी	१९३५३६/-
१०	१६/४/२०१८	८००४०	अपुरा निधी	६५६७४४/-
११	१६/४/२०१८	१०५०८८	अपुरा निधी	१४४००/-
१२	१६/४/२०१८	१०९५	अपुरा निधी	५१६७३०/-
१३	१४/५/२०१८	६३४६४०	अपुरा निधी	१०२१४६/-
१४	३/५/२०१८	५४६७८४	अपुरा निधी	१९३५३६/-
१५	३/९/२०१८	११४९	अपुरा निधी	१९३५३६/-
१६	२०/९/२०१८	७०९३३१	अपुरा निधी	६६०००/-
		एकुण		२९,१४,६३६/-

या संदर्भात खालील अनियमितता आढळुन आल्या.

I. उपरोक्त अनादर झालेल्या धनादेशाची नोंद लेखा विभागाच्या धनादेश अनादर नोंदवहीमध्ये आढळुन आली नाही. त्यामुळे सदर धनादेशामधील रक्कमांची वसुली झाली किंवा कसे याची खातरजमा करता आली नाही.

II. दि.29.3.18 रोजीचा धनादेश क्र.922134 अपुरा निधी या कारणास्तव न वटता परत आल्यानंतर तोच धनादेश पुन्हा दि. 8.5.18 रोजी वसुलीसाठी जमा केला असता त्याच कारणास्तव अनादर झाल्याचे दिसुन येते.

III. दि.16.4.18 रोजीचा धनादेश क्र.847, दि.3.5.18 रोजीचा धनादेश क्र.546784 व दि.3.9.18 रोजीचा धनादेश क्र.1149 या तीन्ही धनादेशामध्ये समान रक्कमा असून असे समान रक्कमा असलेले धनादेश वारंवार अनादर झाल्याचे आढळुन आले.

IV. अनादर धनादेशाच्या संदर्भात विशिष्ठ कालावधीमध्ये रक्कमेचा भरणा न केल्यास अशा व्यक्ती /संस्था विरुध्द पराक्रम्य दस्ताऐवज अधिनियम 1938 मधील तरतुदी नुसार काय कायदेशिर कार्यवाही केली याबाबत विभागाने अनुपालन दर्शविणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमितता तसेच अनादरीत धनादेशामधील रक्कमेच्या वसुली बाबत लेखा विभागाकडुन दि.29.1.19 रोजीचा अर्धसमास क्र.12 अन्वये खुलासा मागविला आहे. तथापि अदयाप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र 36 :- बँक विवरणपत्रातील नोंदी रोकडवही मध्ये आढळून न आल्याबाबत.

माहे जुलै 2018 महिन्याचे एच.डी.एफ.सी बँक खाते क.50100174960507 (जनरल फंड) चे बँक विवरणपत्र व रोकडवही मधील नोंदी तपासल्या असता बँक विवरणपत्रका मधील खालील नोंदी माहे जुलै महिन्याच्या रोकडवही मध्ये आढळून आल्या नाहीत.

प्रमाणक क्र. व दिनांक	तपशील	रक्कम रु.
22 - 5.7.2018	स्थायी आस्थापना सामान्य प्रशासन	34,77,951/-
28 - 9.7.2018	अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक	19,31,676/-
29 - 27.7.2018	अति कालीन भत्ता	30,180/-
31 30.7.2018	व्यवसाय कर	400/-
33 3.8.2018	अंशदाननिधी निवृत्ती वेतन	35,93,461/-
35 9.8.2018	व्यवसाय कर	975/-
37 10.8.2018	पी.एफ.खर्च	1,24,200/-
40,41 24.8.2018	अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक	14,98,734/- 80,494/-
42 24.8.2018	पी.एफ.खर्च	1,33,200/-
45 27.8.2018	पी.एफ.खर्च	7,200/-
46 3.9.2018	माहे ऑगस्ट वेतन	38,21,924/-
48,49 10.9.2018	उत्सव अग्रीम	95,40,000/- 33,20,000/-
62 14.9.2018	अस्थायी आस्थापना	43,200/-
एकुण		2,76,03535/-

तसेच चलन क्र.1215 ची रक्कम रु.149/- असताना बँकेमध्ये रु.150/- जमा करण्यात आली आहे. शिवाय चलन क्र.1326 मधील रक्कम रु.16200/- व रु.3200/- या रकमांच्या नोंदी रोकडवही मध्ये आहेत. तथापि ,बँक विवरणपत्रामध्ये या नोंदी आढळून आल्या नाहीत. उपरोक्त त्रुटी दि.11.1.2019 रोजीच्या अर्धसमास क्र.3 अन्वये लेखा विभागास कळविण्यात आल्या आहेत. तथापि याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र 37 :- सर्व साधारण रोकडवहीमधील अनियमितता.

सर्वसाधारण रोकडवही तपासली असता ओरीयेटल बॅक ऑफ कॉमर्स मधील खाते क्र.0882101004710 मध्ये खालील अनियमितता निदर्शनास आल्यात.

अ.क्र	प्रमाणे व दिनांक	वर्णन	प्रमाणकाची एकुण रक्कम (रुपये)	अनियमितता
1	145 14/7/2018	अति.सुरक्षा अनामत	1717617/-	सदर दिवशी सुरक्षा अनामत रु.988763/- व अति.सुरक्षा अनामत रु.1717617/- अशी एकुण रक्कम रु.2716380/- प्रमाणकामधुन वजाती करुन जमा बाजुस दर्शविण्यात येवुन तेवढीच रक्कम बँकेत सुध्दा भरण्यात आली परंतु रोकडवहीत खर्च बाजुस फक्त रक्कम रु.1717617/- दर्शविण्यात आल्यांने रक्कम रु.988763/- ,खर्च बाजुस कमी दर्शविण्यात आलेली आहे.
2	18/7/2018	कामगार कल्याण उपकर	295252/-	खर्च दर्शविण्यात आलेली रक्कमेशी जुळत नाही.
3	18/7/2018	सुरक्षा अनामत	713830/-	सदर दि वशी रु.706903/- एवढी रक्कम खर्ची टाकण्यात आलेले रु.6927/- ने कमी रक्कम खर्ची दर्शविण्यात आली.

सदर बाबत अर्धसमास क्र.15 दि. 31/1/2019 अन्वये अनियमितता निदर्शनास आणण्यात आलेली होती.परंतु अदयाप निराकरण करण्यात न आल्याने निराकरण होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्रमांक 38 :-_महानगरपालिकेचे निधी

मिरा भाईंदर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 91 मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या विशिष्ट उद्देशासाठी वेगवेगळे 14 निधी स्थापन केले असुन त्यांची नोंद लेखा विभागाने स्वतंत्रपणे निधीच्या नोंदवहीमध्ये न ठेवता "रोखपालाची रोखवही" (नमुना नं. 18) मध्ये ठेवण्यात आली आहे.

वास्तविक प्रत्येक निधीची स्थापना करते वेळी महासभेने मंजुर केलेला ठराव क्रमांक व दिनांक, निधीसाठी द्यावयाचे अंशदान, निधी रकमेच्या गुंतवणकीवर प्राप्त झालेले व्याज, निधीचा वापर केला असल्यास त्याचा तपशील व शेवटची शिल्लक असे संपुर्ण तपशील दर्शविणारी स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सदर बाब दि. 07/03/2019 रोजीच्या अर्धसमास क्रमांक 52 अन्वये लेखा विभागास कळविली असुन याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहेत.

परीच्छेद क्रमांक 39 :- शिलकी पैशाची गुंतवणुक..

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 92 नुसार नगरपालिका निधीत जमा असलेल्या ज्याशिलकी पैशाचा विनियोग ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल तो पैसा व्याजाने शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे कळविलेल्या बँकामध्ये गुंतविणे आवश्यक आहे. त्यासाठी कलम 92(2) बँकामध्ये विहित कार्यपध्दती नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने सर्व गुंतवणुकी करतील तथापि माहे जुलै 2018 ते सप्टे 2018 या कालावधीतील लेखाचे लेखापरीक्षण करताना 14 वा वित्त आयोग व विकास निधीच्या खात्यामध्ये खालील प्रमाणे निधी गुंतवणुकी विना असाच पडुन असल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे गुंतवणुकी पासुन मिळणारी व्याजीची रक्कम मनपास मिळु शकली नाही.

अ.क्र	खात्याचे शिर्षक	दिनांक	गुंतवणुकी विना (IDLE) खात्यामध्ये असलेली रक्कम (रु)
1	14 वा वित्त आयोग	31/7/2018	69,31,200/-
		31/8/2018	20,47,59,114/-
		30/9/2018	20,47,81,470/-
2	विकास निधी	31/7/2018	19,26,46,273/-
		31/8/2018	21,10,44,610/-
		30/9/2018	33,48,57,641/-

तरी उपरोक्त खाती व अशाच प्रकारे विनावापर इतर खात्यामधील निधी तात्काळ आवश्यकता नसल्यास त्याचे योग्य प्रकारे नियोजन करुन उपरोक्त अधिनियमातील कलम 92 व शासन निर्णयानुसार गुंतवणुक करणे आवश्यक आहे. जेणे करुन प्राप्त होणा-या व्याजाचे नुकसान होणार नाही.

परिच्छेद क्रमांक 40 :- मनपाने, इतर उपयोगिता संस्थेकडे जमा केलेल्या ठेवीबाबत.

मनपा प्रशासनाने, अन्य उपयोगिता संस्थाकडून (Utility Departments) त्यांच्या सेवा घेण्यासाठी उदा. विद्युत पुरवठा सेवा, दुरध्वनी सेवा व अन्य तत्सम विविध सेवा घेण्यासाठी अशा संस्थाच्या नियमास अधिन राहून, त्यांच्याकडे सुरक्षा ठेव ठेवीची रक्कम जमा करणे आवश्यक असते. तसेच अशा सेवांची आवश्यकता नसल्यास/त्या रद्द केल्यानंतर जमा केलेली ठेव रक्कम परत घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

सबब, मनपाने अशा संस्थांकडे जमा केलेल्या ठेवींचा अद्यावत तपशील नोंदवही लेखा परिक्षणासाठी सादर करणे बाबत दि.12/3/2019 रोजीच्या अर्धसमास क्र.56 अन्वये लेखाविभागास कळविण्यात आले आहे. तथापि याबाबतचा लेखाविभागा तपशील अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्रमांक 41 :- अग्रीम समायोजन न केल्याबाबत..

1) अग्रीम विभागाने ठेवलेल्या अग्रीम नोंदवहीचे अवलोकन केले असता असे दिसुन आले कि, वर्ष 1993-94 पासुन दि 31.3.2018 पर्यंत महानगरपालिकेच्या विविध विभागांनी त्याच्या विभागातील काही विशिष्ठ कार्यपुर्ती साठी लेखा विभागाकडुन 116 प्रकरणामध्ये रु.76.07/- लाख रक्कमेचे अग्रीम घेतले होते. यासंबंधित प्रचलित नियमानुसार अग्रीम रक्कमेचा तपशिलवार लेखा ठराविक कालमर्यादे मध्ये सादर करणे आवश्यक आहे. तसेच अग्रीम रक्कमे पैकी खर्च न झालेल्या रक्कमेचा भरणा तात्काळ करणे अवश्यक आहे. तथापि खर्च न झालेल्या रक्कमेचा पुर्ण भरणा केल्याची एकही बाब लेखा परीक्षणाच्या निदर्शणास आली नाही.

2) दि 31/3/2018 पर्यंतच्या रु.76.07/- लाख रक्कमेचा समावेश असलेल्या 116 प्रकरणा पैकी केवळ 22 प्रकरणामधील रु.14.49/- लाख रक्कमेचे तपशिलवार लेखे बंद असुन उर्वरीत रु.61.58/- लाख रक्कमेचा समावेश असलेले 94 प्रकरणे अदयाप प्रलंबित आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

प्रलंबित अग्रीम प्रकरणांचे विवरणपत्रक					
अ.क्र	नाव	ठेवीचा तपशिल	पावती क्रमांक	दिनांक	रक्कम (रु)
१	श्री. चारुदत्त नाईक	सर्वेक्षण अग्रिम	-	०१/०४/१९९३	१०,०००
२	श्री. सुरेश सोनसळे	बांधकाम विभाग		११/०१/१९९५	२,०००
३	श्री. सचिन जुवेकर	पाणी	४०९	१०/०६/१९९४	१०,०००
४	श्री. सुरेश सोनसळे	अग्रिम		१०/०७/१९९५	२५,०००
५	श्री. सुरेश सोनसळे	अग्रिम		१८/०८/१९९५	१५,०००
६	कै. श्री सुधाकर राणे	पाणी	२१८	२१/०५/१९९६	१०,०००
७	कै. श्री सुधाकर राणे	पाणी	७०५	०६/०८/१९९६	१०,०००
८	श्री. शंकर कुलकर्णी	क्रिडा	८८१	१४/१२/१९९६	१४,७७३
९	श्री. यशवंत भालेराव	निवडणुक अग्रिम	२६०	१५/०७/२००२	१०,०००
१०	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	१२४५	२६/१०/२००७	३,४८,७५०
११	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	१२६६	०१/११/२००७	२,८४,९६९
१२	डॉ. नंदकिशोर लहाने	जागतिक क्षयरोग	२३२२	२५/०३/२००८	१५,०००
१३	श्री. बाळू विंगीयन	वैद्यकिय अग्रिम	५२	०४/०५/२००९	६०,०००
१४	शिक्षण मंडळ	शिक्षणदिन अग्रिम	५०३	१५/०९/२०१०	९०,०००
१५	डॉ. बी.डी. चकोर	रुग्नालय खरेदी	६५८	२६/१०/२०१०	५०,०००
१६	डॉ. नंदकिशोर लहाने	आरोग्य कार्यक्रम	१११२	२४/१२/२०१०	३०,०००
१७	डॉ. नंदकिशोर लहाने	पल्स पोलिओ	१३०८	३१/०१/२०११	१,६३,८३०
१८	डॉ. नंदकिशोर लहाने	पल्स पोलिओ	१३६१	१५/०२/२०११	१,६१,४३०
१९	डॉ. नंदकिशोर लहाने	पल्स पोलिओ	१४१५	२३/०२/२०११	९,०००
२०	डॉ. प्रिया सुजित लडके	पल्स पोलिओ	१९४७	३१/०३/२०११	१,६३,८६०
२१	श्री. नागेश इश्वर	जागतिक पर्यावरण दिन	१६७	२४/०५/२०११	२५,०००
२२	श्री. हंसराज मेश्राम	जागतिक पर्यावरण दिन	१६८	२४/०५/२०११	२५,०००

२३	मुख्य वैद्य अधिकारी	पल्स पोलिओ	२१७	२७/०५/२०११	१,६२,३३०
२४	श्री. राजकुमार घरत	विनतारी प्रवास खर्च	५०४	२१/०७/२०११	२०,०००
२५	श्री. वासुदेव शिरवळकर	निवडणुक अग्रिम	२१४८	२०/०३/२०१२	५०,०००
२६.	डॉ. प्रमोद पडवळ	रुग्नालय कपडे धुलाई	२२७२	२७/०३/२०१२	२०,०००
२७	प्र.मुख्य वैद्य. अधिकारी	आरोग्य कार्यक्रम	२२७३	२७/०३/२०१२	१०,०००
२८	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	३०	२७/०३/१२	१,७९,७००
२९	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	३६	२१/०४/२०१२	२,७९,७००
३०	श्री. अविनाश जाधव	आपातकालीन	१४८	२१/०५/२०१२	५०,०००
३१	श्री. दादासाहेब खेने	आपत्कालीन	१४९	२१/०५/२०१२	५०,०००
३२	श्री. चंद्रकांत बोरसे	आपत्कालीन	१५०	२१/०५/२०१२	५०,०००
३३	श्री. हंसराज मेश्राम	जागतिक पर्यावरण दिन	१७५	२५/०५/२०१२	१०,०००
३४	कै. श्री. सय्यद अजहर मोदी	वैद्यकिय अग्रिम	२३९	०८/०६/२०१२	१,५०,०००
३५	श्री. प्रशांत केसरीनाथ पाटील	निवडणुक अग्रिम	२५३	१९/०६/२०१२	५,०००
३६	श्री. दिलिप जगदाळे	निवडणुक अग्रिम	४४०	१७/०७/२०१२	५०,०००
३७	श्री. प्रशांत पाटील	निवडणुक अग्रिम	४४४	१७/०७/२०१२	२५,०००
३८	श्रीम. लॉरेटा घाडगे	निवडणुक भत्ता वाटप	६०२	०६/०८/२०१२	२,२००
३९	श्री. दिपक सावंत	निवडणुक अग्रिम	६१२	१३/०८/२०१२	५,२५,०००
४०	श्री. अनिल राठोड	डास नियंत्रण	७२३	१०/०९/२०१२	४०,०००
४१	डॉ. प्रमोद पडवळ	रुग्नालय फर्निचर	७५१	१७/०५/२०१२	१,९९,६६९
४२	श्री. प्रशांत पाटील	सर्व धर्मिय उत्सव	९१२	१८/१०/२०१२	२५,०००
४३	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	१०४१	०९/११/२०१२	२,११,२८०
४४	डॉ. प्रमोद पडवळ	पल्स पोलिओ	१०४२	०९/११/२०१२	२,११,२८०
४५	श्री.प्रकाश पाटील	वाहन दुरुस्ती	१२९१	२१/१२/२०१२	१४,५८२
४६	डॉ. प्रमोद पडवळ	वाहन दुरुस्ती	१३४२	३१/१०/२०१३	६,२००
४७	श्री. रामचंद्र आसोदेकर	पोस्टेज खर्च	१४६२	३०/०१/२०१३	६,३७५
४८	श्री. धनंजय कनोजे	अग्निशमन	१४४	०५/०६/१३	५०,०००
४९	वैदयकीय अधिकारी	अग्रिम	३९४	१०/०७/२०१३	१५,०००
५०	आर.एम.परदेशी	झेरॉक्स कामी	७३९	०५/०९/२०१३	२५,०००
५१	वैदयकीय अधिकारी	अग्रिम	९३२	०८/१०/२०१३	१०,०००
५२	श्री. अनिल राठोड	अग्रिम	१३४७	१८/१२/२०१३	५०,०००
५३	श्रीम. डेल्सी कोळी	अग्रिम	१४६२	०७/०१/२०१४	९,३७१
५४	श्री. कैलास सातपुते	अग्रिम	१५३७	२०/०१/२०१४	२०,०००
५५	श्री. हेमंत पाटील	अग्रिम	१८७८	२९/०३/२०१४	१०,०००
५६	श्री. अलगुमणी	अग्रिम	१८७९	२९/०३/२०१४	२,०६०
५७	श्री. स्वप्नील सावंत	अग्रिम	१४९	०२/०६/२०१४	५०,०००
५८	वैदयकीय अधिकारी	अग्रिम	१९४	२५/०६/२०१४	१०,०००
५९	श्रीम. दिपाली पोवार	अग्रिम	०३	०३/०४/२०१४	३०,०००

६०	श्री. चंद्रकांत बोरसें	अग्रिम	८६२	०७/०१/१५	५०,०००
६१	श्री. हेमंत पाटील	अग्रिम	८८७	१९/०१/२०१५	१५,०००
६२	श्री. दयानंद गाडे	अग्रिम	७५	२२/०५/२०१५	१०,०००/-
६३	श्री. गणेश गोडगे	अग्रिम	७६	२२/०५/२०१५	५६३५/-
६४	श्री.प्रमोद पडवळ	अग्रिम	१६५	३०/०६/२०१५	१५०००/-
६५	श्रीम. दिपाली पोवार	अग्रिम	१६६	३०/०६/२०१५	५००००/-
६६	श्री. प्रशांत के पाटील	अग्रिम	२२५	१६/०७/२०१५	२५,०००/-
६७	श्री. अविनाश जाधव	अग्रिम	६०३	०७/११/२०१५	१५०००/-
६८	श्री.स्वप्नील सावंत	अग्रिम	६०५	०७/११/२०१५	१५०००/-
६९	श्री.दिलीप जगदाळे	अग्रिम	६०६	०७/११/२०१५	१५०००/-
७०	श्री. शरद पाटील	अग्रिम	६४७	०४/१२/२०१५	१२४७/-
७१	श्री. मकरंद फुलझेले	अग्रिम	७६५	१२/०१/२०१६	५०,०००/-
७२	श्री.दिलीप उघडे	अग्रिम	८८७	१२/०२/२०१६	१५००००/-
७३	श्री. सु. मो. देशमुख	अग्रिम	१०४३	०१/०४/२०१६	१०,०००/-
७४	श्री. नरेंद्र घरूहाण	१५ ऑगस्ट अग्रिम	२३६	०६/०५/२०१६	२१,६२०/-
७५	शहर क्षयरोग अधिकारी	अग्रिम	१८८	१९/०७/२०१६	२,६०,६६१/-
७६	श्री. नितीन मुकणे	आर्बिट्रेशन अग्रिम	५४२	२३/११/२०१६	२०,०००/-
७७	श्री. सु. मो. देशमुख.	शिक्षण अग्रीम	६४५	१७/०१/२०१७	१००००/-
७८	श्रीम. स्वाती देशपांडे	स्टेशनरी		०६/०३/२०१७	४००००/-
७९	श्री. संदीप शिंदे	पाणी पुरवठा अग्रीम		२८/०४/२०१७	१,२५,०००/-
८०	श्री.राजकुमार कांबळे	पाणी पुरवठा अग्रीम		२८/०४/२०१७	१,२५,०००/-
८१	श्री.राम बांबळे	दावे.खटले खर्च		२१/०६/२०१७	१०४३०/-
८२	श्री. नागेश विरकर	वृक्षरोपन अग्रिम		०७/०७/२०१७	५०,०००/-
८३	श्री. जितेंद्र कांबळे	निवडणुक अग्रिम		२६/०७/२०१७	५०,०००/-
८४	श्री. बाबुराव वाघ	निवडणुक अग्रिम		२६/०७/२०१७	५०,०००/-
८५	श्री. जितेंद्र कांबळे	निवडणुक अग्रिम		१०/०८/२०१७	५०,०००/-
८६	श्री. दिपाली जोशी	निवडणुक अग्रिम		१०/०८/२०१७	५०,०००/-
८७	श्री. सचिन सुर्वे	निवडणुक अग्रिम		१०/०८/२०१७	५०,०००/-
८८	श्री. नागेश संखे	निवडणुक अग्रिम		१०/०८/२०१७	५०,०००/-
८९	श्री. सचिन सुर्वे	निवडणुक अग्रिम		१०/०७/२०१८	५०,०००/-
९०	श्री. राजमणिकम सुप्पन	वैद्यकिय प्रतिपुर्ती		२८/०९/२०१७	१,५०,०००/-
९१	श्री. राहुल भोईर	पोषण पुर्नवसन अग्रिम		२१/०९/२०१७	१,००,०००/-
९२	श्री. अनिल अनंत कवडे	वैद्यकीय खर्च		१९/०१/२०१८	१,५०,०००/-
९३	श्री.दिपाली जोशी	क्रिडा अग्रिम		२३/०१/२०१८	५०,०००/-
९४	डॉ. आनंद पांचाळ	रुग्णालय देखभाल दुरुस्ती		२३/०३/२०१८	१,००,०००/-
	एकुण				४१,५८,०२२

दि 1/4/2018 पासुन देण्यात आलेल्या परंतु दि 30/9/2018 पर्यंत समायोजित न झालेल्या अग्रीमांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	अग्रीम घेणा-या कर्मचारी/अधिका-यांचे नांव	रक्कम	अग्रीम घेतलेला दिनांक
१	श्रीम. दिपाली जोशी	२००००/-	२६.४.२०१८
२	श्री. अर्जुन माचीगर	१५००००/-	५.५.२०१८
३	श्रीम. लॉरेटा घाटगे	२०००/-	१५.५.२०१८
४	श्री. चंद्रकांत बोरसे	१००००००/-	१५.५.२०१८
५	डॉ.जगेश पाटील (पल्स पोलिओ)	१४७७०/-	२.८.२०१८
६	डॉ.वंदना पाटील (पल्स पोलिओ)	२४१२०/-	२.८.२०१८
७	डॉ.ब्रिजेश पटेल (पल्स पोलिओ)	८८९०/-	२.८.२०१८
८	डॉ.ब्रिजेश पटेल (पल्स पोलिओ)	१५७६०/-	२.८.२०१८
९	डॉ.चंद्रशेखर कांबले (पल्स पोलिओ)	५३१४०/-	२.८.२०१८
१०	डॉ.संदीप प्रधान (पल्स पोलिओ)	३८३००/-	२.८.२०१८
११	डॉ.तेजस्वीनी लांजेकर (पल्स पोलिओ)	४४३५०/-	२.८.२०१८
१२	डॉ.अशोक पडवी (पल्स पोलिओ)	३३७८०/-	२.८.२०१८
१३	डॉ.अरविंद काकडे (पल्स पोलिओ)	२३१६०/-	२.८.२०१८
१४	श्री. अविनाश जाधव	४००००/-	२३.८.२०१८
१५	श्री. दादासाहेब खेत्रे	२५०००/-	२९.८.२०१८
१७	श्रीम. दिपाली जोशी	४०६४००/-	१०.९.२०१८
	एकुण	८,७४,६७०/-	

1) उपरोक्त तपशिलावरुन असे स्पष्ट होते की, पुर्वी दिलेल्या अग्रीमचा तपशिलवार लेखा सादर न करता व अग्रीम समायोजन न करता त्याच कर्मचारी/ अधिका-यास पुन्हा एकापेक्षा जास्त अग्रीम दिले असून वर्षानुवर्ष अग्रिम प्रलंबित आहेत. अशा प्रकारे सन 1992 ते माहे सप्टेंबर 2018 अखेर रु.70.33/- (61.58+8.75) लाख रक्कमेचा समावेश असलेली 111 (94+17) अग्रीम प्रकरणे वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत.

2) प्रचलित नियमानुसार अग्रीम समायोजनासाठी कमाल 60 दिवसांची मुदत असुन मुदतीमध्ये समायोजन न झाल्यास रक्कम नगरपालिकेची हानीसमजुन सक्तीच्या उपाययोजना करुन संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांचे कडुन वसुल करणे आवश्यक आहे. तथापि प्रलंबित प्रकरणे व त्यास समाविष्ठ असलेली रक्कम यांचा विचार करता विभागाने याबाबत कोणतीही दृश्य कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

सबब अग्रिम रक्कमातील उपरोक्त गंभीर अनियमितता विचारात घेतल्यास प्रलंबित प्रकरणाचे समायोजन करण्यासाठी योग्य ती उपाय योजना त्वरीत करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्रमांक 42 :- कंत्राटदारा कडुन घेण्यात आलेली बॅंक हमीपत्रे मुदतबाह्य झाल्याबाबत..

सन 2018 ते 2019 या कालावधीमधील जमा खर्चाचा आढावा घेताना लेखाविभागाच्या सुरक्षा कक्षामध्ये (safe custody) जतन केलेल्या बॅंक हमीपत्राची पडताळणी केली असता असे आढळुन आले कि, महापालिकेची विविध कामे कंत्राटदाराना देताना महापालिकेचे आर्थिक हित सांभाळण्यासाठी कंत्राटदारामकडुन बॅंक हमी पत्रे घेतली जातात. त्यानुसार माहे जुलै ते सप्टे.18 या कालावधी मध्ये मुदतपुर्ती होणारी विविध कंत्राटदारा कडुन रु.417 लाख रु हमी असलेली खाली दर्शविण्यात आलेली 48 बॅंक हमीपत्रे घेण्यात आली होती. सदर सर्वच हमीपत्रे दि. 30.9.2018 पर्यंत मुदत बाह्य झाल्याचे आढळुन आले. तथापि सदर कंत्राटदारांची कामे पुढे चालु असल्यास कालबाह्य झालेल्या सर्व हमीपत्रांची मुदत वाढ करुन घेतली किंवा कसे याची खातरजमा करण्यासाठी लेखा विभागाने कोणतीही कागदपत्र लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिली नाहीत.

बॅंक गॅरंटीचे विवरण पत्र

अ.क्र.	कंत्राटदाराचे नाव	बॅंक गॅरंटी नंबर	रक्कम रु (लाख)	देय दिनांक
1.	ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट	32	5	01/07/2018
		23	5	01/07/2018
		26	5	01/07/2018
		22	43.86	01/07/2018
		26	23.00	01/07/2018
		39	20.00	01/07/2018
		21	7.84	01/07/2018
		40	10.50	01/07/2018
2.	विकास इंटरप्रायजेस	715	1.52	02/07/2018
3.	चिरंतन उद्योग	121	4.50	03/07/2018
4.	कांचन कं.	23	0.51	10/07/2018
5.	रिद्दीका	03	9.825	11/07/2018
6.	एम.एस.इंटरप्रायजेस	915	1.40	13/07/2018
		815	0.42	13/07/2018
7.	ए. व्ही. आय.	33787	11.36	17/07/2018
8.	राठोड ब्रदर्स	05	14.65	17/07/2018
9.	आर.एस. कं.	180073	7.18	22/07/2018
10.	कांचन कं.	029	0.35	03/09/2018
11.	कांचन कं.	030	1.21	03/09/2018
12.	श्री साई गणेश	बी.वाय.डी /10	1.37	10/09/2018
13.	आर.ॲण्ड बी इन्फ्रा.	249	12.77	11/09/2018
14.	राठोड ब्रदर्स	35	0.79	14/09/2018
	राठोड ब्रदर्स	34	1.37	14/09/2018
	राठोड ब्रदर्स	32	0.80	14/09/2018
15.	मुस्कान इंटरप्रायजेस	04	0.74	14/09/2018

		03	00.62	14/09/2018
		05	0.75	14/09/2018
		06	0.70	14/09/2018
16.	ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट	5	14.42	29/09/2018
		44	10.00	29/09/2018
		33	14.42	29/09/2018
		50	23.00	29/09/2018
		25	14.37	29/09/2018
		41	29.00	29/09/2018
		28	14.00	29/09/2018
		23	7.50	29/09/2018
		3	7.25	29/09/2018
		44	5.00	29/09/2018
		32	21.00	29/09/2018
		24	00.50	29/09/2018
17.	आर.एस.कं.	150319	11.36	30/09/2018
18.	श्री. इंटरप्रायजेस	384	0.49	30/09/2018
19.	आर.एस.कं.	160272	3.57	30/09/2018
20.	ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट	22	43.86	30/09/2018
		23	5.00	30/09/2018
		26	5.00	30/09/2018
		32	5.00	30/09/2018

या संदर्भात दि.1.3.19 रोजीच्या अर्थसमास क्र. 50 अन्वये सदर बाब लेखाविभागास कळविली होती. तथापि याबाबतचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्रमांक 43 :- वाढीव आयकर कपाती बाबत..

माहे जुलै ते सप्टे २०१८ या तिमाही मधील प्रमाणकामधील ठेकेदारांच्या देयकातुन सरसकट २.२४% दराने आयकर कपात करुन संबंधित कार्यालयास भरण्यात आली आहे. वास्तविक वित्त अधिनियम २००९ (FINANCE ACT २००९) नुसार दि.१९/८/२००९ पासुन रु. १ कोटीच्या वरील फॉरेन कॉर्पोरेटसाठीच फक्त सरचार्ज अनुज्ञेय आहे. इतर प्रदानांना सरचार्ज अनुज्ञेय नाही.म्हणजेच दि. १९/८/२००९ पासून फक्त २% आयकर कपात होणे आवश्यक होते.

याबाबत लेखाविभागास अर्धसमास क्र.०५ दि.१७/१/१९ नुसार विचारणा केली असता यापुढे दक्षता घेण्यास येईल असे कळविण्यात आले आहे.

परिच्छेद क्रमांक 44 :- वस्तु व सेवा कराच्या (GST) कपातीबाबत

केंद्र शासन वित्त मंत्रालय सेंट्रल बोर्ड ऑफ इनडायरेक्ट टॅक्सेस आणि कस्टम्स यांचे अधिनियम क्र.५०/२०१८ सेंट्रल टॅक्स दि.१३/९/२०१८ व महाराष्ट्र शासनाची महाराष्ट्र वस्तु व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसुचना क्र.५०/२०१८ राज्यकर दि.१८/९/१८मधील कलम ५१ मधील तरतुदीची अंमलबजावणी दि.१/१०/२०१८ पासुन करावयाचे निर्देश आहेत सदर कलमानुसार कार्यालयाच्या स्तरावर आहरण व संवितरण अधिकारी यांनी बजातदार या नात्याने वस्तु किंवा सेवा अथवा दोन्ही अंतर्भुत असलेल्या देयका मधुन २% कर (TDS) वजावटी करावयाची आहे.

तथापि माहे जुलै ते माहे सप्टे.२०१८ या कालावधीच्या देयकामधुन वक्त कराच्या अंमलबजावणीच्या दिनांकापुर्वी पासुन देयकामधुन २% (TDS) कर कपात करण्यात आला आहे.याबाबत अर्धसमास क्र.१३ दि.३१/१/१९ अन्वये खुलासा करण्यास कळविले असता राज्यकर आयुक्त महाराष्ट्र शासन यांचे कडील (TRADE CIRCULAR 27 T 2017) दि.७/७/१७ संबंधित विभागाने कपात केलेली व त्याचे लेखापरीक्षण विभगाकडुन लेखापरीक्षण झाल्यानंतर जी.एस.टी (TDS) शासनास भरणा करण्यात दिरंगाई होऊ नये या उददेशाने शासकिय कोषागारात भरणा केल्याचे व (GST) उपायुक्त यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरात दि.९/१०/१८ पुर्वीचा (GST) शासनास जमा न करण्याचे सांगितल्याने माहे जुलै १८ ते सप्टे १८ या कालावधीतील GST (TDS) शासनास जमा न करता शासकिय कर खात्यावर जमा करुन परताव्याची कार्यवाही सुरु असल्याचे लेखा विभागाने कळविले आहे. तथापि सदरचा खुलासा मान्य करण्यायोग्य नसून लेखा विभागाने शासनाच्या कोणत्याही आदेशा विना नियमबाहय पणे सदर रक्कमा कपात केल्या असुन याबाबत विधी विभागाचे अभिप्राय घेवुन केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन सादर करावे.

परीच्छेद क्रमांक 45 :- देयकातुन कपात केलेल्या कामाच्या विम्याची रक्कम शासकिय विमा निधीकडे भरणा न केलेबाबत..

महाराष्ट्र शासन नगरपरीषद विभाग यांचे परीपत्रक क्र.जीईएन/१०९८/१३५७/ प्र.क्र.१६६/९८-२४ दि. ३/११/१३ अन्वये ठेकेदारांच्या देयकामधुन कपात केलेली १% रक्कम शासकिय विमा निधीकडे भरणा करण्यात आली नसल्याचे निर्दशनास आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

सन	विमा दंड शुल्क
२०१४-१५	६२,२८,०००
२०१५-१६	२,३१,८९,०००
२०१६-१७	४३,७३,०००
२०१७-१८	१,००,००,०००
२०१८-१९	१२,६३,०००
एकुण	४,५०,५३,०००

वास्तविक कंत्राटदार / ठेकेदार यांना देण्यात आलेले कार्यादेश / करारनामा मध्ये विम्याच्या कपातीच्या तरतुदी प्रमाणे देयकामधुन कपात करण्यात आलेली विम्याची रक्कम त्वरीत शासकीय विमा संचलनालयात जमा करावयाची असुन सदरची रक्कम अद्यापपर्यंत शासन खाती जमा न करता विमा दंड/शुल्क म्हणुन लेख्यामध्ये जमा दर्शविली आहे. याबाबतची माहिती अर्थसमास क्र.२१ दि.०१/०९/२०१८ अन्वये मागविण्यात आली होती. लेखा विभागाने पत्र क्र.मनपा/लेखा/४००/२०१८-१९ दि.०९/१०/२०१८ अन्वये विम्याची रक्कम ज्या देयकातून कापात केलेली आहे ती कामे पूर्ण होऊन पहिले आणि शेवटचे देयक ठेकेदारास देण्यात आलेले आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकात विम्याची रक्कम समाविष्ट केलेली असून ठेकेदाराने विम्याची रक्कम न वापरल्याने ती दंड म्हणून देयकातून वसूल करुन महापालिकेच्या खात्यावर ठेवण्यात आलेली आहे. विम्याची रक्कम शासन परिपत्रकाप्रमाणे शासकीय विमा निधीकडे जमा करणे आवश्यक आहे. केलेला खुलासा परिच्छेदास अनुसरुन नाही.

परिच्छेद क्रमांक 46 :- आवश्यकता नसलेली बँक खाती बंद करणे बाबत...

असे निदर्शनास आले आहे कि, सर्वसाधारण राकडवही मधील व्यवहारासाठी ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स व इंडियन बँक या बँकेमध्ये खाती उघडण्यात आली आहेत. त्यापैकी इंडियन बँकेमध्ये संपुर्ण वर्षात फक्त मुद्रांक शुल्क अनुदानाची रक्कम जमा होत असुन खर्च नगण्य आहे.

तसेच विकास निधीसाठी सुध्दा बँक आफ महाराष्ट्र व देना बँकेमध्ये खाती उघडण्यात आली असुन देना बँके कडील खात्यात काहीही व्यवहार झालेले नाहीत. तरी सदर खाती व इतर निष्क्रिय खाती असल्यास त्याची व्यवहार्यता तपासुन अनावश्यक खाती बंद करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्रमांक 47 :- कामगार कल्याण उपकर व आयकर कपात न करणे बाबत.

असे निर्दशनास आले कि रस्ता दुरुस्ती खात्याअंतर्गत माहे जुलै ते सप्टे१८ या कालावधीतील पमाणक क्र.५ दि.१५/९/१८ मे. आशापुरा कंन्ट्र. कंपनी रक्कम रु. १४५५६७२७/ मधुन कामगार कल्याण उपकराची **रक्कम** कपात करण्यात आलेली नाही. वास्तविकतः महाराष्ट्र शासन उघोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. १७/६/२०१० नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियम व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ तसेच इमारत व इतर बांधकाम कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १% कामगार कल्याण उपकर कपात करणे आवश्यक आहे.तसेच वृक्षसंर्वधन निधीअंतर्गत माहे जूलै ते सप्टे.१८ या कालावधीमधील प्रमाणक क्र.०५ दि.२८/८/१८ मे. बाबा प्लेवर्ल्ड व सासंगो इंड. मधुन आयकर कपात करण्यात आलेली नाही.

तरी उपरोत ठेकेदारांच्या सुरक्षा अनामती मधुन सदरच्या कपाती करुन शासनजमा होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्रमांक 48 :- बॅंक ताळमेळ न घेतल्याबाबत..

नॅशनल म्युनिसीपल अकांऊटींग मॅन्युअल २००४ मधील नियम क्र.३०.५ अन्वये रोखवही व बॅंक शिल्लकेचा मासिक ताळमेळ घेणे आवश्यक आहे.सदरच्या ताळमेळ मॅन्युअल मधील नियम क्र.३०.७ मधील विहित पध्दतीचा अवलंब करुन टेबल क्र.३०.२ मध्ये ताळमेळ पत्रक तयार करणे आवश्यक आहे.सदर कार्यपध्दती बाबत अर्धसमास क्र.२ दि.३/०१/१९ अन्वये विचारणा करण्यात आली असता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९३ नुसार मा. स्थायी समितीने विहित केलेल्या नमुन्यामध्ये लेखे ठेवण्याची तरतुद असुन मा. स्थायी समिती ठराव क्र.९ दि.१०/१०/०२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ प्रमाणे विहित नमुन्यात ठेवण्यास मंजुरी दिली असल्याने त्यानुसार लेखे ठेवण्यात येत असल्याचे कळविले आहे.व सोबत ताळमेळ पत्रके जोडली असल्याचे नमुद आहे तथापि लेखा विभागाने महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिते मधील नियम क्र.५१(३) नुसार काही मोजक्या खात्याचे ताळमेळ पत्रक सादर करण्यात आले आहे.व ज्या खात्याचे ताळमेळ पत्रक सादर करण्यात आले आहेत्यामध्ये सुध्दा त्रुटी निर्दशनास आल्या आहेत. माहे जुलै १८ ते सप्टे १८ या तिमाही कालावधीच्या जमा व खर्च तपासणी वेळी खालील अनियमितता विविध अर्धसमासाध्दारे निदर्शनास आणण्यात आल्या आहेत.

अ. क्र	अर्धसमास क्र. व दिनांक	निधीचे शिर्षक	बॅंकेचे नाव व खाते क्र.व त्यानुसार दि.३०/९/१८ ची शिल्लक	रोखवहीनुसार दि३०/९/२०१८ ची शिल्लक	आक्षेप
०१	२० ५/१/२०१९	जनरल फंड	एच.डी.एफ.सी ५०१००१७४९६०५०७ रु.१६५८४६१७.८७	रु.१२८५१३८३.४५	फरकाची रक्कम रु.३७२९२३४.१२/- ही कोणत्या बाबीमुळे आली त्याचे विवरण न देता (BANK CREDITED BUT NOT SHOWN IN CASH BOOK) असे मोघम कारण नमुद करुन ताळमेळ पत्रक सादर करण्यात आले आहे. तरी उपरोक्त फरकाच्या रक्कमेचा सविस्तर शोध घेवुन त्या रक्कमेचे विवरणासह ताळमेळ पत्रक सादर करणे आवश्यक आहे.
०२	१९ ०२/२/२०१९ व ४५ २१/२/२०१९	मालमत्ता कर	अ) एच.डी.एफ.सी ५०२०००७४५४२२५ रु.४३११०५४६/-	रु.५०४४०८८/-	फरक रु.६७२३३४५८/- सदरच्या ताळमेळ पत्रामध्ये माहे एप्रिल १८ पासुन (BANK CHARGES) या अंतर्भाव करण्यात आला आहे.सदर बॅंक चार्जेसचा अंतर्भाव त्या त्या मासिक ताळमेळ पत्रकामध्ये होणे आवश्यक होते.ताळमेळ पत्रकामधील न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु.३९५१००२३/- दर्शविण्यात आली आहे. तथापि धनादेशाचा तपशिल देण्यात आलेला नाही. सदर खात्याचे त्रैमासिक कालावधीमध्ये फक्त दि.२५/७/१८,१४/८/१८, २०/८/१/, २९/८/१८,

अ. क्र	अर्धसमास क्र. व दिनांक	निधीचे शिर्षक	बँकेचे नाव व खाते क्र.व त्यानुसार दि.३०/९/१८ ची शिल्लक	रोखवहीनुसार दि३०/९/२०१८ ची शिल्लक	आक्षेप
					३०/८/१८ या पाच दिवसांचे बँक विवरणपत्र दिल्याने उक्त कालावधीतील उर्वरीत दिवसांचा ताळमेळ घेता आला नाही.
			ब) आय.सी.आय.सी बँक क्र.००२८०५००४१०८		रोखवही उपलब्ध करुन न दिल्याने बँक ताळमेळ पत्रक तपासता आले नाही.
			क) इंडुसइन्ड बँक २०१०००६२०११७ रु.२४८६४५६६.२६		रोखवही उपलब्ध करुन न दिल्याने बँक ताळमेळ पत्रक तपासता आले नाही.
०३	२२ ६/२/२०१९	वृक्षसंवर्धन निधी	बँक आफ इंडिया क्र.०००५२०१०००००३९५ रु.२६७३२७५.५३	रु.४५२७५९०.१९	ताळमेळ घेऊन ताळमेळ पत्रक सादर करणे आवश्यक आहे.
०४	२६ ६/२/२०१९	रस्ता अनुदान	इंडियन बँक क्र.६४४०९९६८६६ रु.८१६७२६	रु.८१७०११	वरील प्रमाणे
०५	२४ ६/२/१९	रस्ता दुरुस्ती खाते	बँक ऑफ इंडिया क्र.००८५२०१००००००३९४ रु.७३८०७५३१.०६	रु.८१८८३७५३.६७	वरील प्रमाणे
०६	२७ ७/२/१९	दलीत वस्ती सुधारणा	ओरीयंटल बँक ऑफ कॉमर्स ००९९५१०११००००९९६ रु.२१०२८१.४१	रु.२५८७८९६६.४१	वरील प्रमाणे
०७	२९ ७/२/१९	अमृत योजना हरीतक्षेत्र	इंडियन ओवरसीज बँक ३४३१०२००००००२२२ रु.२४४१८७.४४	रु.१७८४१८२	वरील प्रमाणे
८	३० ७/२/१९	आग सुरक्षा निधी	बँक ऑफ बरोडा ३१५४०२०००००९३० रु.२२१८६९.६२	रु.१४४०९७२१९.१२	वरील प्रमाणे
९	३१ ८/२/१९	पर्यटन सुविधा	इंडियन ओवरसीज बँक ३४३१०२०००००००१३४ रु.२१६०५७.९०	रु.१००६६०५७	वरील प्रमाणे
१०	३२ ८/२/१९	डी.एस.यु.पी योजना	कॅनरा बँक २४६८२०१०५९४९ रु.४८७०.६२	रु.१४६१०५४१.६२	ताळमेळ पत्रकामधील अप्रदानित धनादेश रक्कम रु.१०२५९९२७/- सर्व धनादेश ३ महिन्यापेक्षा अधिक काळाचे असल्याचे कालबाह्य धनादेशा बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.
११	३७ १२/२/१९	डि.पी रोड	इंडियन बँक ७५२९४६४७३ रु.१०६४३०	रु.२४३७७३३०	कालबाह्य धनादेश रक्कम रु. ३५२०१५ बाबत रोखवहीत जमा करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.स्वीप नोदीची पडताळणी करता आली नाही.
१२	४० १८/२/१९	नवीन पाणीपुरवठा योजना	युनियन बँक ३९२८०१०१००५०१२५		ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

अ. क्र	अर्धसमास क्र. व दिनांक	निधीचे शिर्षक	बँकेचे नाव व खाते क्र.व त्यानुसार दि.३०/९/१८ ची शिल्लक	रोखवहीनुसार दि३०/९/२०१८ ची शिल्लक	आक्षेप
१३	४१ १८/२/१९	१४ वा वित्त आयोग	इंडियन बँक ६३५७२१००११३ रु.२०४७८१४७०	रु२०४०८१९४६	ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
१४	४२ १८/२/१९	राजीव आवास योजना	ऑक्सिस बँक ९१२०१००१४९२२८१४ रु.१०३१३०३४	रु.२९५४२६०८	ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
१५	४६ २१/२/१९	आमदार निधी	बँक आफ इंडिया ००८५२०१०००००८०९९ रु.२५४७१९.१२	रु.३१९३४६४९	ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
१६	४७ २१/२/१९	खासदार निधी	आय.डी.बी.आय ०५३६१०४००००१२७११ - ०		ताळमेळ घेणे आवश्यक आहे.
१७	४८ २१/२/१९	कर्मचारी निवृत्ती वेतन	बँक आफ इंडिया ००८५२०१०००००७३९१ रु.२३८३४१.४४	रु.५५१४६१४.६४	ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त व वर नमुद नसलेल्या सर्व उर्वरीत खात्याचे ताळमेळ घेण्यात येवुन विहित नमुन्यात ताळमेळ पत्रक तयार करणे आवश्यक आहे. **विविध खात्याचे ताळमेळ न घेता जमा खर्च अहवाल तयार करणे ही बाब गंभीर असून त्यामुळे अनियमितता होण्याची शक्यता संभवते.**

परिच्छेद क्रमांक 49 :- अंतर्गत ताळमेळ संबंधी.

नॅशनल म्युन्सिपल अकाऊंटींग मॅन्युअल २००४ नियम क्र- ३०.२ प्रमाणे लेखे (चलने) एकापेक्षा अधिक विभागातुन लेखा विभागात लेखांकन करण्यासाठी उपलब्ध झाले असतील तर त्यामध्ये लेख्यासंबंधी काही चुका / उणिवा राहु नये म्हणुन विभागवार लेख्याचे लेखा विभागातील लेख्याशी दोन्ही विभागांनी ताळमेळ घेणे आवश्यक आहे. उदा. विविध विभागांचे लेखे त्या त्या विभागात व लेखा विभागात ठेवले जातात. त्यानुसार ताळमेळ घेताना दोन्ही ठिकाणी प्राप्त झालेल्या लेख्यांमधील रक्कम व प्राप्त होणारी रक्कम ही समान असणे आवश्यक आहे. या रक्कमांमध्ये तफावत असल्यास त्याप्रमाणे तफावत रक्कमांचा दोन्ही विभागांनी परस्परांशी ताळमेळ घेण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक 50 :- कार्यभारा बाबत..

महानगरपालिकेतील लेखा शाखेचे माहे जुलै २०१८ ते सप्टे २०१८ या त्रैमासिक कालावधीतील लेख्यांची तपासणी करताना दिसुन आले कि, दि. ३१/०३/२०१८ च्या दिनांकाने प्रमाणकांवर दोन वेगवेगळ्या मुख्यलेखापरीक्षकांनी स्वाक्षरी केल्या आहेत. त्या अनुषंगाने अभिलेख्याचे अवलोकन केले असता आदेश क्र.मनपा/आस्था/२०६०/२०१८ दि. २८/०३/२०१८ अन्वये महानगरपालिकेतील मुख्यलेखापरीक्षक श्री. सु.म.निपाणे यांना सेवानिवृत्तीमुळे दि. ३१/०३/२०१८ रोजी मध्यानहानंतर सेवामुक्त करण्यात येवुन त्यांचे जागी श्री. शरद बेलवटे मुख्यलेखाधिकारी यांना दि. ०१/०४/२०१८ (म.पु) पासुन मुख्यलेखापरीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याचे व सदनंतर आदेश क्र.मनपा/आस्था/०८/२०१८ दि.०३/०४/२०१८ अन्वये श्री. शरद बेलवटे यांना मुख्यलेखापरीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. ३१/०३/२०१८ (म.न) पासुन सांभाळण्याचे सुधारीत आदेश देण्यात आल्याचे दिसुन आले. सदर आदेशाच्या अनुषंगाने प्रमाणकांवर दि.३१/०३/२०१८ च्या दिनांकाने दोन्ही अधिका-याच्या स्वाक्ष-या दिसुन येत आहेत. त्यामुळे एकाच पदावर दोन अधिकारी कार्यरत असल्याने ही प्रशासकीय अनियमितता असल्याने अर्थसमास क्र.४३ दि.१८/०२/२०१९ अन्वये खुलासा करण्यास कळविण्यात आले होते. तथापि खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

तरी सदर प्रकरणी श्री. बेलवटे,मुख्यलेखाधिकारी यांनी मुख्यलेखापरीक्षक पदाचा अतिरीक्त कार्यभार सांभाळताना दि.३१/०३/२०१८ रोजी स्वाक्षरी केलेल्या प्रमाणकावरील खर्च आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. त्यास्तव श्री.बेलवटे, मुख्यलेखाधिकारी यांनी दि.३१/०३/२०१८ रोजी स्वाक्षरीत केलेली सर्व प्रमाणके लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्रमांक 51 :- प्रमाणके उपलब्ध करुन न देण्याबाबत..

महानगरपालिकेचे **सन 2018-19** या कालावधीच्या जमा खर्चाची तपासणी करताना खालील प्रमाणके लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झालेली नाहीत.

सर्वसाधारण रोकडवही

अ. क्र.	प्रमाणक क्र.व दिनांक	वर्णन	प्रमाणकाची रक्कम (रुपये)
१	१२० २/७/१८	मे. एम.एस.इंटरप्रायझेस स्वच्छ भारत अभियान	१५६२०/-
२	१२४ ५/७/१८	मे. ग्लोबल,साफसफाई	८२७६०७/-
३	१२४ ५/७/१८	मे. ग्लोबल,साफसफाई	६४०७२८/-
४	१३२ ६/७/१८	ॲड. सई वडके	५११०/-
५	१३७ ११/७/१८	नगरसेवक मानधन	२८६३०००/-
६	१४२-ब १३/७/१८	डॉ. सोनावणे मानधन	११८०००/-
७	१४३ १३/७/१८	अस्थायी अस्थापना	४०४५०/-
८	१४५ १४/७/१८	मे. ग्लोबल	१५०८५७४७/-
९	१४५ १४/७/१८	मे. ग्लोबल	१८२८६९२७/-
१०	१४५ १४/७/१८	मे. ग्लोबल	१६०६५६२६/-
११	१४८ १८/७/१८	मे.रिध्दी	३००००/-
१२	१४८ १८/७/१८	मे.रिध्दी	१५०००/-
१३	१४८ १८/७/२०१८	मे. याकॉन	९९३३३५/-
१४	१४८ १८/७/२०१८	मे. प्रकाश	८४७३९२/-
१५	१५७ १८/७/१८	ॲड. सई वडके	५०६०/-
१६	१५९ १८/७/१८	न्यु फील्ड	३३०१२४/-
१७	१५९ १८/७/१८	न्यु फील्ड	३१६८९५/-
१८	१५९ १८/७/१८	मे.सिध्दी विनायक	३७२०००/-
१९	१५९ १८/७/१८	मे. शेखर इले	३४६३४१/-

अ. क्र.	प्रमाणक क्र.व दिनांक	वर्णन	प्रमाणकाची रक्कम (रुपये)
२०	१७६ २/८/१८	पल्स पोलिओ	१४७७०/-
२१	१७६ २/८/१८	पल्स पोलिओ	१४७७०/-
२२	१७७ २/८/१८	पल्स पोलिओ	२४१२०/-
२३	१७८ २/८/१८	पल्स पोलिओ	८८९०/-
२४	१७९ २/८/१८	पल्स पोलिओ	१५७६०/-
२५	१८० २/८/१८	पल्स पोलिओ	५३१४०/-
२६	१८१ २/८/१८	पल्स पोलिओ	३८३००/-
२७	१८२ २/८/१८	पल्स पोलिओ	४४३५०/-
२८	१८३ २/८/१८	पल्स पोलिओ	३३७८०/-
२९	१८४ २/८/१८	पल्स पोलिओ	२३१६०/-
३०	१८६ ४/८/१८	श्री. वासुदेव शिरवळकर	२००००/-
३१	१९३ १३/८/१८	मे. मुसकान	३७९३०००/-
३२	२०३ १३/८/१८	मे. ग्लोबल	१४९५०३२/-
३३	२०५ १६/८/१८	मे. ग्लोबल	१६७६३३४७/-
३४	२०५ १६/८/१८	मे. ग्लोबल	१८८७३५४१/-
३५	२०५ १६/८/१८	मे. ग्लोबल	२१४२८०८५/-
३६	२०५ १६/८/१८	मे. ग्लोबल	१५५२००२६/-
३७	२०६ १६/८/१८	मे. ग्लोबल	६०५६१२०/-
३८	२०६ १६/८/१८	मे. ग्लोबल	६१९२२३८/-
३९	२०६ १६/८/१८	मे. ग्लोबल	६९७९८८०/-
४०	२०६ १६/८/१८	मे. ग्लोबल	३९११७७९/-

अ. क्र.	प्रमाणक क्र.व दिनांक	वर्णन	प्रमाणकाची रक्कम (रुपये)
४१	२१७ २३/८/१८	री. अविनाश जाधव	४००००/-
४२	२२२ २३/८/१८	मे.साई	४३९५/-
४३	२३३ २९/८/१८	श्री. दादासाहेब खेत्रे	२५०००/-
४४	२३८ ३१/८/१८	मे.महानगर	१४०४६६/-
४५	२३९ ३१/८/१८	मे.महानगर	१४९९/-
४६	२४७ १०/९/१८	अपंग शिष्यवृत्ती	१३५०००/-
४७	२४८ १०/९/१८	अग्रिम दिपाली जोशी	४०६४००/-
४८	२५२ ११/९/१८	मे. ग्लोबल	१४४१६३८/-
४९	२५२ ११/९/१८	मे. ग्लोबल	१४९५०३२/-
५०	२५७ ११/९/१८	मा.आयुक्त वाहन खरेदी	६८८४०९/-
५१	२६९ ११/९/१८	अग्रिम	७००००/-
५२	२७० १५/९/१८	नगरसेवक प्रशिक्षण भत्ता	२००००/-
५३	२७३ १५/९/१८	किरकोळ खर्च	११५००/-
५४	२७५ १५/९/१८	मे. सैनिक	५५५६३६/-
५५	२७५ १५/९/१८	मे. सैनिक	१६२४१६७/-
५६	२८० २१/९/१८	दुरध्वनी	१५९६६०/-
५७	२८२ २१/९/१८	अग्रीम विकास सावंत	३५०००/-
५८	२८६ २४/९/१८	उत्सव अग्रीम	१७९०००/-
		कर्मचारी वेतन खाते	
५९	२२ ५/७/१८	स्थायी आस्थापाना सामान्य प्रशासन	३४७७९५०/-
६०	२८ १९/७/१८	अस्थायी आस्थापाना सुरक्षा रक्षक	१९३१६७६/-
६१	२९ २७/७/१८	अतिकालीन भत्ता	३०१६०/-

अ. क्र.	प्रमाणक क्र.व दिनांक	वर्णन	प्रमाणकाची रक्कम (रुपये)
६२	३१ ३०/७/१८	व्यवसाय कर	४००/-
६३	३३ ३/८/१८	अंशदान निवृत्ती वेतन	३५९३४६१/-
६४	३५ ९/८/१८	व्यवसाय कर	९७५/-
६५	३७ १०/८/१८	पी.एफ खर्च	१२४२००/-
६६	४०,४१ २४/८/१८	अस्थायी आस्थापना सुरक्षा रक्षक	१४९८७३४/- ८०४९४/-
६७	४२ २४/८/१८	पी.एफ खर्च	१३३२००/-
६८	४५ २७/८/१८	पी.एफ खर्च	७२००/-
६९	४६ ३/९/१८	माहे. ऑगस्ट वेतन	३८२९९२४/-
७०	४८,४९ १०/९/१८.	उत्सव अग्रीम	९५४००००/-
			३३२००००/-
७१	६२ १४/९/१८	अस्थायी आस्थापना	४३२००/-

महाराष्ट्र महानगरपालिका अनियमामधील कलम १०५ (२) व प्रकरण ०३ दोन (८) नुसार लेख्यांची छाननी व लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आलेले सर्व अभिलेख उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.. तथापि उपरोक्त प्रमाणके उपलब्ध करुन न दिल्याने छाननी करता आली नाही.

परिच्छेद क्र. 52 :- जनरल फंडाच्या कॅशबुकचे बँक ताळमेळाबाबत..

लेखा विभागाने सादर केलेला जनरल फंड कॅशबुक बँकेचे ताळमेळ याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

HDFC Bank A/C-507

Bank Reconciliation Statement as on 30.06.2018

Particulars	Amount Rs.	Amount Rs.
Balance as per Cash Book		4620496.25
Add: Bank credited but not shown in cash book.	3811816.12	
Total (B)	3811816.12	3811816.12
(T/otal A+B)		8432312.37

बँकेत जमा रक्कम रु.३८११८१६.१२ रोखवहीमध्ये घेण्यात आली नाही. विभागाने बँकेत जमा केलेल्या रक्कमेचा तपशिल देण्यात आला नाही. लेखा विभागाने रोखवही मध्ये सदरील रक्कमेची नोंद न घेतल्यामुळे रक्कम लेड्यांच्या बाहेर ठेऊन लेखांकन चुकीचे झाल्याचे आढळुन आलेले आहे. सदर बाब गंभीर आहे तरी याबाबत खुलासा अर्धसमास क्र.२२ दि.०१/१०/२०१८ अन्वये मागविण्यात आला होता. तथापि आजमितीस माहिती अप्राप्त आहे.

II) लेखा विभागाने मोघम स्वरुपातील ताळमेळ सादर केल्या बाबत..

लेखा विभागाने एच.डी.एफ.सी बँक खाते क्र. 50100174960507(जनरल फंड) या खात्याचे माहे जुलै ते सप्टेंबर 2018 या कालावधीचे बँक ताळमेळ पत्रक लेखापरीक्षणास सादर केले आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

SR.NO	PARTICULARS	AMOUNT
1	CASH BOOK BALANCE AS ON 30.9.18	12855383.75
2	+ BANK CREDITED BUT NOT SHOW IN CASH BOOK	3729234.12
3	BALANCE	16584617.87
4	-BANK BALANCE AS ON 30.9.2018	16584617.87
	DIFFERENCE	NIL

उपरोक्त तपशिल विचारात घेता असे दिसुन येते कि, उपरोक्त रोकडवही व बँक पासबुक मधील शिल्लक रकमामध्ये असलेला फरक रु.3729234.12 कोणत्या बाबीमुळे आला आहे यांची खातर जमा /पडताळणी न करताच व त्याचे विवरण न देताच " BANK CREDITED BUT NOT SHOWN IN CASH BOOK " असे मोघम स्वरुपाचे कारण देवुन ताळमेळ पत्रकास अंतिम स्वरुप दिले आहे. सबब अशा मोघम स्वरुपात प्रमाणित केलेल्या व नियम 51 (3) मधील तरतूदीशी पुर्णपणे विसंगत असलेल्या बँक ताळमेळा आधारे जमा खर्चामधील संबंधित बाबींचा खातर जमा करता आलेली नाही.

सदर अनियमितता दि.5.1.2019 च्या अर्धसमास क्र.20 अन्वये लेखा विभागास कळविण्यात आली आहे. याबाबतचे स्पष्टीकरण अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र 53 :- चलनामधील रक्कम व रोकडवहीमधील नोंदीत रक्कम यामध्ये फरक असल्याबाबत....

जनरल फंडाची (एच.डी.एफ.सी) रोकडवही व संबंधित चलने नमुना (13) यांची पडताळणी करताना असे आढळुन आले कि, नगरभवन विभागाचे दि.19.9.2018 रोजीचे चलन क्र.1951 अन्वये, वस्तु व सेवा कराची रोकड रक्कम रु.2880/- जमा करण्यात आली असताना, रोकडवही मध्ये रु.2880/- ऐवजी रु.3880/- अशी नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे सेवाकर खात्यामध्ये रु. 1000/- जास्तीची जमा केल्याची आढळून येत आहे. सदर त्रुटी दि.29.1.2019 च्या अर्धसमास क्र.11 अन्वये लेखा विभागास कळविली असुन याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 54 :- गुंतवणुक

महानगरपालिकेने विविध निधीची स्थापना केली असुन निधी मधील शिल्लक रकमा राष्ट्रीयकृत बँकामध्ये गुंतविलेल्या आहेत. लेखापरीक्षण कालावधी दि. 01/04/2018 ते दि. 21/03/2019 मध्ये गुंतविलेल्या बँक ठेवीच्या नोंदवहीचे (नमुना 142) अवलोकन केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1) महानगरपालिका अधिनियम कलम 92 (2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने मनपा आयुक्त महापालिकेच्या वतीने शिल्लक रकमांची गुतवणुक बँक ठेवी व अन्य गुंतवणुकीमध्ये करील व अशाच मंजुरीने अशा रीतीने ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळी काढुन घेता येतील. तथापी, दि. 01/04/2018 ते दि. 30/06/2018 या कालावधीतील गुंतवणुकीस सक्षम प्राधिका-याची मंजुरी घेतलेली नाही तसेच जाहिर प्रसिध्दी देऊन स्पर्धात्मक दर न मागविल्याने स्पर्धात्मक व्याजदराचा फायदा महानगरपालिकेस झालेला नाही. उदा. स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेमध्ये गुंतवणुक ७% व्याजावर केली आहे. परंतु त्याच कालावधीतीत दुस-या बँकेत गुंतवणुक ६.७५% दराने केलेली दिसुन येते. त्यामुळे महानगरपालिकेचे गुंतवणुकीतील दोन्ही ठेवीवरील व्याज दरात तफावत येत असल्याने प्राप्त होणा-या व्याजाचे नुकसान झाल्याचे परिशिष्ट-1 वरुन स्पष्ट होते.

2) दि. 01/07/2018 ते दि. 30/09/2018 या कालावधीत माहे जुलै 18 मध्ये मुदतपुर्ती होणा-या ठेवींची पुनर्गुंतवणुक करण्यासाठी लेखा विभागाने राष्ट्रीय कृत बँका कडुन व्याजदराची माहिती मागविली असता विजया बँकेने रु. 1 कोटी पेक्षा कमी रक्कमेच्या ठेवीवर 500 दिवसा करीता सर्वाधिक द.सा.द.शे 7.10 व्याज दर दिल्याने, लेखा विभागाने दि.26/7/18 रोजीच्या प्रस्तावावदारे जुलै महिन्यामध्ये मुदतपुर्ती होणा-या सर्व ठेवी विजया बँकेमध्ये गुंतविण्याचे प्रस्तावित केले, त्यास मुख्य लेखा अधिकारी यांनी त्याच दिवशी म्हणजे दि.26/7/18 रोजी मंजुरी दिली.

सदर पुनर्गुंतवणुकींची पडताळणी, गुंतवणुक नोंदवही मधील (नमुना 142) नोंदी बरोबर केली असता असे आढळुन आले कि, मुख्य लेखा अधिकारी यांनी मंजुरी दिल्याप्रमाणे सर्व ठेवी विजया बँकेत 7.10% व्याजदराने ठेवणे आवश्यक असताना, तसे न करता, रु. 17.48 कोटीच्या ठेवी युनियन बँक आफॅ इंडिया मध्ये द.सा.द.शे 6.8% व्याजदराने गुंतवणुक केल्या व केवळ रु.52.22 लाख रक्कमेची एकच ठेव विजया बँकेमध्ये 7.10 व्याजदराने गुंतविण्यात आली लेखा विभागाच्या सदरच्या कृतीमुळे महापालिकेच्या एका वर्षाचे रु.5.27 लाख व्याजमहसूलाचे नुकसान झाले असुन विजया बँकेने देवु केलेल्या 500 दिवसा करीताच्या व्याजाचा विचार केल्यास रु.7.22 लाख पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान झाल्याचे परिशिष्ट-1 वरुन स्पष्ट होते.

9.06.2020

(दिग्विजय चव्हाण)
मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 9/10/2020
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र. 74 वर्ष :- 2020-21

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

लेखा विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 6.2 :- पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह लाभ कराची वसूली "भांडवली जमा" या शिर्षाखाली दर्शविण्याबाबत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 129 (अ अ) नुसार, पाणी पुरवठ्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी भांडवली कामावर केलेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्यांचा काही भाग भागविण्यासाठी, महानगरपालिकेस आवश्यक वाटेल एवढ्या, त्या कामाच्या करायोग्य मुल्याच्या, टक्केवारीने आकारावयाची, "पाणी पुरवठा लाभ कर" या नावाने ओळखली जाणारी अतिरिक्त पाणीपट्टी आणि कलम 129 (ब ब) नुसार, मलमूत्र किंवा कचरा गोळा करण्यासाठी आकारावयाचा "मलप्रवाह सुविधा लाभ कर" वसूल करण्याचे अधिकार महानगरपालिकेस दिले आहेत. त्यानुसार, वर्ष 2016-17 च्या वार्षिक जमाखर्चा मधील नोंदीनुसार, "पाणी पुरवठा लाभ कर" रु. 15.93 लाख व "मलप्रवाह सुविधा लाभ कर" रु. 1718.74 लाखाची प्रत्यक्ष वसूली झाल्याची नोंद "महसूली जमा" या शिर्षामध्ये दर्शविली आहे.

2) उपरोक्त नमूद कलम 129 (अ अ) व (ब ब) मधील वैधानिक तरतुदी विचारात घेता पाणी पुरवठा लाभ कर व मलप्रवाह लाभ कर, या पासून मिळणारी रक्कम केवळ भांडवली कामासाठी वापरण्याचे निर्देशित केले असल्याने, "भांडवली जमा" या शिर्षाखाली दर्शवून, सदर महसूलाचा विनियोग केवळ भांडवली खर्चासाठी करणे उचीत होईल अशी लेखापरीक्षणाची धारणा आहे. याबाबत विभागाचे अभिप्राय दि. 29/01/2020 रोजीच्या अ.स.क्र. 136 अन्वये मागविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 6.3 :- वर्ष 2016-17 अखेर विविध विभागांनी संकलित केलेल्या अनामत रकमा, वार्षिक जमा खर्चामध्ये दर्शविल्या नसल्याबाबत...

1) लेखा विभागाने वर्ष 2016-17 करिता ठेवलेल्या अनामत खाते रोकडवही मधील नोंदीचे अवलोकन केले असता, महानगरपालिकेचे विविध विभाग जसे की, बांधकाम, लेखा, नगर रचना, प्रभाग कार्यालये, भांडार, वृक्ष संवर्धन इ. विभाग अनामत रकमांची वसूली करतात. त्याच्या नोंदी लेखा विभाग इसारा/सुरक्षा अनामत खाते रोकडवही नमुना 11 मध्ये घेत असल्याचे दिसून येते, त्यानुसार दि. 31/03/2017 अखेर, निव्वळ अनामत (परतावा वजा जाता) रक्कम रु. 44,21,04547.28 शिल्लक असल्याचे स्पष्ट होते. तथापी, लेखा विभागाच्या वर्ष 2016-17 या वर्षाच्या जमा खर्चामध्ये, पाणी पुरवठा विभागाची ठेव रक्कम रु. 0.68 लाख (कोड नं. 3710) वगळता, अन्य कोणतीही रक्कम "अनामत" या लेखाशिर्षाखाली जमा खर्चामध्ये दर्शविल्याचे आढळून आले नाही. परिणामत: उर्वरित रु. 4420.37 लाख इतकी अनामत रक्कम लेखा बाह्य असल्याचे सकृत दर्शनी दिसून आले.

2) विभागाने स्विकारलेल्या अनामत रकमा, "महापालिकेचे दायित्व" या सदरात येते. तथापी, पाणी पुरवठा विभागाची अनामत रक्कम रु. 0.68 लाख वार्षिक जमा खर्चामध्ये "महसूली जमा" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात आली आहे.

3) विभागाने इसारा/सुरक्षा अनामत नोंदीसाठी स्वतंत्र रोकडवही नमुना क्र. 11, [नियम 31 (1)] मध्ये ठेवली आहे. तथापी, महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता नियम 1971 मधील नियम 190 नुसार, रोखीत मिळालेल्या व परत केलेल्या सर्व ठेवींची नोंद "नमुना 147" मध्ये ठेवणे अनिवार्य आहे. शिवाय, सद्याच्या नमुना 11 नुसार ठेवलेल्या रोकड वहीच्या मथळ्यामध्ये चुकीने नियम 32. (1) ऐवजी नियम 31 (1) दर्शविलेला असल्याचे दिसून येते.

सबब, उपरोक्त बाबी संबंधी योग्य ती कार्यवाही करुन, त्याबाबतचा अनुपालन अहवाल देणेबाबत, अर्धसमास क्र. 138 दि. 29/01/2020 अन्वये कळविले असून, याबाबत विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

अग्निशमन विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 9.6 :- अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...

मौजे-नवघर, स.क्र. 191/11,12,14,4, 190/5, 7 (नविन), 223/11,12,14,4, 222/5 (जूना)

शैक्षणिक इमारत बांधकाम - एस.के.इंग्लिश स्कुल (तळ + 7)

बांधकाम क्षेत्र - 10369 चौ.मी.

अंतिम ना-हरकत दाखला - 10369 चौ.मी. पैकी 463.96 चौ.मी (तळ+3 मजले)

क्र. MBMC/FIRE/472/2016-17, दि. 03/09/2016

अभिप्राय :-

उपरोक्त प्रकरणी निर्गमित केलेल्या अंतिम ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून सदर दाखल्याचे दि. 01/01/2017 रोजी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीचे अवलोकन केले असता, दाखल्याचे नुतनिकरण केले नसल्याचे आढळून आले आहे.

तरी नुतनिकरण आणि तपासणी शुल्क एकुण रक्कम रु. 4928/- संबंधीतांकडून वसूल करुन दाखविल्याचे नुतनिकरणाची कार्यवाही करण्यांत यावी.

कॅपिटेशन शुल्क - 463.96 X 33 = 15.311/-

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 15311 X 25% = 3828/-

ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-

वसूलपात्र रक्कम 4928/-

सदर प्रकरणी अर्धसमास क्र. 167, दि. 13/03/2020 अन्वये कार्यवाही करुन पूर्तता सादर करणेबाबत कळवून देखील अद्याप पुर्तता अहवाल अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.7 :- कॅपिटेशन फि आकारणी/वसूली मधील अनियमितता.

मौजे-नवघर, सिटी सर्व्हे नं. 120/2, 3 (नविन), 416/2, 3 (जूना)

निवासी ईमारत, बी-विंग, (स्टील्ट + 15 मजले)

वास्तू विशारद - मे. डी. एन. पटेल ॲण्ड असोशिएट्स

प्रोव्हिजनल ना-हरकत दाखला क्र. NOC/MBMC/FIRE/234/2016-17, दि. 08/07/2016

ईमारतीचा क्षेत्रफळाचा तपशिल - (ईमारतीची उंची 46.75 मीटर)

ईमारत प्रकार	बांधकाम क्षेत्र	Refuge क्षेत्र	बाल्कनी क्षेत्र	स्टेअर्केस क्षेत्र	C.B. क्षेत्र	स्टील्ट क्षेत्र	एकूण क्षेत्र
स्टील्ट + 15 विंग-बी	2854.25 चौ.मी.	51.18 चौ.मी.	271.48 चौ.मी.	723.20 चौ.मी.	110.88 चौ.मी.	195.06 चौ.मी.	4206.04 चौ.मी.

कॅपिटेशन फि - 4206.04 X 150 प्र.चौ.मी. = रु. 6,30,906/-

वसूलीचा तपशिल - 1) रु. 473110/-
2) रु. 40100/-
3) रु. 117696/-
} Prov. NOC चे वेळी भरणा पावती क्र. 817856/07/07/2016

रु. 630906/-

अभिप्राय :-

उपरोक्त नमुद इमारतीची कॅपिटेशन फि रक्कम रु. 630906/- तीन टप्प्यात भरणा केलेली आहे. पैकी रक्कम रु. 117696/- ची पावती नस्ती सोबत आहे. तथापी, उर्वरित रु. 473110/- आणि रु. 40100/- रकमांची पावती प्रकरणा सोबत आढळून आली नाही. तसेच एकुण कॅपिटेश फि रक्कम रु. 630906/- महानगरपालिका खात्यामध्ये प्रत्यक्ष भरणा केल्याबाबतचा अभिलेख (पोटकीर्द, चलन, बँक स्टेटमेंट) लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. सबब सदरची रक्कम महानगरपालिका खात्यामध्ये जमा झाली किंवा कसे? याची खातरजमा लेखापरीक्षणास करीता आली नाही. या संदर्भात अर्थसमास क्र. 168, दि. 13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.8 :- कॅपिटेशन शुल्क वसूलीची पावती आढळून न आलेबाबत...

प्रस्तावना :-

मौजे - नवघर, स. न. 295/4,5,6,7 (जूना), 178/4,5,6,7 (नविन)

निवासी व वाणिज्य ईमारत A-तळ + 8, B-8तळ + 7, C-तळ + 7.

तात्पुरता (Provisional) ना-हरकत दाखला क्र. MBMB/FIRE /196/2013-14, दि. 09/04/2013.

कायम ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/1483/2017-18, दि. 31/03/2017.

अ. क्र.	ईमारत	उंची	बांधकाम क्षेत्र			रक्कम
			वाणिज्य	निवासी	एकुण क्षेत्र	
1	A-तळ + 8	27.10	288.56 X 110	3525.19 X 55	3813.75	
			31742	193885	-	225627
2	B-तळ + 7	23.85	259.22	1346.06	1605.28	
3	C-तळ + 7	23.85	263.92	1702.02	1965.94	
B-तळ + 7 व C-तळ + 7 तपशिल			523.14 X 55	3048.08 X 22	3571.22	
			28773	67058	-	95831
एकुण कॅपिटेशन शुल्क						321458

अभिप्राय :-

देय कॅपिटेशन फि रक्कम रु. 321458/- एवढी असून पैकी रु. 1500/- पावती क्र. 850440 अन्वये दि. 18/04/2017 रोजी वसूल केली असून सदर पावतीची छायांकित प्रत नस्तीसोबत आहे. उर्वरित (321458-1500) रु. 319958/- वसूली संदर्भात पावती नस्तीसोबत आढळून आली नाही. त्यामुळे सदरची वसूली झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

बँक खात्यामध्ये जमा रकमांचे निर्देश केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पुर्तता सादर करणेबाबत अर्धसमांस क्र. 169, दि. 13/03/2020 अन्वये कळवून आणि वारंवार समक्ष विनंती करुन देखील अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

परिच्छेद क्र. 9.9 :- अग्निशमन ना-हरकत दाखला नूतनिकरण न केलेबाबत...

प्रस्तावना :-

मौजे - भाईंदर गांव, स.नं. 216/3 (a) (नविन), 555/3 (a) (जूना)

ईमारत - "जिवन आशा" निवासी आणि वाणिज्य (तळ + 7 मजले)

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला क्र.MBMB/FIRE/490/2016-17, दि. 09/09/2016.

अ.क्र.	तपशिल	निवासी	वाणिज्य	एकुण
1	बांधकाम क्षेत्र	1675.67 x 22	115.20 x 55	1790.87
2	कॅपिटेशन शुल्क	36865 10%	6336 25%	43201
3	नूतनिकरण i) तपासणी शुल्क ii) नुतनिकरण शुल्क	3687 -	1584 -	5271 1100
	एकुण शुल्क	3687	1584	6371

अभिप्राय :-

1) अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2020 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीची पडताळणी केली असता, नुतनिकरण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर प्रकरणी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे नुतनिकरण शुल्क रक्कम रु. 6371/- संबंधीतांकडून वसूल करुन दाखल्याच्या नुतनिकरणासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

2) वसूल करण्यात आलेल्या कॅपिटेशन शुल्क रक्कम रु. 34257/- (43207-8950) ची पावती आढळून आली नाही.

उपरोक्त मुद्यांची पूर्तता करुन पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करणेबाबत अर्थसमास क्र. 170, दि. 13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

परिच्छेद क्र. 9.10 :- ना-हरकत दाखला नुतनिकरण न केलेबाबत...

मौजे-नवघर, स.क्र. 29/9,12,13,17, 31/2 (नविन), 228/9,12,13,17, 235 (जूनां)

शैक्षणिक इमारत बांधकाम - स्टील्ट + 7

तात्पुरता ना-हरकत दाखला - No/ MBMC/FIRE/257/2012-13, दि. 03/07/2012

अंशत: पूर्ण बांधकाम - स्टील्ट + 3 - ना-हरकत दाखला No. MBMC/FIRE/167/2014-15, दि. 06/06/2014

ना-हरकत दाखल्याचे नूतनिकरण क्र. MBMC/FIRE/142/2016-17, दि. 07/06/2016

अभिप्राय :-

स्टील्ट + 7 पैकी स्टील्ट + 3 अंशत: पूर्ण बांधकामासाठी ना-हरकत दाखला दि. 06/06/2014 रोजी दिलेला असून, त्यानंतर सदर दाखल्याचे दि. 07/06/2016 रोजी नुतनिकरण केले आहे. सदरचा नुतनिकरण दाखला दि. 31/12/2016 पर्यंत विधीग्राह्य (Valid) असून दि. 01/01/2017 रोजी नव्याने नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीमधील कागदपत्रांची तपासणी केली असता, दि. 01/01/2017 रोजी नुतनिकरण केलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे. सबब रक्कम रु. 30608/- (तपासणी शुल्क) आणि नुतनिकरण शुल्क रु. 1100/- असे एकुण रु. 31708/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 171, दि. 13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

परिच्छेद क्र. 9.11 :- अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला वार्षिक नुतनिकरण करणेबाबत...

मौजे-भाईंदर, स.क्र. 473/3, 474/4 (D) 475, 476, 477 (जुने)

ईमारत "अंबा एंटरप्रायझेस" G+7 (व्यापारी)

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/125/2016-17, दि. 30/05/2016,

कॅपिटेशन शुल्क - 1559.46 चौ.मी. X रु. 44 रु. प्र.चौ.मी. = रु. 68616/-

---

अभिप्राय :-

1) सदरच्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक होते.

2) तथापी, नुतनिकरण केल्याची नस्तीमध्ये आढळून आले नाही. तरी सदर नुतनिकरण करण्यात येवून खालील नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु. 18254/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 68616 X 25% = रु. 17154/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

वसूलपात्र रक्कम रु. 18254/-

सदर प्रकरणी कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 172, दि.13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.12 :- ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत...

मौजे-घोडबंदर, स.क्र. 7/1, निवासी ईमारत "राज एक्सोटिना" विंग D,E,F,
इमारत उंची - 23.95 मिटर (तळ+7), बांधकाम क्षेत्र - 4806.16 मीटर,
अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/79/2016-17, दि. 09/05/2016,
कॅपिटेशन शुल्क - 9824.00 पैकी 4806.16 X रु. 22 = 105736/-

अभिप्राय :-

1) अग्निशमन विभागाने दिलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे.

2) सदर नस्तीचे अवलोकन केले असता दाखल्याचे नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. तरी नूतनीकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 11,674/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 105736 X 10% = रु. 10574/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

वसूलपात्र रक्कम रु. 11674/-

सदर प्रकरणी कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्थसमास क्र. 173, दि.13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.13 :- ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत...

मौजे-गोडदेव गांव, स. नं. 327/1, 2, 4 ते 9, 11, 12, 14 ते 19, 21, 22, 24, 25, 328/1 ते 4, 329/1 ते 7, 10, 11, 330/7, 331/4(B), 339/2, 340/1 ते 12, 341/6

निवासी इमारत "सॉलिटेअर हाईट्स" विंग-एफ, तळ+7,

बांधकाम क्षेत्र 2297.78 चौ.मी., उंची 22-80 मीटर,

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/F 1RE/457/2016-17, दि. 02/09/2016,

कॅपिटेशन फि - 2297.78 चौ.मी. X 22 रु.प्र.चौ.मी. = 50551/-

अभिप्राय :-

1) कॅपिटेशन शुल्क रु. 50,551/- प्राप्त झाल्याचे नमूद आहे. परंतु सदर रकमेची पावती आणि भरणा चलन नस्ती सोबत आढळून आले नाही.

2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे.

नस्तीचे अवलोकन केले असता, दाखल्याचे नुतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. नुतनिकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 6,155/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 50551 X 10% = रु. 5055/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

वसूलपात्र रक्कम रु. 6155/-

सदर प्रकरणी कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 174, दि.13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.14 :- अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...

प्रस्तावना :-

मौजे - नवघर, स. न. 225/1,2,3,4,8, 237/5,6, 238/2,3 (जूने),
118/1,2,3,4,8, 186/5,6, 187/2 (नविन)

निवासी व वाणिज्य ईमारत "मिताली राईट्स" (विंग-बी) तळ + 10 मजले

बांधकाम क्षेत्र - 6051.59 चौ.मी., उंची 32.20 मीटर

कॅपिटेशन फि 6051.59 चौ.मी. X 22 रु. = 138875/-
2445.00 चौ.मी. X 55 रु. = 134475/-
273350/-

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/112/2016-17, दि. 26/05/2016

अभिप्राय :-

1) उपरोक्त प्रकरणी जमा रक्कम रु. 273350/- ची पावती भरणा चलन नस्तीसोबत आढळून आली नाही. सबब सदरची रक्कम महानगरपालिका खाती प्रत्यक्ष जमा झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

2) अंतिम अग्निशमन विभागाचे ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी सदर दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे. मात्र नस्तीचे अवलोकन केले असता, नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी नूतनिकरण शुल्क आणि तपासणी शुल्क रक्कम रु. 28435/- संबंधीतांकडून वसूल करुन नूतनिकरण बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 273350 X 10% = 27335/-
ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-
वसूलपात्र रक्कम 28435/-

3) ईमारत निवासी आणि वाणिज्य वापरासाठी आहे. परंतु संपूर्ण बांधकाम क्षेत्रावर निवासी दराने कॅपिटेशन शुल्क वसूली करण्यांत आलेली आहे. निवासी आणि वाणिज्य वापरासाठीच्या क्षेत्रानुसार निवासी क्षेत्रासाठी निवासी दराने आणि वाणिज्य क्षेत्रासाठी वाणिज्य दराने कॅपिटेशन शुल्क वसूल करण्यात आले नाही. याबाबत तरतूदीसह खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

उपरोक्त मुद्यांचे संदर्भात पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करण्याबाबत अर्धसमास क्र. 176, दि.13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 9.15 :- अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...

प्रस्तावना :-

मौजे - गोडबंदर, स. न. 77/1, 3

शाळा ईमारत बांधकाम, बांधकाम क्षेत्र - 3618.17 चौ.मी., उंची 15.90 मीटर,

कॅपिटेशन फी 3618.17 चौ.मी. X 33 रु. = 119400/-

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/117/2016-17, दि. 20/06/2016

अभिप्राय :-

1) कॅपिटेशन फी रक्कम रु. 119400/- पैकी रु. 114640/- वसूलीचा तपशिल (पावती भरणा चलन) तसेच वसूली पावती आणि भरणा चलनाची प्रत नस्तीसोबत आढळून आली नाही.

2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. तथापी, नस्तींचे पडताळणी केली असता, दाखल्याचे नुतनिकरण केल्याचे आढळून येत नाही. तपासणी शुल्क आणि नुतनिकरण शुल्क असे एकुण रु. 30950/- संबंधिताकडून वसूल करुन दाखला नूतनिकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 119400 X 25% =	29850/-
ii) नुतनिकरण शुल्क	= 1100/-
वसूलपात्र रक्कम	30950/-

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्याबाबत अर्थसमास क्र. 175, दि.13/03/2020 अन्वये कळवून देखील पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

पाणी पुरवठा विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 11.7 :- धनादेशाद्वारे पाणीपट्टी वसुलीबाबत...

पाणीपटटी विभागातील 2016-17 या वर्षाचे निवडक महिन्यांचे जमेची पडताळणी केली असता दि. 27/07/2016 रोजीचे लेखा शाखेमधील एकत्रित चलन आणि पाणीपुरवठा उपकेंद्रावरुन प्राप्त चलनामध्ये दर्शविलेल्या धनादेश आणि रोखीनी जमा रकमाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

उपकेंद्र	धनादेश	रोख	एकुण
भाईंदर (प.) मिरा गांव	65342	24199	89541
	49997	241	50238
	115339	24440	139779

सदरचे चलनांवरुन उपकेंद्र पोटकिर्दची पडताळणी केली असता जमा रकमा बरोबर आहेत मात्र मिरागांव उपकेंद्रामध्ये धनादेशाद्वारे प्राप्त वसुली एकुण रक्कम रु. 49,997/- दि.29/07/2019 रोजी बँक विवरणपत्रामध्ये जमा नोंद आहे. परंतु सदरची नोंद एकत्रित चलन आणि रोखवही मध्ये घेण्यांत आलेली नाही. रोखवही, पोटकिर्द आणि एकत्रित पोटकिर्द मध्ये रक्कम न दर्शविल्यामुळे महानगरपालिकेच्या वार्षिक लेखामध्ये दर्शविण्यांत आलेली जमा व प्रत्यक्ष जमा यामध्ये तफावत येवु शकते.

धनादेशाचा तपशिल (पाणी पुरवठा विभाग मिरा गांव)

अ.क्र.	धनादेश	बँकेचे नांव	रक्कम
1	7200	ओरिएंटल बँक	9327
2	510770	आय डी बी आय बँक	400
3	248571	पंजाब नॅशनल बँक	5284
4	175777	ऑक्सिस बँक	29742
5	302258	स्टेट बँक	5244
		एकुण	49997

सदर प्रकरणी अर्धसमास क्र: 129, दि. 22/01/2020 अन्वये पाणी पुरवठा विभागाकडून खुलासा मागविण्यात आला. मात्र, खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.8 :- पाणी पुरवठा विभागामधील अनियमितता...

पाणी पुरवठा विभागाचे 2016-17 वर्षाचे निवडक महिन्यांची जमा रक्कमांची बँक विवरण पत्रावरुन पडताळणी केली असता विभागाचे धनादेश नोंदवहीनुसार दि. 30/07/2016 रोजी भाईंदर (प.) केंद्रांतर्गत धनादेशाची रक्कम व प्रत्यक्ष बँकेत जमा नोंद यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

अ. क्र.	ग्राहक क्र.	ग्राहकाचे नांव	पावती क्रमांक	रक्कम
1	HKM-0303929	सरस्वती सदन	65/1019589	8746/-
2	HKS-030930	सरस्वती सदन	65/1019591	8746/-
3	HKM-2203783	सरस्वती सदन सहकारी गृह	65/1019585	8746/-
			एकुण	26238/-

पाणीपटटीची उपरोक्त नमुद एकुण रक्कम रु. 26238/- सरस्वती सदन यांचेकडुन धनादेशाद्वारे ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक (प.) या बँकेच्या धनादेश क्र. 865644/30/07/2016 अन्वये प्राप्त झालेली आहे. परंतु धनादेशाची बँक विवरणावरुन पडताळणी/ताळमेळ घेतला असता बँक विवरणपत्रामध्ये दि. 2.8.2016 रोजी सदर धनादेशाद्वारे रक्कम रु. 8746/- प्रत्यक्षात जमा नोंद आहे.

कार्यालयीन धनादेश नोंदवहीनुसार सदरचा धनादेश रक्कम रु. 26238/- या रकमेचा असतांना बँक खात्यामध्ये रु.8746/-एवढीच जमा रक्कम म्हणजे (26238-8746) रु. 17492/- एवढी कमी जमा झाल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात अर्धसमास क्र. 130, दि. 22/01/2020 अन्वये खुलासा, तथापि, सदर अनियमिततेबाबत पुर्तता सादर करणेबाबत कळविले आहे. परंतु सदर प्रकरणी पुर्तता अहवाल/खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.9 :- पाणी पुरवठा विभागातील धनादेशाद्वारे वसूलीचे धनादेश अनादरीत झालेबाबत...

पाणी पुरवठा विभागाचे 2016-17 या वर्षाचे वसूली/जमा संदर्भातील अभिलेखाची तपासणी केली असता, पाणीपट्टी वसूलीचे बँकेद्वारे अनादरीत झालेल्या धनादेशांचा केंद्र निहाय तपशिल खालील प्रमाणे -

अ.क्र.	पाणी पुरवठा केंद्राचे नांव	अनादरीत धनादेश संख्या	रक्कम	अनादरीत धनादेश शुल्क आकारणी रु. 114.50/- प्र. धनादेश
1.	भाईंदर (प.)	148	25,64,971	16,946.00
2.	भाईंदर (पूर्व)	161	30,87,688	18,434.50
3.	मिरारोड	201	42,98,811	23,014.50
4.	मिरागांव	045	5,82,950	5,152.50
5.	काशी	020	1,42,109	2,290.00
6.	घोडबंदर	021	6,82,490	2,404.50
7.	चेणा	5	55,654	572.50
8.	डोंगरी	5	18,042	572.50
9.	उत्तन	6	70,878	687.00
	एकुण	612	1,15,03,493	70,074.00

धनादेशाद्वारे वसूल पाणीपट्टीचे अभिलेखाची पडताळणी केली असता, 2016-17 मध्ये प्राप्त धनादेशांपैकी एकुण रक्कम रु. 1,15,03,493/- चे 612 धनादेश खातेदाराच्या खात्यामध्ये पुरेशी शिल्लक नसल्यामुळे बँकेने अनादरीत (Dishouner) केलेले आहे. सदर धनादेशांकरीताचे प्रति धनादेश रु. 114.50/- प्रमाणे रु. 70,074/- एवढे शुल्क आकारुन सदरची रक्कम महानगरपालिकेच्या बँक खात्यामधून कपात केलेली आहे.

अनादरीत धनादेश नोंदवहीचे अवलोकन केले असता, सदर नोंदवहीत धनादेश परत आल्यानंतर पाणीपट्टी वसूली आणि दंडनिय रक्कम बाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशिल नमुद केलेला नाही. त्यामुळे अनादरित धनादेशापोटी थकित राहिलेली वसूलीची रक्कम रु. 1,15,03,493/- आणि बँकेने आकारलेले दंडनिय शुल्क प्रती धनादेश रु. 114.50/- प्रमाणे रु. 70,074/- वसूल झाले किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आलेली नाही.

उपरोक्त नमुद धनादेशांचे संदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या नोंदीसह नोंदवही विभाग प्रमुखांच्या साक्षांकनासह अद्यावत करुन पूर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 144, दि. 24/02/2020 अन्वये कळविण्यात येवूनही अद्याप पूर्तता अहवाल अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.10 :- पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकर पाणीपुरवठा केंद्रामधील धनाकर्षाद्वारे जमा रकमेची रोखडवहीतील नोंद तफावतीबाबत...

पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकरद्वारे पुरवठा केंद्रातील वसुलीबाबतचे अभिलेखाची 2016-17 मधील एप्रिल, जुलै, जाने महाचे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता निदर्शनास आली आहे.

दि. 23/01/2017 रोजी टँकर पाणी पुरवठ्याची धनाकर्षाद्वारे रक्कम रु. 413100/- प्राप्त झाली असून, त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

अ.क्र.	पावतीचा क्र.	धनाकर्ष क्र.	बँकेचे नांव	रक्कम
1.	169007	031654	ओरिएंटल बँक	26350/-
2.	169008	000098	पीएमएस बँक	25500/-
3.	169009	031655	ओरिएंटल बँक	8500/-
4.	169010	088746	न्यू इंडिया को.ऑप.बँक	8500/-
5.	169011	230587	दि. कर्नाटक बँक	25500/-
6.	169012	712012	इंडसईड बँक	25500/-
7.	169013	230586	दि. कर्नाटक बँक	25500/-
8.	169014	069610	भारतीय स्टेट बँक	76500/-
9.	169015	045273	बॅसिन कॅथलिक बँक	42500/-
10.	169016	045272	बॅसिन कॅथलिक बँक	42500/-
11.	169017	045274	बॅसिन कॅथलिक बँक	42500/-
12.	169018	018631	शामराव विठ्ठल को.ऑप.बँक	8500/-
13.	169019	018628	शामराव विठ्ठल को.ऑप.बँक	12750/-
14.	169020	017224	आयडीबीआय बँक	8500/-
15.	169021	017221	आयडीबीआय बँक	8500/-
16.	169022	017222	आयडीबीआय बँक	8500/-
17.	169023	017223	आयडीबीआय बँक	8500/-
18.	169024	017225	आयडीबीआय बँक	8500/-
			एकुण	413100/-

सदर रकमेचा लेखा विभागाने ठेवलेल्या रोखडवही नमूना-11 बरोबर ताळमेळ घेतला असता, उपरोक्त धनाकर्षाची प्राप्त रक्कम रु. 413100/- ची पोटकिर्द प्रमाणे असतांना रोखडवहीमध्ये रु. 413400/-अशी रु. 300/- नी जास्तीची जमा नोंद केलेली आहे.

सदर बाबीची खातरजमा करुन बँक विवरणपत्रामधील नोंदीसह अनुपालन अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 142, दि. 11/02/2020 अन्वये कळविले आहे. परंतु पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.11 :- टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेल्या फेऱ्यांचा धनाकर्षाद्वारे संकलीत केलेला महसूल रु. 251600/- बाबत...

पाणी पुरवठा विभागांतर्गत टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या केंद्राचे 2016-17 वर्षाचे एप्रिल-जुलै-ऑक्टोबर-जानेवारी-2017 या महिन्यांचे वसूलीच्या अभिलेखाची तपासणी केली असता, खालील अनियमीतता आढळून आली.

दि. 11/01/2017 रोजी धनाकर्षाद्वारे रक्कम रु. 251600/- विभागाकडे प्राप्त झाली असून त्याचा धनाकर्ष निहाय तपशिल खालील प्रमाणे :-

अ.क्र.	पावतीचा क्र.	धनाकर्ष क्र.	बँकेचे नांव	रक्कम
1.	168647	271089	UCO बँक	39100/-
2.	168648	001287	बँक ऑफ इंडिया	51000/-
3.	168649	015442	ICICI बँक	17000/-
4.	168650	015443	ICICI बँक	17000/-
5.	168651	015449	ICICI बँक	17000/-
6.	168652	015444	ICICI बँक	17000/-
7.	168653	015445	ICICI बँक	17000/-
8.	168654	015446	ICICI बँक	17000/-
9.	168655	015447	ICICI बँक	17000/-
10.	168656	015448	ICICI बँक	17000/-
11.	168657	001289	बँक ऑफ इंडिया	25500/-
			एकुण	251600/-

सदर रकमेचा लेखा विभागाने ठेवलेल्या रोखडवही नमूना-11 बरोबर ताळमेळ घेतला असता, उपरोक्त नमुद 11 धनाकर्षांची एकूण रक्कम रु. 251600/- ची नोंद रोकडवहीमध्ये घेतल्याचे माहे जाने-2017 अखेरपर्यंत आढळून आले नाही.

सदर रकमेच्या नोंदीची खातरजमा करुन बँक विवरणपत्रामध्ये सदर रक्कम जमा झालेल्या नोंदीच्या तपशीलासह अनुपालन अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 140, दि. 11/02/2020 अन्वये कळविणेत आले आहे. तथापि सदरची पुर्तता अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.12 :- पाणी पुरवठा विभागामधील जमा रकमांची बँक विरणावरुन पडताळणी - 2016-17.

पाणी पुरवठा विभागातील सन 2016-17 या वर्षातील निवडक महिन्यांच्या जमा रकमांची बँक विवरणावरुन पडताळणी केली असता, अभिप्राय खालील प्रमाणे.

प्राप्त धनादेशांच्या रकमांच्या बँक विवरणामध्ये जमा नोंदी बँक विवरणामध्ये अढळ झाल्या नाहीत, त्याचा तपशील.

अ.क्र.	दिनांक	धनादेश क्रमांक/दिनांक	बँकेचे नांव	रक्कम
1.	12/04/2016	00001/31/03/2016	एच.डी.एफ.सी.	1445/-
2.	12/04/2016	15/31/03/2016	एच.डी.एफ.सी.	3089/-
3.	12/04/2016	290215/01/04/2016	शामराव विठ्ठल सह.बँक	17360/-
4.	12/04/2016	12/6921/04/04/2016	ग्रेटर बँक	51445/-
5.	27/04/2016	48217/10/04/2016	युनियन बँक	19822/-
6.	26/07/2016	903718/26/07/2016	द. ठाणे बँक	4463/-
7.	03/10/2016	947/03/10/2016	एच.डी.एफ.सी.	4363/-
8.	03/10/2016	969/03/10/2016	एच.डी.एफ.सी.	873/-
9.	04/10/2016	570691/04/10/2016	रिझर्व बँक ऑफ इंडिया	133949/-
10.	04/10/2016	000411/04/10/2016	एच.डी.एफ.सी.	3397/-
11.	05/10/2016	832945/05/10/2016	ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक	1245/-
12.	14/10/2016	00829/04/10/2016	बँक ऑफ बडोदा	32043/-
13.	17/10/2016	18549/17/10/2016	भारत सह. बँक, दहिसर	5478/-
14.	27/10/2016	742265/27/10/2016	स्टेट बँक, भाईदर	542/-
15.	14/10/2016	19222/14/10/2016	बँक ऑफ महाराष्ट्र	16132/-
16.	11/04/2016	100001/11/04/2016	कॅथलिक सह. बँक	10918/-
17.	26/10/2016	357/22/10/2016	युनियन बँक, मिरारोड	33969/-
18.	28/10/2016	96941/08/08/2016	शामराव विठ्ठल सह.बँक	2486/-
19.	28/10/2016	96942/08/08/2016	शामराव विठ्ठल सह.बँक	844/-
20.	28/10/2016	313367/26/10/2016	बँक ऑफ महाराष्ट्र, बोरीवली	4265/-
21.	28/10/2016	100370/20/10/2016	वसई जनता सह. बँक	23570/-
22.	28/10/2016	916037/15/10/2016	ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक	25486/-
23.	05/01/2017	106186/05/01/2017	स्टेट बँक, भाईदर	5000/-
24.	05/01/2017	000134/04/01/2017	एच.डी.एफ.सी.	10260/-
25.	06/01/2017	100134/06/01/2017	कॅथलिक सह. बँक	2168/-
26.	12/01/2017	133601/12/01/2017	न्यु इंडिया सह. बँक ठाणे	17112/-
			एकुण	**4,31,724/-**

सन 2016-17 मध्ये निवडक महिन्यांच्या प्राप्त धनादेशांचा बँक विवरण पत्रावरुन पडताळणी केली असता, उपरोक्त विवरणामध्ये नमुद केलेले धनादेश रक्कम रु. 4,31,724/- च्या जमा नोंदी अढळ होत नाहीत. सदरचे प्राप्त धनादेशांची रक्कम महानगरपालिका खात्यामध्ये जमा झाली किंवा कसे? याचा जमा दिनांकाच्या तपशिलासह अनुपालन सादर करणेबाबत तसेच प्राप्त धनादेश नोंदवहीमध्ये धनादेश प्राप्त दिनांकासह बँकेत जमा नोंद दिनांक नमूद करुन आणि दरमहा बँक खात्यामधील जमा नोंदींची प्राप्त धनादेशांशी ताळमेळ घेण्यात येवून तसा पुर्तता अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास क्र. 131, दि. 22/01/2020 अन्वये कळविले आहे. परंतु सदर प्रमाणे कार्यवाही केलेबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.13 :- महानगरपालिकेद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या खाजगी टँकर ठेकेदाराने टँकरच्या प्रत्यक्ष फेऱ्यापेक्षा जास्त फेऱ्यांची देयके सादर केल्याबाबत...

संदर्भ :- स्थायी समिती प्रकरण क्र. 27, सभा मंजूरी दि. 29/06/2016.

1) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमध्ये, जलवाहिनी नसलेल्या इमारती, जलवाहिनीच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणीपुरवठा होणाऱ्या इमारती व खाजगी वापरासाठी पाणी मागणाऱ्या नागरिकांना, त्यांच्या खर्चाने टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची योजना महानगरपालिका राबवित असून, त्यानुसार खाजगी ठेकेदार, मे. सागर वॉटर सप्लायर्स यांची, स्थायी समितीच्या दि. 29/06/2016 रोजीच्या प्रकरण 27 अन्वये नेमणूक करण्यात आली आहे. सदर ठेक्याच्या शर्ती व अटीनुसार, नागरिकांकडून टँकरच्या प्रती फेऱ्यासाठी पाणी आकार रु. 164/- अधिक टँकर वाहतूक भाडे रु. 666/- अशी एकूण रक्कम रु. 850/- प्रती टँकर फेऱ्यासाठी, आगावू वसूली केली जाते व उर्वरित रु. 666/- ठेकेदारास त्यांनी केलेल्या टँकरच्या फेऱ्याच्या देयकानुसार अदा केली जाते.

2) या संदर्भात पाणी पुरवठा विभागाने वर्ष-2016-17 मध्ये टँकरद्वारे सशुल्क पुरवठा केलेल्या फेऱ्यांच्या महसूलाचे व त्यासमोर त्याच कालावधीमध्ये संबंधित ठेकेदारास टँकर पुरवठ्याबाबत केलेल्या अधिदानाचे, जानेवारी ते मार्च-2017 या कालावधीचे तुलनात्मक अवलोकन केले असता, ठेकेदाराने प्रत्यक्ष फेऱ्यापेक्षा जास्त फेऱ्याची देयके सादर केल्याचे आढळून आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

टँकर वितरण फेरे
जानेवारी-2017

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
1	01-01-2017	46	39100	18	15300		
		2	250	0	0		
2	02-01-2017	57	48450	235	199750		
3	03-01-2017	306.41	260448.5	218	185300		
4	04-01-2017	306	260100	231	196350		
5	05-01-2017	159	135150	247	209950		
6	06-01-2017			0	0		
7	07-01-2017	211.53	179800.5	263	223550		
8	08-01-2017			0	0		
9	09-01-2017	291	247350	244	207400		
10	10-01-2017	146	124100	220	187000		
11	11-01-2017	313	266050	237	201450		
12	12-01-2017	120	102000	250	212500		

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
13	13-01-2017			0	0		
14	14-01-2017	200	170000	258	219300		
15	15-01-2017			0	0		
16	16-01-2017	157	133450	242	205700		
17	17-01-2017	284	241400	225	191250		
18	18-01-2017	272	231200	230	195500		
19	19-01-2017	157	133450	235	199750		
20	20-01-2017			0	0		
21	21-01-2017	172	146200	251	213750		
22	22-01-2017			0	0		
23	23-01-2017	504	428400	241	204850		
24	24-01-2017	255	216750	227	192950		
25	25-01-2017	200	170000	236	200600		
26	26-01-2017	55	46750	227	192950		
27	27-01-2017			0	0		
28	28-01-2017	218	185300	242	205700		
29	29-01-2017			0	0		
30	30-01-2017	399	339150	221	187850		
31	31-01-2017	343.53	292000.5	223	189550		
TOTAL		5174.47	4396849.5	5221	4438250	47	31302

फेब्रुवारी-2017

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल (3x4=5)	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
1	01-02-2017	314	266900	230	195500		
2	02-02-2017	17	14450	234	198900		
3	03-02-2017		0	0	0		
4	04-02-2017	230	195500	255	216750		
5	05-02-2017		0	0	0		
6	06-02-2017	166	141100	242	205700		
7	07-02-2017	243	206550	234	198900		
8	08-02-2017	157	133450	235	199750		
9	09-02-2017	101	85850	241	204850		
10	10-02-2017		0	0	0		
11	11-02-2017	283	240550	256	217600		
12	12-02-2017		0	0	0		
13	13-02-2017	290	246500	210	178500		

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल (3x4=5)	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
14	14-02-2017	230	195500	234	198900		
15	15-02-2017	334	283900	245	208250		
16	16-02-2017	128	108800	258	219300		
17	17-02-2017		0	0	0		
18	18-02-2017	211	179350	208	176800		
19	19-02-2017		0	2	1700		
20	20-02-2017	199	169150	276	234600		
21	21-02-2017	138	117300	240	204000		
22	22-02-2017	229.41	194998.5	244	207400		
23	23-02-2017	386	328100	255	216750		
24	24-02-2017		0	0	0		
25	25-02-2017	51	43350	259	220150		
26	26-02-2017		0	0	0		
27	27-02-2017	341.53	290300.5	248	210800		
28	28-02-2017	156	132600	235	199750		
TOTAL		4204.94	3574199	4841	4114850	637	424242

मार्च-2017

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल (3x4=5)	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
1	01-03-2017	477	405450	226	183600		
2	02-03-2017	319	271150	269	228650		
3	03-03-2017	0	0	0	0		
4	04-03-2017	293.22	249235	266	226100		
5	05-03-2017	0	0	0	0		
6	06-03-2017	401.22	341035	264	224400		
7	07-03-2017	335.22	284935	236	200600		
8	08-03-2017	222.22	188885	233	198050		
9	09-03-2017	275.22	233935	255	216750		
10	10-03-2017	0	0	0	0		
11	11-03-2017	132.22	112385	260	221000		
12	12-03-2017	29.21	24835	235	199750		
13	13-03-2017	0	0	0	0		
14	14-03-2017	158.21	134485	247	209950		
15	15-03-2017	215	182750	236	200600		
16	16-03-2017	290.22	246685	245	208250		
17	17-03-2017	0	0	0	0		

अ. क्र.	दिनांक	पावत्यांचे फेरे	पोटकिर्द वसूल (3x4=5)	ठेकेदारास केलेल्या अधिदाना प्रमाणे पावत्यांचे फेरे	अधिदान करताना दाखविलेली वसूली	ठेकेदाराने जास्त दर्शविलेले टँकर	ठेकेदारास अतिप्रदान झालेली रक्कम रु. 666/- प्रति टँकर प्रमाणे
1	2	3	4	5	6	7	8
18	18-03-2017	354.22	301085	262	222700		
19	19-03-2017	0	0	0	0		
20	20-03-2017	150	127500	252	214200		
21	21-03-2017	316.03	268623	242	205700		
22	22-03-2017	138.27	117535	239	203150		
23	23-03-2017	89.22	75835	251	213350		
24	24-03-2017	0	0	0	0		
25	25-03-2017	313.22	266235	271	230350		
26	26-03-2017	0	0	0	0		
27	27-03-2017	181.22	154035	260	221000		
28	28-03-2017	35.85	29935	239	203150		
29	29-03-2017	359.29	305393	253	215050		
30	30-03-2017	326.22	277285	264	224400		
31	31-03-2017	0	850	0			
TOTAL		5411.5	4600076	5505	4670750	94	62604

उपरोक्त तपशिलाबाबत स्पष्ट होते की, ठेकेदाराने सादर केलेल्या देयकाच्या आधारे, विभागाने अधिदान केले असल्याने, प्रत्यक्ष फेरे व ठेकेदाराने त्याच्या देयकामध्ये दर्शविलेले फेरे, यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत का येते, याची पडताळणी करुन योग्य ती कार्यवाही करणेकामी विभागास, दि. 09/03/2020 रोजीच्या अर्धसमास क्र. 148 अन्वये कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.14 :- पाणी पुरवठा विभागाने वर्ष 2016-17 वर्षामध्ये संकलित केलेला पाणीपट्टी महसूल व लेखाविभागाने वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला प्रत्यक्ष महसूल यामध्ये तफावत असल्याबाबत.

पाणी पुरवठा विभागाच्या वर्ष 2016-17 च्या एकत्रित पोटकिर्द मधील नोंदीनुसार, वर्ष 2016-17 चा पाणी पट्टीचा महसूल, (पाणीपट्टी + उपकर) रु. 4322.26 लाख इतका दर्शविण्यात आला आहे. तथापी, लेखा विभागाने, वर्ष 2016-17 करिताच्या जमाखर्चामध्ये, सदर महसूल रु. 4500.49 लाख असा दर्शविला असून, दोन्ही रकमामध्ये रु. 178.23 लाख इतका फरक असल्याचे दिसून येते.

सबब, सदर फरक रकमेचा ताळमेळ घेऊन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणेकामी अ.स.क्र. 137, दि. 29/01/2020 अन्वये विभागास कळविले असून, विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.15 :- महापालिकेच्या विविध पाणीटाकी हाऊसना वाणिज्यिक दराने वीज आकारणी असल्याबाबत...

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केस नं.34/2016 मध्ये दिलेल्या आदेशानुसार मे. रिलायन्स इन्फ्रा.लि., यांच्या विद्युत दरामध्ये दि. 01/10/2016 पासुन सुधारणा करण्याचे आदेशित केले. त्यानुसार, स्थानिक स्वराज्य संस्था,सार्वजनिक पाणीपुरवठा करण्यासाठी 13 पंपिंग स्टेशन व 10 मलनिस्रण केंद्राकरीता वापरत असलेल्या वीजेची आकारणी LT IV, सार्वजनिक पाणीपुरवठा, या शिर्षाखाली नमुद केलेल्या दराने देयके तयार करणे अनिर्वाय होते.

तथापि, खाली नमुद केलेल्या पाणी टाकी हाऊसच्या जोडणीची वाणिज्य दराने वीज आकरणी केली जात आहे.

अ.क्र.	पाणीटाकीचे नाव	ग्राहक /खाते क्रमांक	विद्युत आकारणी
1	छत्रपती शिवाजी महाराज मार्ग	151218958	LT II A कमर्शियल
2	उत्तन पाणी टाकी	151219399	LT II A कमर्शियल
3	दहीसर चेक नाका	151212979	LT II A कमर्शियल
4	सुभाषचंद्र बोस मैदान	151177453	LT II A कमर्शियल

वाणिज्यिक दर हे सार्वजनिक पाणी पुरवठा या शिर्षाखालील दरापेक्षा तुलनेने जास्त आहेत. महानगरपालिका सार्वजनिक सेवा देत असल्याने पाण्याच्या टाकीस दिलेल्या जोडणीची विद्युत दर आकारणी सार्वजनिक पाणीपुरवठा LT IV या शिर्षाखालील दराने करणे उचित होईल, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

सबब, योग्य विद्युत दराने विद्युत पुरवठा करणे कामी सदर विद्युत वितरकाकडे पाठपुरावा करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 108 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.16 :- विद्युत देयकांचे अधिदान विलंबाने होत असल्याने विलंब आकार देय होत असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 मधील आपल्या विभागाशी संबंधीत काही विद्युत देयकांचे चाचणी लेखापरीक्षण केले असता असे आढळुन आले कि, विद्युत देयकांचे अधिदान देय दिनांकापुर्वी न केल्याने मोठ्या प्रमाणात विलंब आकाराचे अधिदान करावे लागत आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे

पंपिंग स्टेशन	बिल दिनांक	देय दिनांक	देयक अधिदान दिनांक	विलंब आकार
कापुर बावडी	5/08/2016	19/08/2016	9/09/2016	15741
शांती नगर	6/08/2016	19/08/2016	9/09/2016	11625
कनकिया	8/08/2016	23/08/2016	29/05/2016	11895
एकुण				39261

उपरोक्त बाबी या नमुना दाखल नमुद केल्या असुन अन्य देयकाबाबत सुध्दा अशाच प्रकारे विलंब आकाराची आकारणी करण्यात आलेली आहे.

2) या संदर्भात असे नमुद करावेसे वाटते कि, सर्व विद्युत देयके तयार झाल्यानंतर विद्युत वितरकांच्या संकेत स्थळावर देयके उपलब्ध होत असल्याने, विद्युत देयके वितरकाकडुन प्राप्त होण्याची वाट न बघता संकेत स्थळावरुन देयके डाऊनलोड केल्यास, विहित कालावधीमध्ये देयकांचे अधिदान करता येईल. एवढेच नव्हे तर देय दिनांकापुर्वी अधिदान केल्यास वितरकाने देवु केलेली सवलत सुध्दा घेता येईल.

उपरोक्त बाबीसंबंधी योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 106 अन्वये विभागास कळविले असून, याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सबब वेळेत प्रदान न केल्यामुळे मनपा निधीतील रक्कम रु. 39261/- अतिप्रदान झालेले आहे.

परिच्छेद क्र. 11.17 :- विद्युत वापरामध्ये असाधारण वाढ झाल्याबाबत...

वर्ष 2016-17 मधील विद्युत देयकांचे चाचणी लेखापरीक्षण करताना, असे निदर्शनास आले कि, STP zone Iv पंपिंग स्टेशनच्या Account no 151823261 नोव्हे. 2015 ते एप्रि ल 2016 या कालावधीच्या मासिक विद्युत वापर कमीत कमी 672 युनिट तर जास्तीत जास्त 973 युनिट असा होता. तथापि माहे मे 2016 ते सप्टे 2016 कालावधीमध्ये सदर पंपिंग स्टेशनचा मासिक विद्युत वापर कमीत कमी 6096 युनिट तर जास्तीत जास्त 43734 युनिट असा असल्याचे विद्युत देयकावरील नोंदी नुसार दिसुन येते. तुलनात्मक दृष्टया मे 2016 ते सप्टे.2016 या कालावधीचा विद्युत वापर अत्यंत असाधारण दिसुन येत असल्याने सदर वापराची खातरजमा करुन याबाबत अभिप्राय देण्यास दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्र. 106 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.18 :- विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 कालावधीमधील काही चाचणी प्रकरणामध्ये विद्युत देयकांचे अवलोकन केले असता खाली नमुद केलेली विद्युत मापक दीर्घ काळापासुन बंद असल्याचे आढळुन आले आहे.

अ.क्र	ग्राहक खाते क्रमांक	विद्युत कंपनीचा शेरा	बंद दिनांक/महिना
1.	102689284	Meter showing no consumption	एप्रिल 2016
2.	102689059	Meter showing no consumption	एप्रिल 2016
3.	152144043	Meter showing no consumption	मे 2016
4.	151759582	Meter showing no consumption	मे 2016
5.	151759525	Meter showing no consumption	नमुद नाही

2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रसृत केलेल्या विद्युत पुरवठा संहिता (SUPPLY CODE) मधील संहिता क्र. 14.4 नुसार वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांच्या विद्युत मापकांच्या देखभालीस जबाबदार असल्याने बंद मापकाची तपासणी विद्युत वितरकाकडुन त्वरीत घेण्याची व्यवस्था करावी.

3) मीटरमध्ये नोंदी होणे थांबले असल्यास ज्या महीन्यात नोंदी होणे थांबले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महीन्या पर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे. त्या महिन्या मागील 12 महिन्यात मीटरवर नोंदवीलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्याची तरतुद संहिता 15 (4) मध्ये असल्याने 3 महीन्यापेक्षा जास्त कालावधी करीता सरासरी वापरावर देण्यात आलेली देयके सदर तरतुदीनुसार अग्राह्य होत असल्याने उपरोक्त प्रकरणाचा पाठपुरावा विद्युत वितरकाकडे करुन अशा देयकामधील रक्कमांचा परतावा/समायोजन मागणी वितरकाकडे करुन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्थसमास क्रमांक अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.19 :- सरासरी पॉवर फॅक्टरची पातळी मानकानुसार परिरक्षित न केल्याने मोठया प्रमाणात दंड रक्कम अदा करावा लागत असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 मधील काही बीज देयकांचे चाचणी लेखापरीक्षण केले असता, असे निदर्शनास आले कि, आपल्या विभागातील खाली नमुद केलेल्या पंपिग स्टेशनचा विद्युत वापर करताना भारतीय विद्युत अधिनियम सन1956 अन्वये, तसेच, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या आदेशा प्रमाणे ग्राहकांच्या करासाठी विहित केलेली सरासरी पॉवर फॅक्टरची पातळी परीरक्षित करणे बंधनकारक करणे अनिवार्य आहे. तसेच सदर पातळी 0.90 मर्यादे पर्यंत परीरक्षीत न केल्यास कमी पॉवर फॅक्टरसाठी विद्युत ग्राहक 2%ते10%दंड आकारणीस पात्र ठरतो. त्यानुसार खालील नमुद केलेल्या पंपिग स्टेशनच्या संदर्भात, पॉवर फॅक्टरची पातळी 0.90 पर्यंत सिमीत न ठेवल्याने मोठया प्रमाणात दंडाची रक्कम अदा करावी लागत आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे:-

अ.क्र	पंपिग स्टेशन	बिल दिनांक	पॉवर फॅक्टर	दंड रक्कम
1	झोन 7 पंपिग	6/8/2016	1869	1149.16
2	झोन 7 पंपिग	2/9/2016	1814	3222.71
3	कस्तुरी गार्डन	2/9/2016	772	2749.00
4	जैसल पार्क	5/1/2017	1706	21421.00
5	शांती पार्क से.क्र.8	6/01/2017	1745	8237.00
6	एमआयडीसी हायवेवाला	10/01/2017	1891	9015.00
7	लो लेवल	5/10/2017	797	7731.00
8	जैसल पार्क	6/10/2016	68	28922.00
9	शांती पार्क से.क्र.8	6/10/2016	85	30866.00

2) या संदर्भात असे ही नमुद करावेसे वाटते कि, विद्युत ग्राहकांने सरासरी पॉवर फॅक्टरची पातळी 0.95 ते 1.00 अशी ठेवल्यास ग्राहकास 1% ते 7% पर्यंत प्रोत्साहन अधिदान देण्याची तरतुद विद्युत पुरवठा संहिता 12.2 मध्ये नमुद असल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पॉवर फॅक्टरची सरासरी पातळी राखण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे अनिर्वाय आहे असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

उपरोक्त अनियमितता बाबत योग्य ती उपाय योजना करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्थसमास क्र. 104 अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 11.20 :- विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 कालावधीमधील काही चाचणी प्रकरणामध्ये विद्युत देयकांचे अवलोकन केले असता खाली नमुद केलेली विद्युत मापक दीर्घ काळापासुन बंद असल्याचे आढळुन आले आहे.

अ.क्र	ग्राहक खाते क्रमांक	विद्युत कंपनीचा शेरा	बंद दिनांक/महिना
1.	102689284	Meter showing no consumption	एप्रिल 2016
2.	102689059	Meter showing no consumption	एप्रिल 2016
3.	152144043	Meter showing no consumption	मे 2016
4.	151759582	Meter showing no consumption	मे 2016
5.	151759525	Meter showing no consumption	नमुद नाही

2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रसृत केलेल्या विद्युत पुरवठा संहिता (SUPPLY CODE) मधील संहिता क्र. 14.4 नुसार वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांच्या विद्युत मापकांच्या देखभालीस जबाबदार असल्याने बंद मापकाची तपासणी विद्युत वितरकाकडुन त्वरीत घेण्याची व्यवस्था करावी.

3) मीटरमध्ये नोंदी होणे थांबले असल्यास ज्या महीन्यात नोंदी होणे थांबले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महीन्यां पर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे. त्या महिन्या मागील 12 महिन्यात मीटरवर नोंदवीलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्याची तरतुद संहिता 15 (4) मध्ये असल्याने 3 महीन्यापेक्षा जास्त कालावधी करीता सरासरी वापरावर देण्यात आलेली देयके सदर तरतुदीनुसार अग्राह्य होत असल्याने उपरोक्त प्रकरणाचा पाठपुरावा विद्युत वितरकाकडे करुन अशा देयकामधील रक्कमांचा परतावा/समायोजन मागणी वितरकाकडे करुन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्रमांक अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

सार्व. बांधकाम विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 12.1 :- विद्युत मापके दिर्घ काळापासुन बंद असल्याबाबत...

1) वर्ष 2016-17 कालावधीमधील काही चाचणी प्रकरणामध्ये विद्युत देयकांचे अवलोकन केले असता खाली नमुद केलेली विद्युत मापक दीर्घ काळापासुन बंद असल्याचे आढळुन आले आहे.

अ.क्र	ग्राहक खाते क्रमांक	विद्युत कंपनीचा शेरा	बंद दिनांक/महिना
1.	151612747	Meter showing no consumption	ऑगस्ट 2015
2.	151215220	Meter showing no consumption	ऑगस्ट 2015
3.	151916214	Meter showing no consumption	सप्टेंबर 2015

2) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने प्रसृत केलेल्या विद्युत पुरवठा संहिता (SUPPLY CODE) मधील संहिता क्र. 14.4 नुसार वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांच्या विद्युत मापकांच्या देखभालीस जबाबदार असल्याने बंद मापकाची तपासणी विद्युत वितरकाकडुन त्वरीत घेण्याची व्यवस्था करावी.

3) मीटरमध्ये नोंदी होणे थांबले असल्यास ज्या महीन्यात नोंदी होणे थांबले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महीन्या पर्यंत ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे, त्या महिन्या मागील 12 महिन्यात मीटरवर नोंदवीलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्याची तरतुद संहिता 15 (4) मध्ये असल्याने 3 महीन्यापेक्षा जास्त कालावधी करीता सरासरी वापरावर देण्यात आलेली देयके सदर तरतुदीनुसार अग्राहय होत असल्याने उपरोक्त प्रकरणाचा पाठपुरावा विद्युत वितरकाकडे करुन अशा देयकामधील रक्कमांचा परतावा/समायोजन मागणी वितरकाकडे करुन याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करुणेबाबत दि. 01/11/2019 रोजीच्या अर्धसमास क्रमांक अन्वये विभागास कळविले असून याबाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

वाचनालय विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 13.1 :- प्रलंबित ठेवी परताव्याबाबत...

वर्ष 2016-17 मध्ये, वाचनालय सदस्यांनी सभासदत्व रद्द करण्यासाठी दिलेल्या अर्जांचे अवलोकन केले असता, खाली नमूद केलेल्या 5 पैकी 4 प्रकरणामध्ये, सभासदांनी सदस्यत्व रद्द करण्यासाठी अर्ज देवूनही, त्यांच्या ठेव रकमेचा परतावा दि. 31/03/2017 पर्यंत दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

परतावा बाकी (सन 2016-17)

वाचनालय	अ. क्र.	सभासदांचे नांव	सभासद क्र.	पावती क्र.	ठेव रक्कम	अर्ज दिनांक	शेरा
महात्मा गांधी राष्ट्रपिता	1	कळगुटकर मनिषा	750	802235	300	22/11/2016	
	2	अमृता ओमकार	639	712788	300	05/01/2017	
	3	प्रमोद धोरात	609	712757	300	18/01/2017	
	4	आदिती शिंदे	725	802210	300	14/02/2017	
	5	अर्जून शिंदे	704	713555	300	05/11/2016	Paid- 28/06/2018
नगर वाचनालय	6	सपना नाईक	739	449052	300	06/10/2016	Paid- 31/05/2018

वरील प्रकरणामध्ये ठेव रकमांच्या परताव्याचे प्रदान उपरोक्त अ.क्र.1 ते 4 प्रकरणी मार्च-2017 अखेर करण्यात आलेले नाही. विवरणपत्रातील अ.क्र. 5 व 6 चे सभासदांनी परताव्यासाठी अर्ज केल्यानंतर सुमारे 1 वर्षे 06 महिन्यांनी त्यांना प्रदान केलेले आहे. एवढ्या विलंबाने प्रदान केले प्रकरणी अर्धसमास क्र. 128, दि. 21/01/2020 अन्वये याबाबत खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यांत आले असता, त्यांनी दि. 17/03/2020 रोजी सादर केलेला खुलासा क्र. 1 ते 4 संदर्भात संयुक्तिक वाटत नाही. त्यासंदर्भात पुर्तता झाली किंवा कसे? याचा स्पष्ट उल्लेख नमुद केलेला नाही. सबब सदरचा खुलासा लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत आहे.

सदस्यत्व रद्द केलेल्या सभासदांना त्यांच्या ठेव रकमेवर परतावा मंजूर करताना, त्यांनी सदस्यत्व कालावधी मध्ये घेतलेली पुस्तके, विहित कालमर्यादित परत केली किंवा कसे याची खातरमा करणे आवश्यक वाटते. विलंबाने परत केलेल्या पुस्तकांच्या प्रकरणामध्ये विलंब शुल्क वसूल केले आहे किंवा कसे? याची खातरजमा लेखापरीक्षणात करता आली नाही. प्रकरणी अर्धसमास देवूनही खुलासा प्राप्त झाला नाही.

परिच्छेद क्र. 13.2 :- अनामत नोंदवहीमधील अनियमितताबाबत...

वर्ष 2016-17 मध्ये, वाचनालय विभागाने ठेवलेल्या अनामत नोंदवहीचे अवलोकन केले असता, खालील अनियमितता निदर्शनास आल्या.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा तथापी, 1 व 71 मधील नियम क्र. 8 नुसार नोंदवहीच्या शेवटच्या पृष्ठ संख्या अनामत नोंदवही मध्ये नमूद केलेली आहे. तथापी, सदर नोंद संबंधित अधिकाऱ्यानी प्रमाणित केलेली नाही. शिवाय, महात्मा गांधी ग्रंथालय, नगरवाचनालय, हनुमान नगर वाचनालय यांनी ठेवलेल्या नोंदवही मध्ये उपरोक्त नियम 8 नुसार, कार्यवाही केली नसल्याचे आढळुन आले.

2) अनामत नोंदवही (नमुना 147) लेखा संहिता नियम 189 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे, वर्षाअखेरीस शिल्लक असलेल्या सर्व अदत्त रकमांच्या तपशिल/गोषवारा नोंदवहीमध्ये काढणे आवश्यक असून सदरच्या सर्व अदत्त रकमांच्या नोंदी पुढील वर्षासाठी ठेवण्यांत येणाऱ्या नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि अधिनस्त सर्व चारही वाचनालयाने नियम क्रमांक 190 क्रमांक 1 ते 4 मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार नोंदवही अद्यावत केलेली नाही. त्यामुळे अनामत नोंदवही मधील तपशिलाची खातरजमा करता आली नाही. अनामत नोंदवहीमध्ये 2016-17 मधील अनामत प्राप्त आणि परतावा नोंद रकाना 6 ते 21 मध्ये घेणे आवश्यक असुन सदर प्रत्येक नोंद विभाग प्रमुखाने स्वाक्षांकित करणे आवश्यक आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका अधिनस्त वाचनालयात ठेवण्यात आलेल्या, 2016-17 च्या सदर नोंदवहीचे आवलोकन केले असता विहित तरतुदीनुसार कार्यवाही करण्यांत येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर विषयासंदर्भात 2016-17 मध्ये मंजुर केलेल्या परताव्याचा तपशिल खालील प्रमाणे

प्रदान केलेली अनामत (सन 2016-17)

वाचनालय	अ. क्र.	सभासदाचे नांव	सभासद क्र.	पावती क्र.	ठेव रक्कम	परतावा दिनांक
महात्मा गांधी राष्ट्रपिता	1	सचिन निचड	242	601363	300	05/04/2016
	2	हर्षद कुंबर	647	712796	300	30/04/2016
	3	आशिका टुमर	666	713517	300	14/06/2016
	4	तिलोत्तमा भागवत	188	601309	300	12/07/2016
	5	दिपक गायवाड	645	712794	300	02/08/2016
	6	संजय खंडागळे	581	712729	300	15/10/2016
हनुमान नगर वाचनालय	1	नयना शांतीलाल	5	768601	300	22/4/2016
	2	जयश्री सातविलकर	2	685702	300	08/06/2016
प्रभाग समिती क्र. 03 व 04	1	माया राजेंद्र	100	698517	300	28/04/2016
	2	रेखा भंडारे	15	44307	300	16/07/2016
	3	सुभाष नवघरे	61	6016	300	20/05/2016
नगरवाचनालय	1	शिवाजी शिगवण	816	545215	300	09/04/2016

वाचनालय	अ. क्र.	सभासदांचे नांव	सभासद क्र.	पावती क्र.	ठेव रक्कम	परताव दिनांक
	2	योगिता देसाई	251	685874	300	12/04/2016
	3	संदीप म्हात्रे	618	430051	300	10/05/2016
	4	संजिव खनसुली	408	802001	300	12/05/2016
	5	आरती तेरवणकर	109	685821	300	26/05/2016

सदर प्रकरणी अर्थसमास क्र. 127, दि. 21/01/2020 अन्वये पुर्तता करुन अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आलेला आहे. याबाबतचा पुर्तता अहवाल लेखापरीक्षणास दि. 17/03/2020 चे पत्रान्वये सादर केलेला आहे. तथापी, परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे अद्यावत केलेली नोंदवही अवलोकनार्थ लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याने, विभागास तसे कळविण्यात आले आहे.

परिच्छेद क्र. 13.3 :- वाचनालय विभागाने वर्ष 2016-17 मध्ये संकलित केलेला महसूल व लेखाविभागाने वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला प्रत्यक्ष महसूल यामध्ये तफावत असल्याबाबत...

वाचनालय विभागाच्या 2016-17 या आर्थिक वर्षाच्या एकत्रित पोटकिर्द मधील नोंदीनुसार, विभागाने संकलित केलेला महसूल व लेखा विभागाने वर्ष 2016-17 च्या वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविलेला वाचनालय विभागाचा महसूल, यामध्ये खालील प्रमाणे तफावत आढळून आली.

अ. क्र.	लेखाशिर्षक	कोड नं.	विभागाच्या पोटकीर्द प्रमाणे दि. 31/03/2017 अखेरची जमा (लाखात) रु.	लेखा विभागाच्या जमाखर्चानुसार 31.3.2017 अखेर जमा (लाखात) रु.	फरक (लाखात) रु.
1	अभ्यासिका भाडे	1522	11.50	11.25	0.25
2	वाचनालय फी	1522	1.31	1.64	0.33
3	विलंब आकार/ हरवलेल्या पुस्तकांचे शुल्क	1522	0.08	72.92	72.89

उपरोक्त नमूद तपशिलावरुन असे दिसून येते कि, अभ्यासिकेचे भाडे, प्रत्यक्ष वसुली पेक्षा वार्षिक जमाखर्चामध्ये रु. 25000/- इतके जास्त दर्शविले आहे, वाचनालय फी रु. 33000/- कमी दर्शविण्यात आली आहे. तर, विलंब आकार व हरवलेल्या पुस्तकांचे शुल्क रु. 72.84 लाख जास्त दर्शविण्यात आले असल्याचे स्पष्ट होते.

सबब उपरोक्त महसूलाच्या फरकाची पडताळणी लेखाविभागाने जमाखर्च तयार करतेवेळी विचारात घेतलेल्या तपशिला बरोबर करुन याबाबत योग्य ती कार्यवाही करुन, त्याचा अहवाल सादर करणेकामी दि. 29/01/2020 रोजीच्या अ.स.क्र. 135 अन्वये कळविले असून, विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र. 13.4 :- महानगरपालिका वाचनालय मासिक वर्गणीची वसूली विलंबाने होत असल्याबाबत...

1) स्थायी समिती ठराव क्र. 23, दि. 13/06/2005 अन्वये, वाचनालय मासिक फी रु. 20/- सभासदाकडून वसूल करण्यात येत आहे. सदर फी वसूली बाबतच्या अभिलेखांचे चाचणी लेखापरीक्षण केले असता, असे अढळून आले की, बहुतांश प्रकरणामध्ये मासिक वर्गणी महिन्याच्या सुरुवातील वसूल न करता, अनेक महिन्यांच्या विलंबानंतर वसूल केली जाते. याबाबतची नमुना प्रकरणे खालील प्रमाणे आहेत.

अ. क्र.	सभासदाचे नांव	सभासद क्रमांक	मासिक फी कालावधी	रक्कम रु.	पावती क्रमांक/दिनांक
1.	भास्कर दत्तात्रय महादेव	114	नोव्हेंबर-2016 ते मार्च-2017	100/-	47389 10/02/2017
2.	पल्लवी मार्तंड औघडे	117	जुलै-2016 ते मार्च-2017	180/-	46783 07/11/2017
3.	स्नेहल ठाकुर	55	नोव्हेंबर-2016 ते मार्च-2017	100/-	46789 07/01/2017
4.	कुणाल जाधव	113	ऑक्टोबर-2016 ते डिसेंबर-2016	60/-	466796 07/01/2017
5.	मिलन पाटील	91	सप्टेंबर-2016 ते नोव्हेंबर-2016	60/-	46668 17/11/2016
6.	संदीप सुर्वे	95	जुलै-2016 ते नोव्हेंबर-2016	100/-	45865 06/10/2016

महानगरपालिकेच्या महसूलाची वसूली नियमितपणे होणे आवश्यक असल्याने, वाचनालयाची मासिक वर्गणीची आगाऊ वसूली प्रस्तावित करणे योग्य होईल, असे वाटते.

2) मासिक वर्गणी उशिराने जमा केल्यास, विलंब शुल्क आकारणी करण्याबाबत, उपरोक्त ठरावामध्ये तरतुद दिसून येत नाही. सबब, विलंबाने मासिक वर्गणी जमा करणाऱ्या सभासदाकडून विलंब आकाराची वसूली प्रस्तावित करणे आवश्यक वाटते.

याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेकामी अ.स.क्र. 133, दि. 29/01/2020 अन्वये विभागास कळविले असता, याबाबत विलंबाने मासिक वर्गणी जमा केल्याबाबत आवश्यक ती दंडात्मक कार्यवाही करण्याचे प्रायोजित असून, त्याबाबतच्या उपाययोजनाचा अहवाल लवकरच देण्याचे मान्य केले आहे. याबाबत विभागाचा कार्यकृती अहवाल अपेक्षित आहे.

नगर रचना विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 14.1 :- वर्ष-2016-17 मध्ये विभागाने संकलित केलेला महसूल व वार्षिक जमाखर्चामध्ये दर्शविण्यात आलेला महसूल यामध्ये रु. 34.57 कोटी इतकी तफावत.

नगररचना विभागाच्या अभिलेखामधील नोंदी प्रमाणे, विभागाने वर्ष 2016-17 मध्ये, सुरक्षा अनामत व मालमत्ता कर अनामत वगळता, सर्व बाबीवर एकूण रु. 56.29 कोटी इतका महसूल संकलित केल्याचे दिसून येते. तथापि, लेखा विभागाच्या वर्ष 2016-17 करिताच्या वार्षिक जमाखर्चामध्ये, नगर रचना विभागास सर्व बाबीपासून प्राप्त झालेला प्रत्यक्ष महसूल रु. 90.86 कोटी (सुरक्षा व मालमत्ता कर अनामत वगळून) इतका दर्शविला असल्याने, दोन्ही रकमा मध्ये रु. 34.57 कोटी इतकी तफावत असल्याचे दिसून येते.

सबब, सदर तफावत कोणत्या बाबीमुळे येत आहे, याचा खुलासा योग्य त्या तपशिलासह व्हावा.

करनिर्धारक व संकलन विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 15.1 :- हॉटेल सतीश एन्क्लेव्ह या इमारतीचे प्रथम करनिर्धारणाचा तपशिल सादर करण्याबाबत...

1) हॉटेल सतीश एन्क्लेव्ह, स.न. 16/2,3,4, 18/9 गोडदेव.
2) मालमत्ता क्र. F-40039691002.

संदर्भित हॉटेल इमारतीचे प्रथम कर निर्धारणाबाबतचा संपूर्ण तपशिल लेखापरीक्षणासाठी मागणी करण्यात आली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. तरी, वरील माहिती लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

क्रिडा विभाग

सन 2016-17

परिच्छेद क्र. 16.1 :- 2016-17 या अर्थिक वर्षाचे अभिलेख लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत...

आपल्या विभागाचे 2016-17 या वर्षाचे संपूर्ण अभिलेख लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबत अर्थसमास ज्ञापनाद्वारे क्रिडा विभागास कळविण्यात आले होते.

तथापी, सदरील अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

वाहन विभाग

(2017-18)

परिच्छेद क्र. 3.6 :- वाहन विभाग
वर्ष-2017-18 मधील वाहनांबाबत...

अर्धमासिक ज्ञापन क्र. 46, दि. 12/03/2020 अन्वये 2017-18 सालातील 66 वाहनांचे Log Book व History Sheets मागविले होते. आज आम्हाला आपणाकडून 35 वाहनांची हिस्ट्री व रिपेअर रेकॉर्ड प्राप्त झाली. पैकी 28 वाहनाचे ऑडिट झालेले आहे. तरी उर्वरित 7 वाहनांचे Log Book, प्रमाणक (VOUCHERS) कृपया पाठविण्याची व्यवस्था करणे. या 7 वाहनांचा तपशिल खालील प्रमाणे.

1.	वैद्यकीय विभाग	MH04/Ey-9067
2.	टोयाटा ईटॉस	MH04/Ep-154
3.	सामान्य प्रशासन ठाणे	MH04/AN-9099
4.	वैद्यकीय विभाग	MH04/H-710
5.	मारुती स्विफ्ट डिझायर	MH04/EP-167
6.	वैद्यकीय विभाग	MH04/Ey-1072
7.	ठाणे रुग्णवाहीका	MH04/EP-159

तसेच राहिलेल्या 31 वाहनांचे Log Book व History Sheets उपलब्ध करावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 54, दि. 16/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 3.7 :- वर्ष-2017-18 मध्ये बँकेत जमा केलेल्या/खर्च केलेल्या रकमेबाबत बँक बुक उपलब्ध करुन देण्याबाबत...

बांधकाम विभागाने 2017-18 या वर्षामध्ये एकुण जमा झालेली/खर्च झालेली रक्कम ज्या बँकेत भरलेली आहे/खर्च केलेली आहे त्या बँकेचे बुक/तपशिल कृपया लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 55, दि. 17/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

स्थानिक संस्था कर विभाग

(2017-18)

परिच्छेद क्र. 7.1 :- माहे मार्च-2018 मध्ये राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त न झालेबाबत..

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेला "महाराष्ट्र वस्तू व सेवा कर" (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देणेबाबत) अधिनियम-2017 अंतर्गत वितरीत करणेत येते. माहे मार्च-2018 मध्ये अनुदान शासनाकडून प्राप्त झालेले दिसत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका जा.क्र.मनपा/स्था.सं.कर/19/2018-19, दि. 21/04/2018 व जा.क्र.मनपा/स्था.सं.कर/54/2018-19, दि. 10/07/2018 अन्वये अनुदान मिळणे बाबतची मागणी केलेली आहे. परंतु अद्याप अनुदान प्राप्त झालेले दिसत नाही. अनुदान प्राप्त न झाल्याने स्थानिक नागरी सेवा कामे करणेस व प्रशासकीय आर्थिक अडचणी उद्भवू शकतात.

तरी माहे मार्च-2018 चे अनुदान प्राप्त होणेसाठी त्वरीत कार्यवाही करुन लेखा परीक्षणास अनुपालन अहवाल सादर करणेत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारकरित्या न केल्याने अनुदान प्राप्त होणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.2 :- मुद्रांक शुल्क अदयाप अनुदान रक्कम रु. 46.11 कोटी वसूली करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेला महाराष्ट्र शासनाकडून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-1949 च्या कलम 59 व कलम 149 अ मध्ये सुधारणा करण्यात आली असून यामध्ये महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 चा 60 या अन्वये स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, देणगी व फलोपभोग गहाण यासंबंधी संलेखावर व प्रतिभूत केलेल्या रकमेवर 1% या दराने मुद्रांक शुल्क अधिभारामुळे महापालिकेला वितरीत करावयाचा आहे.

महापालिकेस खालील प्रमाणे मुद्रांक शुल्क अप्राप्त आहे.

1.	माहे एप्रिल-2017 ते डिसेंबर-2017 मध्ये 1% मुद्रांक शुल्क	रु. 28.87
2.	माहे एप्रिल-2018 ते मे-2018 मध्ये 1% मुद्रांक शुल्क	रु. 17.24
	एकुण अप्राप्त रक्कम	रु. 46.11

एकुण अप्राप्त रक्कम रु. 46.11 कोटी एवढे शुल्क प्राप्त होण्यासाठी त्वरीत कार्यवाही करुन लेखा परीक्षणास कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करणेत यावा.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवालामध्ये अ.क्र. 1, माहे एप्रिल-2017 ते डिसेंबर-2017 मध्ये 1% मुद्रांक शुल्क रु. 28.87 लक्ष पैकी रक्कम रु. 13.30 लक्ष जमा झालेले असून रक्कम रु. 15.51 लक्ष अप्राप्त आहे. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र. 7.3 :- रक्कम रु. 15,10,57,576/- ची थकबाकी वसूली करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये स्थानिक संस्था कर विभाग दि. 01/08/2015 पासून शासन निर्णयानुसार बंद करण्यात आला आहे. यामध्ये रु. 50 कोटी उलाढाल व मद्यधारण व्यवसायिक यांना स्थानिक संस्था कर लागू होता. दि. 01/07/2017 पासून वस्तू व सेवा कर सुरु झाला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत नोंदणीकृत व्यवसायिक यांचेकडून रु.15,10,57,576/- ची थकबाकी वसूल होणे बाकी आहे. तरी सदरची रक्कम वसूलीबाबत योग्य कारवाई करुन वसूली अहवाल सादर करणेबाबत अर्धसमास ज्ञापन देण्यात आले होते. तरी एकूण थकबाकी रक्कम रु. 15,10,57,576/- वसूल करुन तसा अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र. 7.4 :- मे. सनफार्मा लॅबोरोटरीज लि., यांचेकडून दि. 01/04/2017 ते दि. 30/06/2017 पर्यंतचे कर निर्धारणा रक्कम रु. 86,40,536/- वसूल करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. सनफार्मा लॅबोरोटरीज लि., युनिट क्र. 01, दुसरा मजला, विमल हाऊस, भंजी उद्योग नगर, मिरारोड (पूर्व) यांनी सन 2017-18 या आर्थिक वर्षात माहे एप्रिल-2017 ते जुलै-2017 मध्ये खालील प्रमाणे स्थानिक संस्था कर चलनाने Partly बँकेत जमा केला आहे.

1.	माहे एप्रिल-2017	रु. 132661/-
2.	माहे मे-2017	रु. 136789/-
3.	माहे जून-2017	रु. 138589/-
4.	माहे जुलै-2017	रु. 99580/-
	एकुण	रु. 507619/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने फॉर्म-I नियम क्र. 33(5) नुसार स्थानिक संस्था कर निर्धारणा केली आहे. माहे एप्रिल-2017 ते जुलै-2017 पर्यंतचे एकुण कर रु. 86,40,536/- ची वसूलीची थकबाकी दिसून येत आहे. सदरची रक्कम महापालिका फंडात जमा होणे आवश्यक आहे.

तरी मे. सनफार्मा लॅबोरोटरीज लि., यांचेवर योग्य ती कारवाई करुन रु. 86,40,536/- ची वसूली करुन महापालिका फंडात जमा करण्यात यावी. जमा केलेली बँक चलन लेखापरीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी एकुण रक्कम रु. 86,40,536/- वसूल करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.5 :- मे. ॲव्हेन्यू सुपर मार्केट प्रा.लि., (D-Mart) यांचे माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे Order & Assessment न केलेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मे. ॲव्हेन्यू सुपर मार्केट प्रा.लि., (D-Mart) यांनी सन 2017-18 या आर्थिक वर्षात चलनाने Partly कर भरणा खालील प्रमाणे केला आहे.

1.	माहे एप्रिल-2017	1839599+2614601
2.	माहे मे-2017	1928734+2442713
3.	माहे जून-2017	2490345+2158398

माहे एप्रिल-2017 ते जून-2017 मध्ये कर निर्धारणा केलेले दिसून येत नाही. तरी कर निर्धारणा करुन त्याचा भरणा महानगपालिका फंडात जमा करण्यांत यावा.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.6 :- मे. पॅरामाऊंट व्हील्स प्रा.लि., यांचे सन 2017-18 चे कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. पॅरामाऊंट व्हील्स प्रा.लि., वेलवीन सेंटर A1, AB हटकेश उद्योग नगर, मिरारोड (पूर्व) यांनी माहे जून-2017 चे कर भरणा केलेला दिसून येत नाही. तसेच माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे Order of Assesment केलेले दिसून येत नाही.

तरी त्यांचे तात्काळ कर निर्धारणा करुन त्यांचा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात यावा. कर भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.7 :- मे. बुकर इंडिया प्रा.लि., यांचे सन 2017-18 चे कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. बुकर इंडिया प्रा.लि., सी-118, पांडुरंग वाढी, मिरारोड यांनी माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर भरणा बँकेत जमा केला आहे. सन-2017-18 चे कर निर्धारणा केलेले दिसून येत नाही. तरी तात्काळ कर निर्धारणा करुन त्याचा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात यावा. कर भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.8 :- **मे. इगल बर्गमन, काशिमिरा यांचे माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर निर्धारणा न केलेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये मे. इगल बर्गमन, काशिमिरा यांनी माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर चलनाने बँकेत जमा केला आहे. परंतु माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर निर्धारणा केलेले दिसून येत नाही. तरी तात्काळ कर निर्धारणा करुन त्याचा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात यावा. कर भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.9 :- **मे.** न्यू कामत टोबॅको कं.प्रा.लि., यांचे माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर निर्धारणा न केलेबाबत..

उपरोक्त विषयान्वये मे. न्यू. कामत टोबॅको कं.प्रा.लि., यांनी माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर चलनाने बँकेत जमा केला आहे. परंतु माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर निर्धारणा केलेले दिसून येत नाही. तरी तात्काळ कर निर्धारणा करुन त्याचा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात यावा. कर भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.10 :- मे. परमनंन्ट मॅग्नेट लि., यांचे माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. परमनंन्ट मॅग्नेट लि., यांनी माहे एप्रिल-2017 ते जून-2017 चे चलनाने कर भरणा केलेला आहे. परंतु सन 2017-18 चे कर निर्धारणा केलेले दिसून येत नाही. तरी तात्काळ कर निर्धारणा करुन त्याचा भरणा महानगरपालिका फंडात करण्यात यावा. कर भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.11 :- मे. मिथीला कार्स, मिरारोड (पूर्व) यांचे 2010 पासून कर निर्धारणा न केलेबाबत व दंडाची रक्कम रु. 30,000/- वसूल करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. मिथीला कार्स, मिरारोड (पूर्व) यांनी नोंदणी प्रमाणपत्र क्र. 18259 अन्वये दिलेले आहे. त्यांचे सन-2010 पासुन जून-2017 पर्यंत कर निर्धारणा केलेले नाही. तसेच त्यांनी चलनाने कर भरणा केल्याचे दिसून येत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जा.क्र.मनपा/स्था.स.कर/12/206/2016-17, दि. 25/10/2016 रोजीचे आदेशान्वये दंडाची एकुण रक्कम रु. 30,000/- अद्याप जमा केली नाही. तरी मे. मिथीला कार्स यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करुन कर व दंडाची रक्कम महानगरपालिकेत जमा करण्यात यावे, व त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करुन दंडाची रक्कम रु. 30,000/- वसूल करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.12 :- मे. हॉटेल रुक्मिणी बार ॲण्ड रेस्टॉरंट यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. हॉटेल रुक्मिणी बार ॲण्ड रेस्टॉरंट यांनी सन 2016-17 व सन 2017-18 या अर्थिक वर्षाचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करुन कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.13 :- मे. हॉट सीप देशी बार यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. हॉट सीप देशी बार यांनी दि. 16/08/2016 ते दि. 30/06/2017 पर्यंतचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करून कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावें.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.14 :- मे. लव्हली रेस्टारंट ॲण्ड बार यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. लव्हली रेस्टारंट ॲण्ड बार यांनी दि. 16/08/2016 ते दि. 30/06/2017 पर्यंतचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करुन कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.15 :- मे. ईना पॅलेस यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. ईना पॅलेस दि. 16/08/2016 ते दि. 30/06/2017 पर्यंतचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करुन कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.16 :- मे. रंजन बिअर बार यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. रंजन बिअर बार यांनी सन 2016-17 व सन 2017-18 या अर्थिक वर्षाचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई करुन कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.17 :- मे. दीप पंजाब बार ॲण्ड रेस्टॉरंट यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. दीप पंजाब बार ॲण्ड रेस्टॉरंट यांना नोंदणी प्रमाणपत्र क्र. 028044 क्षेत्र क्र. 07/क्र. 05/2016-17 मध्ये दिलेले आहे. त्यांनी सप्टेंबर-2016 पर्यंतचे चलनाचे कर भरलेला आहे. त्यानंतर कर भरणा केलेला नाही. तसेच कर निर्धारणा केली नाही. कर निर्धारणा करणे आवश्यक आहे. तरी त्यांचे कर निर्धारणा करुन त्याचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यांत यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.18 :- मे. सैनी सुराही बार ॲण्ड रेस्टॉरंट यांनी कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. सैनी सुराही बार ॲण्ड रेस्टॉरंट यांनी सन 2016-17 व सन 2017-18 या अर्थिक वर्षाचे कर निर्धारणा केले नसल्याचे दिसून येत आहे. तरी त्याचेवर योग्य ती कारवाई करुन कर निर्धारणा करुन त्यांचे अनुपालन लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.19 :- स्थानिक संस्था कर (LBT) सन 2017-18 या आर्थिक वर्षातील जमा झालेली रक्कम व वार्षिक जमा खर्चामध्ये दर्शविण्यात आलेल्या रक्कमेतील फरकाबाबत...

सन 2017-18 या वर्षातील वसूली एकुण 15 बँकांमध्ये जमा केलेली दिसत असून गोषवारा यादीप्रमाणे एकूण वसूली रु. 100709130.24 /- (1007.09 कोटी) इतकी झालेली दिसून येते.

सदर वसूली व्यापारी चलनाद्वारे विविध बँकेत जमा करतो. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

1.	एप्रिल-2017 (इंडियन ओव्हरसीज बँक)
2.	मे-2017 (18181)
3.	फेब्रुवारी-2018
4.	देना बँक
5.	ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स (1521)
6.	ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स (2546)
7.	आय.डी.बी.आय.बँक
8.	बँक ऑफ इंडिया
9.	मार्च-2018 आय.सी.आय.सी.आय.बँक

उपरोक्त वसूलीच्या अनुषंगाने लेखा विभागाने सन 2017-18 च्या जमा खर्चात रक्कम रु. 6038.26 कोटी एवढी दर्शविण्यात आलेली आहे.

त्यामुळे जमा खर्च व स्थानिक संस्था कर विभागाचा गोषवारा यामध्ये रक्कम रु. 5031.17 कोटी (3038.26-1007.09) एवढी दिसत असून, त्यांची छाननी करुन तसा तपशील लेखा परीक्षणास सादर करण्यात यावा.

परिच्छेद क्र. 7.20 :- मे. बालाजी सेल्स यांनी कर न भरलेबाबत व कर निर्धारणा न केलेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. बालाजी सेल्स यांना नोंदणी प्रमाणपत्र क्र. 18697 अन्वये नोंदणी क्र. मनपा/स्था.सं.कर/क्षेत्र क्र. 03/844/2012-13 अन्वये दिलेले आहे. सन 2012-13 पासून कर निर्धारणा केलेली दिसून येत नाही. तसेच त्यांनी माहे ऑगस्ट-2015 पासून कराचा भरणा केलेला दिसत नाही. तरी मे. बालाजी सेल्स यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करुन कर निर्धारणा करुन कराचा भरणा करुन घेण्यात यावा, व कराचा भरणा केलेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास तपासणीसाठी सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.21 :- मे. साई सर्व्हिस एजन्सी प्रा.लि., यांचेकडून रु. 4274670/- एवढी वसूली करणेबाबत...

उपरोक्त विषयान्वये मे. साई सर्व्हिस एजन्सी प्रा.लि., यांचेकडून माहे एप्रिल-2017 ते दि. 30/06/2017 पर्यंतची कर निर्धारणा दि. 08/07/2019 रोजी केली आहे. कर निर्धारणा खालील प्रमाणे कर जमा करणेची डिमांड नोटीस दिलेली आहे.

1.	कर	1712114/-
2.	दंड	1705000/-
3.	व्याज	856556/-
	एकुण रुपये	4274670/-

मे. साई सर्व्हिस एजन्सी यांनी एकुण रक्कम रु. 4274670/- अद्याप बँकेत जमा केली नाही. तरी सदर रक्कम जमा झालेल्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास सादर करण्यात यावे.

उपरोक्त बाबींचा अनुपालन अहवाल समाधानकारक सादर केला नाही. तरी एकुण रक्कम रु. 42,74,670/- ची वसूली करणे आवश्यक आहे.

परिच्छेद क्र. 7.22 :- स्थानिक संस्थाकर विभाग सन 2017-18 च्या वर्षाची स्थानिक संस्थाकर वसुली पोटकिर्द /कॅश बुक लिहिण्याबाबत...

स्थानिक संस्थाकर वसुली साठी वसुली पोटकिर्द , नमुना क्रमांक 78 प्रमाणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तारिखवार प्रत्येक व्यापाऱ्यांची नांवे रकमेसह नोंद होणे आवश्यक आहे.

महिना/वर्षानंतर त्याचा गोषवारा करुन येणारी वसुली लेखा विभागाच्या जमाखर्च/अकौंटप्रमाणे असले आवश्यक आहे. लेखा परिक्षण करताना असे आढळुन आलेले दिसत नाही. तरी वरीलप्रमाणे पोटकिर्द घेउन त्याचा ताळमेळ होणे आवश्यक आहे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन दि. 19/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 7.23 :- स्थानिक संस्थाकर विभाग सन 2017-18 च्या वर्षाच्या न वापरलेल्या रद्द केलेल्या पावत्यांबाबत.

पावति पुस्तिका क्रमांक 8517 मधील पावत्या क्र. 851602 ते पावति क्रमांक 851700 पर्यंत या पावत्या रदद् केलेल्या आहेत.

तरी त्या पावत्या रदद् करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम क्रमांक 9(7) या नियमांचे पालन करुन त्याप्रमाणे पावत्या रदद् करणें आवश्यक आहे.

तथापि, नियमांचे पालन केल्याचे दिसुन येत नाही.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन दि. 19/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

पाणी पुरवठा विभाग

2017-18

परिच्छेद क्र. 8.1 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, जानेवारी-2018 बँकेत कर वसूली भरली असून त्याबाबत बँक डिपोझीट स्लिप नसलेबाबत...

खालील बाबतीत बँकेत रोख/चेकने रक्कम भरलेली आहे. परंतु त्याची बँक डिपोझीट स्लिप चलन सोबत नाही.

1) दि. 06/01/2018 रोजी खारीगांव विभागाकडून रु. 54,573/- एवढी कर वसूली झाली असून ही रक्कम बँकेत भरलेली आहे. त्याची बँक डिपोझीट स्लिप सोबत जोडलेली नाही.

2) दि. 12/01/2018 खारीगांव विभागाकडून रु. 24,267/- वसूल झालेले असून बँकेत भरणा केलेले आहेत. त्याची बँक डिपॉझीट स्लिप सोबत नाही.

3) दि. 15/01/2018 रोजी खारीगांव या विभागाकडून रु. 25,175/- एवढी वसूली झालेली असून ते चेकने बँकेत भरलेले आहेत. परंतु त्याची बँक डिपॉझीट स्लिप सोबत नाही.

4) खारीगांव दि. 19/01/2018

वरील विभागाकडून रु. 1,19,360/- एवढी वसूली झाली ती खालील प्रमाणे बँकेत भरली.

I) रु. 1000/- रोख डिपोझीट स्लिप आहे. परंतु बँकेचा शिक्का नाही.

II) रु. 1,18,360/- चेकने बँक डिपॉझीट केले आहेत. परंतु डिपोझीट स्लिप सोबत नाही.

5) खारीगांव, दि. 22/01/2018

वरील विभागाकडून रु. 32,655/- एवढी कर वसूली झाली असून बँकेत भरणा करण्यात आले. त्याची डिपॉझीट स्लिप आहे परंतु वर बँकेचा शिक्का सही नाही.

6) खारीगांव दि. 25/01/2018

वरील विभागाकडून रु. 29,811/- एवढी रक्कम खालील प्रमाणे आलेली आहे.

I) रु. 1,110/- रोखीने, बँक डिपॉझीट स्लिप सोबत जोडलेली आहे. परंतु त्यावर बँकेचा शिक्का सही नाही.

II) रु. 28701/- चेकने बँकेत रक्कम भरणा केल्याबाबतची बँक डिपॉझीट स्लिप सोबत जोडलेली नाही.

7) खारीगांव दि. 24/01/2018

सदर विभागाकडून रु. 2,19,082/- एवढी कर वसूली झाली असून ती चेकने बँकेत भरलेली आहे. याबाबत बँक डिपॉझीट स्लिप सोबत जोडलेली नाही.

तरी कर वसूली बँकेत जमा झाल्याची खातरजमा करुन तपशिल लेखा परीक्षणास सादर करण्यात यावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 29, दि. 25/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.2 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, जानेवारी-2018 डोंगरी व उत्तन या विभागांकडून करण्यात येणारी वसूली.

पोटकिर्द-2 प्रमाणे दि. 05/01/2018 रोजी उत्तन या विभागाकडून रु. 2564/- एवढी रोख रक्कम वसूली दाखविण्यात आलेली आहे.

चलन फॉर्म नं. 3, कर वसूली डोंगरी या विभागांकडून आली असे दाखविण्यात आलेली आहे.

डोंगरी विभागाकडून आलेली कर वसूली त्याच विभागात दाखविण्यात आली आहे. पुढे सर्व असेच दाखविण्यात आलेली आहे.

तरी याबाबत योग्य तो खुलासा करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 30, दि. 25/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.3 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, जानेवारी-2018 चलनाबाबत..

राई-मुर्धे या विभागाकडून दि. 24/01/2018 रोजी रु. 7830/- एवढी कर वसूली झालेली आहे. याबाबत चलन कॉपी जोडलेली नाही.

तरी सदर चलन कॉपी लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करावी.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 31, दि. 25/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.4 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, जानेवारी-2018 पोटकीर्द - 2 व चलन यामध्ये दाखविण्यात आलेल्या वसूली रक्कमेमधील तफावती बाबत...

1) पोटकीर्द - प्रमाणे दि: 04 जानेवारी, 1918 रोजीची "राई-मुर्धे या विभागकडून एकुण रु. 3888/- एवढी वसूली दाखविण्यात आलेली आहे.

2) तथापी, चलन, फॉर्म नं. 3 एकुण वसूली रु. 2595/- एवढी दाखविण्यात आलेली असून ही रक्कम रु. 2595/- बँकेत रोख भरलेली असून तशी पावती आहे.

3) कलेक्शन रिपोर्टप्रमाणे एकुण वसूली रु. 3888/- एवढी दाखविण्यात आलेली असून ही रक्कम खालील प्रमाणे मिळाली आहे.

I) रु. 1295/-
II) रु. 1293/-
III) रु. 1300/-

एकुण - रु. 3888/-

प्रत्यक्ष कर वसूली व बँकेत जमा केलेली रक्कम या मध्ये तफावत दिसून येत आहे. तसेच चलनामध्ये वेगळी रक्कम दिसत आहे. तरी या तफावतीबाबत ताळमेळ करुन लेखापरीक्षणा-करीता तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 32, दि. 25/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.5 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, फेब्रुवारी-2018 दि. 03/02/2018 रोजी मिरारोड कडून आलेली कर वसूली रु. 4,22,125/-

दि. 03/02/2018 रोजी मिरारोड या विभागाकडून रु. 4,22,125/- एवढी कर वसुली झाली आहे. त्यापैकी रु. 7,205/- एवढी रक्कम रोखीने बँकेत भरली.

परंतु सोबत जोडलेल्या बँक डिपोझिट स्लिप मध्ये हीच रक्कम रु. 7,705/- एवढी दाखविल्यात आली आहे. तरी त्याचा तपशील लेखा परीक्षणासाठी सादर करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 33, दि. 25/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.6 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18, फेब्रुवारी-2018 बँकेत कर वसूली भरली असून त्याबाबत बँक डिपोझिट स्लिप नसलेबाबत...

खालील बाबतीत बँकेत रोख/चेकने रक्कम भरलेले आहे. परंतु त्याची बँक डिपोझिट स्लिप चलन सोबत नाही.

1) खारीगांव, दि. 01/02/2018.

वरील विभागाकडून आलेली कर वसूली रु. 70,000/- बँकेत जमा केलेले आहेत. त्याबाबतची बँक डिपोझिट स्लिप चलन सोबत जोडलेली नाही.

2) खारीगांव, दि. 02/02/2018

वरील विभागाकडून रु. 96,879/- आले ते खालील प्रमाणे बँकेत भरले.

i) रु. 22,176/- रोखीने, रोख भरणा स्लिप जोडलेली आहे. त्यावर बँकेची सही शिक्का नाही.

ii) रु. 74,703/- चेकने बँकेत भरणा केले त्याची बँक डिपोझिट स्लिप चलन सोबत जोडलेली नाही.

3) खारीगांव, दि. 03/02/2018

या दिवशी एकुण कर वसूली रु. 2,13,228/- एवढी झाली असून ती खालील प्रमाणे बँकेत भरली.

i) रु. 73,102/- रोख बँक डिपोझिट स्लिप आहे. परंतु त्यावर बँकेची सही शिक्का नाही.

ii) रु. 1,40,126/- चेकने बँकेत भरले त्याची बँक स्लिप चलन सोबत नाही.

4) काशी, दि. 03/02/2018

या दिवसाची एकुण कर वसूली रु. 10,919 यापैकी रु. 4,403/- एवढी रक्कम चेकने बँकेत भरणा केली. त्याबाबतची बँक डिपोझिट स्लिप चलन सोबत नाही.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 34, दि. 26/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.7 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
घोडबंदर कनकिया

दि. 27/06/2017 रोजी घोडबंदर कनकिया या विभागांकडून खालील प्रमाणे वसूली झालेली आहे.

1) पाणीपट्टी रु. 11,14,105/-

2) पाणीपट्टी सेस रु. 12,434/-

परंतु चलनामध्ये याची नोंद खालील प्रमाणे केलेली आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	12,434/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	11,14,105/-

वरील लेखाशिर्ष चुकीचे असून खालील प्रमाणे दुरुस्ती करावी.

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	11,14,105/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	12,434/-

तरी वरील लेखाशिर्ष बदलून त्याप्रमाणे दुरुस्ती करुन तपासून पाहून तपशिल लेखापरीक्षणास सादर करवा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 35, दि. 26/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.8 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
घोडबंदर कनकिया लेखाशिर्षाबाबत...

दि. 28/06/2017 रोजी वरील विभागाकडून खालील लेखाशिर्षाखाली वसूली झालेली आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	4,767/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	7,89,371/-

परंतु चलनात दाखविलेली लेखाशिष चुकीचे असून खालीलप्रमाणे दुरुस्ती करावी

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	7,89,371/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	4,767/-

तरी वरील लेखाशिर्ष बदलून त्याप्रमाणे दुरुस्ती करुन तपासून पाहून तपशिल लेखापरीक्षणास सादर करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 36, दि. 26/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.9 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
घोडबंदर कनकिया

दि. 29/07/2017 रोजी घोडबंदर कनकिया या विभागांकडून चलनाप्रमाणे, खालील प्रमाणे वसूली करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	3,298/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	3,71,710/-

वरील लेखाशिर्ष चुकीचे असून खालील प्रमाणे दुरुस्ती करावी.

अ.क्र.	लेखाशिर्ष	वर्णन	रक्कम (रुपये)
1.	15199	पाणीपट्टी	3,71,710/-
2.	12179	पाणीपट्टी सेस	3,298/-

तरी वरील लेखाशिर्षाचे बदल खातरजमा करणे व लेखापरीक्षणासाठी पाठवावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 37, दि. 26/02/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.10 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18 विभागाने दाखविलेली, पाणीपट्टी/जलउपकर या लेखाशिर्षाखाली वसूली व वार्षिक जमाखर्च 2017-18 मध्ये दाखविलेली वसूली यामध्ये असलेल्या तफावती बाबत.

सन 2017-18 या अर्थिक वर्षामधील पाणीपट्टी व जलउपकर या लेखाशिर्षाखाली खालील प्रमाणे वसूली दाखविलेली आहे.

अ. क्र.	लेखाशिर्ष	मागिल	चालु	रिटर्न चेक	एकुण वसूली (रु.)
1.	पाणीपट्टी	80.16	5,128.71	104.64	5,104.23
2.	जल उपकर	0.21	14.08	0.29	14
			एकुण		5,118.23

तथापी लेखा विभागाच्या वार्षिक जमाखर्च सन 2017-18 प्रमाणे हिच वसूली खालील प्रमाणे दाखविलेली आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	रक्कम (रुपये)
1.	पाणीपट्टी	4,869.94
2.	जल उपकर	14.51
	एकुण	4,804.45

पाणी पुरवठा विभाग व लेखा विभाग याना दाखविल्या वरीलमध्ये खालील प्रमाणे तफावत दिसून येत आहे.

अ.क्र.	विभाग	पाणीपट्टी	जल उपकर
1.	पाणी पुरवठा विभाग	5,104.23	14.00
2.	लेखा विभाग	4,869.54	14.51
	तफावत रु.	234.29	0.51

तरी याचा ताळमेळ करुन तपशिल लेखापरीक्षणासाठी सादर करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 38, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. B.11 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
वर्ष 2017-18 मध्ये बँकेत भरलेले चेक रिटर्न झाल्याबाबतची नस्ती लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत...

सन 2017-18 या आर्थिक वर्षामध्ये रु. 1,04,93,056/- एवढ्या रकमेचे चेक, पाणीपट्टी व उपकर या लेखाशिर्षाखाली बँकेतून रिटर्न आल्याचे दिसून येत आहे.

तरी चेक रिटर्न रजिस्टर/नोंदवही/ नस्ती लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 39, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.12 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
राई-मुर्धा, दि. 03/11/2017 पाणीपट्टी बाबत...

राई-मुर्धा या विभागाकडून रु. 13,840/- एवढी पाणी पुरवठा कर वसूली झालेली आहे. डेली कलेक्शन समरी तसेच बँक रोख भरणा पावतीप्रमाणे रु. 13,840/- एवढी वसूली दिसून येत आहे.

तथापी, चलन फॉर्म नं. 3 प्रमाणे हिच रक्कम रु. 1,384/-. लेखाशिर्ष 1519912 एकुण पाणीपट्टी या सदराखाली दाखविण्यात आलेली आहे.

तरी खातरजमा करुन तसा बदल करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 40, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.13 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
राई-मुर्धा या विभागाकडून दि. 01/07/2017 रोजी वसूल केलेली पाणीपट्टी.

दि. 01/07/2018 रोजी राई-मुर्धा या विभागाने खालील प्रमाणे कर वसूली केलेली आहे.

अ. क्र.	लेखाशिर्ष	मागील	चालु	एकुण रु.
1.	पाणीपट्टी	455	20,638	21,093
2.	जल उपकर	--	--	67
3.	डीपीसी चार्जेस	--	--	33
			एकुण	21,193

चलन नमुना-3 मध्ये ही वसूली खालील प्रमाणे दाखविलेली आहे.

अ.क्र.	लेखाशिर्ष	रक्कम (रुपये)
1.	पाणीपट्टी	21,193
2.	जल उपकर	67
3.	डीपीसी चार्जेस	33
	एकुण	21,293

डेली कलेक्शन समरी प्रमाणे हिच वसूली खालील प्रमाणे दाखविण्यात आलेली आहे.

अ. क्र.	लेखाशिर्ष	रोख	चेक	एकुण रु.
1.	पाणीपट्टी	19,402	1,691	21,093
2.	जल उपकर	62	5	67
3.	डीपीसी चार्जेस	33	--	33
			एकुण	21,193

बँकेत ही रक्कम खालील प्रमाणे भरली आहे.

1.	रोख	रु. 19,457/-
2.	चेक	रु. 1,696/-
	एकुण	21,193/-

बँकेत भरणा केलेली रक्कम व चलन नमुना-3 मध्ये दाखविलेली रक्कम यामध्ये रु. 100/- चा फरक दिसून येत आहे. (रु. 21,193/-, रु. 21,293/-)

तरी वरील तफावतीची खातरजमा करावी व बदल करावेत. व लेखापरीक्षणासाठी सादर करावे.उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 41, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.14 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
राई-मुर्धा विभागाने दि. 29/06/2017 रोजी केलेली कर वसूली.

राई-मुर्धा या विभागाने दि. 29/06/2017 रोजी केलेली कर वसुली चलन नमुना-3 मध्ये खालील प्रमाणे दाखविण्यात आली आहे.

अ.क्र.		रक्कम (रु.)
1	पाणी पट्टी	70,140/-
2.	जल उपकर	227/-
3	डीपीसी चार्जेस	74/-
	एकुण	70,441/-

ही रक्कम रोखीने रु. 50,660/- चेकने रु. 19,720/- असे बँकेत भरले आहेत. पोटकीर्द प्रमाणे ही वसूली खालील प्रमाणे दिसत आहे.

अ.क्रं.		रक्कम (रु.)
1	पाणी पट्टी	25,640/-
2	जल उपकर	227/-
3	डीपीसी चार्जेस	74/-
	एकुण	25,941/-

दोन्हीकडे तफावत दिसून येत आहे. तरी खातरजमा करुन, आवश्यक बदल करुन लेखापरीक्षणास सादर करावी.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 42, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.15 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
राई-मुर्धा विभागाचे चलन नसल्याबाबत.

राई-मुर्धा या विभागाकडून 2017-18 या आर्थिक वार्षात केलेल्या कर वसूलीबाबत खालील चलन नाहीत.

अ.क्र.	वसुली दिनांक	वसुली रक्कम (रु.)
1	15/09/2017	629/-
2	16/09/2017	630/-
3	09/10/2017	44,262/-

या विभागाची पोटकीर्द दि. 01/01/2017 ते दि. 07/11/2017 पर्यंत लिहीलेली आहे. चौकशी करता असे समजते की, तेथून पुढे ऑनलाईन सिस्टीम आलेली आहे.

तरी दि. 08/11/2017 ते दि. 31/03/2018 या कालावधीची चलन/चेक भरणा पावत्या यांची प्रिंट आऊट लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 43, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.16 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
पोटकीर्द मध्ये चलन/तपशिलाची नोंद नसल्याबाबत...

विभागाकडून दि. 01/04/2017 ते दि. 13/04/2017 या कालावधीत कर वसूली करण्यात आली आहे. तथापी, याची पोटकीर्दमध्ये नोंद नाही. खालील चलनांची पोटकीर्दमध्ये नोंद केलेली नाही.

अ.क्र.	दिनांक	रक्कम (बँकेत जमा)
1	01/04/2017	7255/-
2	07/04/2017	2800/-
3	06/04/2017	1230/-
4	10/04/2017	5370/-
5	11/04/2017	1009/-
6	12/04/2017	1138/-
7	13/04/2017	1230/-

तरी खातरजमा करुन योग्य ते बदल करुन लेखापरीक्षणासाठी सादर करावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 44, दि. 02/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.17 :- पाणी पुरवठा विभाग - सन 2017-18
झोनच्या पोटकीर्द मिळणेबाबत...

सन 2017-18 या आर्थिक वर्षात, पाणीपट्टी, जलउपकर या लेखाशिर्षाखाली 10 झोनद्वारे वसूली करण्यात येते.

यापैकी घोडबंदर झोन व राई-मुर्धे या झोनच्या पोटकीर्द मिळाल्या असून घोडबंदर पोटकीर्द 2017-18 पर्यंत लिहीले आहे. तर राई- मुर्धे दि. 06/11/2017 पर्यंत लिहीलेले आहे. दि. 07/11/2017 ते दि. 31/03/2018 या कालावधीची पोटकीर्द लिहीली नाही. तरी लेखापरीक्षणासाठी खालील पोटकीर्द/नस्ती उपलब्ध करुन देणे.

1) एकुण दहा झोन पैकी घोडबंदर व राई-मुर्धे वगळून बाकी आठ झोनची पोटकीर्द.

2) राई-मुर्धे बाबत दि. 17/11/2017 ते दि. 31/03/2018 पर्यंतची पोटकीर्द सिस्टीम ऑनलाईन झाली असल्यास संबंधीत चलनाचे तपशील.

3) पाणीपट्टी थकबाकी थकबाकीदार, मागणी, कोर्टकिसेस या बाबतची नस्ती.

4) पोटकीर्द नसल्यास ऑनलाईल चलनाचा तपशील.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 45, दि. 04/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.18 :- वर्ष-2017-18 मधील वाहनांबाबत...

वर्ष-2017-18 साठी आपल्या विभागात 66 वाहने होती. पैकी 28 वाहनांचे History Sheet मिळालेले आहेत. तरी राहिलेल्या 38 वाहनांची History Sheet उपलब्ध करुन देणे.

तसेच सर्व 66 वाहनांचे Log Books देण्यात यावीत. वाहने दुरुस्ती व इंधन खर्च बाबतचे सर्व रेकॉर्ड देण्यात यावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 46, दि. 12/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.19 :- वर्ष-2017-18 मध्ये विभागाने संकलित केलेल्या महसूलाचे लेखे संपूर्ण नोंदवह्या व मंजूरीत कागदपत्रे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन ठेवण्याबाबत...

सन 2017-18 या वर्षाचे आपल्या विभागाने संकलित केलेल्या महसूल संबंधीची खालील नोंदवह्या नस्त्या लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावेत.

अ.क्र.	तपशिल
1.	जमा झालेल्या महसूलाच्या नोंदवह्या
2.	ताळमेळ नस्ती
3.	कॅशबुक
4.	जमा पावती पुस्तिका
5.	जमा अनामत रक्कम नोंदवह्या
6.	स्थायी आदेशांची नस्ती
7.	बँकेचे स्टेटमेंट

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 47, दि. 12/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.20 :- पाणी पुरवठा विभाग, किरकोळ पोटकीर्द - सन 2017-18 पावती क्र. 1280 मधील रक्कमेतील तफावती बाबत...

दि. 24/08/2017 रोजी पावती क्र. 1280 द्वारे श्री. हंसराज पटेल, यांचेकडून नळ जोडणी स्थलांतरासाठी रु. 6540/- एवढे आलेत.

पोटकीर्दीमध्ये हीच रक्कम रु. 6570/- अशी दाखविलेली आहे. दोन्हीमध्ये तफावत दिसून येत आहे. तरी खातरजमा करुन तशी दुरुस्ती करुन लेखापरीक्षणासाठी सादर करावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 48, दि. 12/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.21 :- पाणी पुरवठा विभाग, किरकोळ पोटकीर्द - सन 2017-18, पावती क्र. 1219 बाबत...

दि. 06/07/2017 रोजी मे.एन.एस. इंटरप्रायझेस यांचेकडून सुरक्षा अनामत 3% रु. 2891/- पावती क्र. 1219 द्वारे रोख मिळाले.

पावतीमध्ये ही रक्कम रु. 2891/- अशी दाखविण्यात आली आहे. तर पोटकीर्दमध्ये रु. 2881/- अशी दाखविण्यात आलेली आहे. तरी नक्की किती रक्कम आली ते खातरजमा करुन तसा बदल करावा व लेखा परीक्षणासाठी सादर करावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 49, दि. 12/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.22 :- पाणी पुरवठा विभाग, किरकोळ पोटकीर्द - सन 2017-18, किरकोळ पोटकीर्द 4603.

दि. 17/03/2018 रोजी सुरज प्लाझा को.ऑप.हौ.सो., या सोसायटीकडून रोख रु. 500/- पावती क्र. 34826 द्वारे मिळाली.

तथापी याची नोंद पोटकीर्दीमध्ये दिसून येत नाही. तरी खातरजमा करुन आवश्यक ते बदल करुन लेखा परीक्षणास सादर करावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्थमासिक ज्ञापन क्र. 50, दि. 12/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.23 :- पाणी पुरवठा विभाग, वर्ष-2017-18
3% सुरक्षा अनामत...

वर्ष-2017-18 या आर्थिक वर्षामध्ये पाणी पुरवठा विभाग/मलनिःसारण या विभागाकडून 3% सुरक्षा अनामत वसुल करण्यात आलेली आहे.

वसुली सर्वसाधारणपणे बँकेत जमा केली जाते. परंतु या लेखाशिर्षाखाली वसूली झालेली रक्कम बँकेत न भरता, पोटकिर्दमध्ये एकुण वसुली मधून वजावट केलेली आहे.

तरी ही वसूली कुठे जमा केली त्याबाबत रेकॉर्ड लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 51, दि. 16/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.24 :- पाणी पुरवठा विभाग, वर्ष-2017-18
बँक भरणा पावत्या नसल्याबाबत/किरकोळ पोटकिर्द.

खालील बाबतीत बँकेत रोख/चेकद्वारे पैसे भरलेले आहेत. परंतु चलनासोबत त्याची बँक डिपॉझिट स्लिप जोडलेली नाही.

1) दि. 19/04/2017 रोजी रु. 14940/- बँकेत भरले. त्याची बँक डिपॉझिट स्लिप नाही.

2) दि. 22/05/2017 रोजी बँकेत रोखीने रु. 3930/- भरले, व तशी तेवढ्या रकमेची बँक डिपॉझिट स्लिप सुद्धा आहे. तथापी पोटकिर्द प्रमाणे रोख रु. 20538/- बँकेत भरले असे दिसत आहे.

3) दि. 02/06/2017 रोजी चलन तसेच पोटकिर्द प्रमाणे रु. 57694/- एवढी रक्कम मिळाली. तथापी बँक डिपॉझिट स्लिप प्रमाणे रोख रक्कम रु. 1000/- एवढी रक्कम बँकेत भरली असे दिसत आहे.

4) दि. 07/06/2017 रोजी चेकद्वारे रु. 2550/- एवढी रक्कम बँकेत भरली त्याची बँक डिपॉझिट स्लिप नाही.

5) दि. 09/06/2017 रोजी बँकेत खालील प्रमाणे पैसे जमा केलेले आहेत.

रोख भरणा रु. 39282/-

बँकेत चेकद्वारे भरले रु 29994/- तथापी बँक डिपॉझिट स्लिप प्रमाणे बँकेत रोख रु. 4570/- भरल्याचे दिसत आहे.

चेकद्वारे आलेली रक्कम बँकेत भरली त्याची स्लिप नाही.

6) दि. 15/06/2017 रोजी रु. 13515/- चेकद्वारे बँकेत भरले. तथापी, चलन सोबत त्याची बँक डिपॉझिट स्लिप नाही.

7) दि. 17/06/2017 रोजी रु. 286176/- बँकेत चेकद्वारे भरले. त्याची बँक डिपॉझिट स्लिप नाही.

बँक बुक/लेजर उपलब्ध न झाल्यामुळे वरील रकमेची खातरजमा छाननी करता येत नाही.

तरी वसूली ज्या बँकेत जमा केलेली आहे त्या बँकेचे बुक उपलब्ध करावे. तसेच वरील रक्कम बँकेत जमा झाल्याची खातरजमा करावी व लेखापरीक्षणासाठी पाठविणे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 52, दि. 16/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.25 :- पाणी पुरवठा विभाग, वर्ष-2017-18.
विशेष स्वच्छता/मलप्रवाह सुविधा लाभ कर

सन 2017-18 या वर्षात वरील विभागाने, मलनिःसारण या लेखाशिर्ष खालीलप्रमाणे वसूली केलेली आहे.

	रुपये
एप्रिल-2017 ते डिसेंबर-2017 या कालावधीकरिता वसूली	1473000/-
अधिक : माहे जूले-2017 मधील दि. 24/07/2017 रोजीची पावती क्र. 1258 अन्वये साई लक्ष्मी/साई करिष्मा यांचेकडून आलेली रक्कम घेतलेली नाही.	25000/- **1498000/-**
अधिक : माहे जानेवारी-2018 ते दि.31/03/2019 या कालावधीतील वसूली	
1) जानेवारी-2018	50000/-
2) फेब्रुवारी-2018	325000/-
3) मार्च-2018	140000/-
एकुण	**2013000/-**

वार्षिक जमाखर्च सन 2017-18 प्रमाणे विशेष स्वच्छता/मलप्रवाह सुविधा लाभ कर प्रत्यक्ष रु. 1556.01 लाख एवढा आहे.

वरील दोन्ही रकमेची छाननी केली असता, त्याचा ताळमेळ होत नाही. तसेच जमा खर्चात दाखविलेली रक्कम संचीत आहे किंवा त्या वर्षाची प्रत्यक्ष वसूली आहे हे समजत नाही. तरी या रकमेचा ताळमेळ खालील प्रमाणे द्यावा.

	रुपये (लाखात)
वार्षिक जमा खर्च सन 2016-17 प्रमाणे संचीत/एकत्रित जमा	?
अधिक : सन 2017-18 या वर्षातील प्रत्यक्ष जमा	20.13
वार्षिक जमाखर्च 2017-18 प्रमाणे प्रत्यक्ष जमा	1556.01

तरी उपरोक्त लेखाशिर्षाखालील रकमेचा तपशिल/लेजर लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 53, दि. 16/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

परिच्छेद क्र. 8.26 :- विद्युत बिलातील ईलेक्ट्रीसिटी ड्युटी बाबत...

महाराष्ट्र ईलेक्ट्रीसिटी ॲक्ट १९५८ तरतुद ३(२)(ia) नुसार महानगरपालिकेस ईलेक्ट्रीक ड्युटी माफ केलेली आहे.

खाली नमुद केलेल्या ईलेक्ट्रीसिटी देयकाची तपासणी केली असता वर नमुद केलेल्या बाबींवर ईलेक्ट्रीसिटी ड्युटी आकारण्यात आलेली असुन त्याचा संपुर्ण भरणा करण्यात आलेला आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे

अ. क्र.	कालावधी	विद्युत मिटर कंपीनीचे नांव	मालमत्ता देयक रक्कम	ईलेक्ट्रीक ड्युटी (रु)	शेरा
1	01/04/2017 ते 31/12/2018	टाटा पावर विद्युत कंपनी लि.,	10472445	1427575.2	भरलेल्या देयकाची तपशिलवार माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टांमध्ये देण्यात आली आहे.
2		महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लि.,	26955217	2526229	
3		मे. रिलायन्स एनर्जी लि.,	22014231	1890431	
एकुण			59441893	5844235.2	

सबब ड्युटी माफ असताना त्याच बाबीसाठी आकारलेली ड्युटी रु. 5844235.2/- का भरण्यात आली याचा खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा. तसेच भरलेल्या रक्कमेची उपरोक्त कंपनी कडुन वसुली करण्यात यावी. वास्तविकरित्या प्रदानकर्त्या अधिका-याने कोणत्याही रक्कमेचे प्रदान करताना कायद्याशी सुसंगत रक्कमेचे प्रदान होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापि, उपरोक्त रक्कमेचे नियमबाह्य प्रदान प्रदानकर्त्या अधिका-याकडुन करण्यात आलेले आहे.

सन २०१५-१६ या वर्षात मनपा मार्फत एकुण किती ईलेक्ट्रीसिटी ड्युटी भरणा करण्यात आली व ती वसुलीसाठी काय प्रयत्न करण्यात आले याबाबत अनुपालन करण्यात यावे.

वसुलपात्र रक्कम:- रु. 5844235.2/-

परिच्छेद क्र. 8.27 :- विद्युत देयकांचे अधिदान विलंबाने होत असल्याने विलंब आकार देय होत असल्याबाबत...

1) वर्ष 2017-18 मधील आपल्या विभागाशी संबंधीत काही विद्युत देयकांचे चाचणी लेखापरीक्षण केले असता असे आढळुन आले कि, विद्युत देयकांचे अधिदान देय दिनांकापुर्वी न केल्याने मोठया प्रमाणात विलंब आकाराचे अधिदान करावे लागत आहे, त्याचा तपशिल खालील प्रमाणे,

अ. क्र.	कालावधी	विद्युत मिटर कंपीनीचे नांव	उशिराने अदा केलेल्या देयकाचा दंडाचा अरणा	शेरा
1	01/04/2017 ते 31/12/2018	टाटा पावर विद्युत कंपनी लि.,	34761	अरलेल्या देयकाची तपशिलवार माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये देण्यात आली आहे.
2		मे. रिलायन्स एनर्जी लि.,	303455.58	
एकुण			338216.58	

उपरोक्त बाबी या नमुना दाखल नमुद केल्या असुन अन्य देयकाबाबत सुध्दा अशाच प्रकारे विलंब आकाराची आकारणी करण्यात आलेली आहे.

2) या संदर्भात असे नमुद करावेसे वाटते कि, सर्व विद्युत देयके तयार झाल्यानंतर विद्युत वितरकांच्या संकेत स्थळावर देयके उपलब्ध होत असल्याने, विद्युत देयके वितरकाकडुन प्राप्त होण्याची वाट न बघता संकेत स्थळावरुन देयके डाऊनलोड केल्यास, विहित कालावधीमध्ये देयकांचे अधिदान करता येईल. एवढेच नव्हे तर देय दिनांकापुर्वी अधिदान केल्यास वितरकाने देवु केलेला डिस्कांऊट सुध्दा घेता येईल.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दोन दिवसांत सादर करण्यात यावे.

परिच्छेद क्र. 8.28 :- विद्युत देयकांचे अधिदान विलंबाने होत असल्याने व्याजापोटी भरलेल्या रकमेबाबत...

1) वर्ष 2017-18 मधील आपल्या विभागाशी संबंधीत काही विद्युत देयकांचे घाचणी लेखापरीक्षण केले असता असे आढळुन आले कि, विद्युत देयकांचे अधिदान देय मुदतीत न केल्यामुळे मोठ्या प्रमाणात व्याजापोटी विद्युत कंपनीने रक्कम रु. 243249.03/- ची आकारणी केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

अ. क्र.	कालावधी	विद्युत मिटर कंपीनीचे नांव	उशिराने अदा केलेल्या देयकाच्या व्याजाची रक्कम	शेरा
1	01/04/2017 ते 31/12/2018	महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी डिस्ट्रीब्युशन कंपनी लि.,	243249.03	भरलेल्या देयकाची तपशिलवार माहिती सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये देण्यात आली आहे.
एकुण			243249.03	

उपरोक्त बाबी या नमुना दाखल नमुद केल्या असुन अन्य देयकाबाबत सुध्दा अशाच प्रकारे व्याजाची आकाराची आकारणी करण्यात आलेली आहे.

2) या संदर्भात असे नमुद करावेसे वाटते कि, सर्व विद्युत देयके तयार झाल्यानंतर विद्युत वितरकांच्या संकेत स्थळावर देयके उपलब्ध होत असल्याने, विद्युत देयके वितरकाकडुन प्राप्त होण्याची वाट न बघता संकेत स्थळावरुन देयके डाऊनलोड केल्यास, विहित कालावधीमध्ये देयकांचे अधिदान करता येईल. एवढेच नव्हे तर देय दिनांकापुर्वी अधिदान केल्यास वितरकाने देवु केलेला डिस्कांऊट सुध्दा घेता येईल.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दोन दिवसांत सादर करण्यात यावे.

आरोग्य विभाग

2017-18

परिच्छेद क्र. 9.1 :- आरोग्य विभाग
वर्ष-2017-18 मध्ये बँकेत जमा केलेल्या/खर्च केलेल्या रकमेबाबत बँक बुक उपलब्ध करुन देण्याबाबत...

आरोग्य विभागाने 2017-18 या वर्षामध्ये एकुण जमा झालेली/खर्च झालेली रक्कम ज्या बँकेत भरलेली आहे/खर्च केलेली आहे त्या बँकेचे बुक/तपशिल कृपया लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

तसेच आपल्या विभागाने संकलित केलेल्या महसूलासंबंधीच्या खालील नोंदवह्या, नस्त्या लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे.

1. जमा झालेल्या महसूलाचे नोंदवह्या
2. ताळमेळ नस्ती
3. कॅश बुक
4. जमा पावती पुस्तिका
5. जमा अनामत रक्कम नोंदवह्या
6. (S.O. File) स्थायी आदेशाठी नस्ती

उपरोक्त विषयाबाबत अर्धमासिक ज्ञापन क्र. 56, दि. 17/03/2020 रोजी पाठवून खुलासा मागविला असता प्राप्त झालेला नाही.

लेखा विभाग

2017-18

परिच्छेद क्र. 10.1 :- महानगरपालिकेच्या विविध निधी रकमेच्या केलेल्या गुंतवणूकी संदर्भात आढळून आलेल्या अनियमितता..

महानगरपालिकेने विविध निधीची स्थापना केली असून निधी मधील शिल्लक रकमा राष्ट्रीयकृत बँकामध्ये गुंतविलेल्या आहेत. माहे ऑक्टोबर 2017 या कालावधीमध्ये गुंतविलेल्या बँक ठेवीच्या नोंदवहीचे (नमुना 142) अवलोकन केले असता खालील अनियमितता आढळुन आल्या.

1) महानगरपालिका अधिनियम कलम 92 (2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने मनपा आयुक्त महापालिकेच्या वतीने शिल्लक रकमांची गुंतवणुक बँक ठेवी व अन्य गुंतवणुकीमध्ये करील व अशाच मंजुरीने अशा रीतीने ठेवलेल्या ठेवी कोणत्याही वेळी काढुन घेता येतील. तथापी, पुर्नगुंतवणूक मा. स्थायी समितीच्या मान्यतेने न करता, आयुक्तांच्या मान्यतेने केल्याचे निदर्शनास आले आहे.

2) गुंतवणूक नोंदवहीत (नमुना नं. 142) मधील विविध निधीच्या पुर्नगुंतवणूकीची तुलना केली असता, एकत्रित पाणी पुरवठा व अंशकालीन परिमाणित निधीची एकाच आठवड्यात पूर्नगुंतवणूक केली असून, त्याचे दर कमी-जास्त आहेत. त्यामुळे एकत्रित पाणी पुरवठा निधीतील गुंतवणूकीतील व्याजाचे दर कमी असून, त्यामुळे रु. 2647077/- इतक्या व्याजाचे नुकसान झाले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

गुंतवणूक क्रमिक क्र. क्र.	निधीचे नाव	गुंतवणूक केलेल्या बँकेचे नांव	गुंतवणूक रक्कम	व्याजदर	व्याज	स्थायी कालावधीत जास्त व्याजदर असलेल्या बँकेचे नांव	व्याजाचा दर	व्याज मिळाले असते	तुलनात्मक व्याजदरातील फरक
27	एकत्रित पाणी पुरवठा व अन्न;प्रवाह विनीयोग कर्जनिधी	इंडियन बँक 6569637788 05/10/2017	50000000	4.75%	2417641	बँक ऑफ इंडिया 017556116000090 4 04/10/2017	6.60	3300000	882359
28		इंडियन बँक 657012349551017 05/10/2017	50000000	4.75%	2417641			3300000	882359
29		इंडियन बँक 6570435154 05/10/2017	50000000	4.75%	2417641	बँक ऑफ इंडिया 017556116000090 4 04/10/2017	6.60	3300000	882359
एकूण					7252923			9900000	2647077

उपरोक्त तुलनात्मक तपशिलाप्रमाणे पाणी पुरवठा निधीची गुंतवणूक इंडियन बँके एवजी बँक ऑफ इंडिया मध्ये केली असती तर, रु. 2647077/- इतके जास्त व्याज मिळाले असते. तरी सदरील ठेवी कमी व्याजाच्या दराने का गुंतविण्यात आल्या याचा खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.